मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

मुंबई/ पालघर | सोमवार, २८ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १२८ | पाने- ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail. com

## तामिळ सुपरस्टार विजयची राजकारणात धमाकेदार एण्ट्री



**चेन्नई :** अखेर तामिळ सुपरस्टार विजयने राजकारणात प्रवेश केला. रविवारी पहिल्याच जाहीर सभेत त्याने समर्थकांना संबोधित केलं. यावेळी त्याने नागरिकांना भावनिक साद घातली. विजय यांनी सर्व स्वातंत्र्यसैनिक आणि शहीदांना श्रद्धांजली वाहिली आणि टीव्हीकेचा ध्वज फडकावून सभेची सुरुवात केली. आपण आपली सुवर्ण चित्रपटसृष्टीतील कारकीर्द आणि प्रचंड कमाई सोडून जनतेच्या सेवेसाठी राजकारणात प्रवेश केलाय. आपल्या चाहत्यांच्या पाठिंब्यानेच आपण येथे आहोत, असे विजयने सभेत सांगितले.



आमचं तिकीटही फुकट आणि पाठिंबाही फुकट

पान ५

## म ह त्वा चे

### जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा देण्यास केंद्र सहमत

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्यासाठी केंद्रात करार झाला आहे. त्याचबरोबर लडाख हा केंद्रशासित प्रदेश राहील. नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात यासंबंधीचा प्रस्ताव आणला जाईल.राज्याचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी 23 ऑक्टोबरला गृहमंत्री अमित शहा आणि 24 ऑक्टोबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यादरम्यान ओमर यांनी पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्याची विनंती केली होती. त्यांना यंदा राज्य पूर्ववत करण्याचे आश्वासन मिळाले होते.2019 मध्ये, जेव्हा कलम 370 आणि 35A हटवण्यात आले, तेव्हा जम्मू-काश्मीर आणि लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश बनवण्यात आले. राज्यातील परिस्थिती सामान्य झाल्यावर पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्याचे आश्वासन सरकारने त्यावेळी दिले होते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतही भाजपने याचीच पुनरावृत्ती केली होती.

### इस्रायलच्या कारवाईत हिज्बुल्लाचा कमांडर, तोफखाना प्रमुख ठार

**गाझापट्टी :** इस्रायल आणि हिजबुल्लाचा संघर्ष तीव्र झाला आहे. इस्रायल सातत्याने लेबनॉनमधील हिजबुल्लाच्या ठिकाणांवर हल्ले करत आहेत. आता इस्रायली सैन्याने एका ट्विटमध्ये दावा केला आहे की, त्यांनी रविवारी हिजबुल्लावर मोठा हल्ला करत दक्षिण लेबनॉनमध्ये त्यांचे तीन प्रमुख कमांडर ठार केले आहेत. आयडीएफने बिंट जबेल प्रदेशातील हिजबुल्लाचा प्रमुख अहमद जाफर माटौक, त्याचा उत्तराधिकारी आणि त्याच भागातील तोफखाना प्रमुखाच्या हत्येची पुष्टी केली. इस्रायलने इराणवर केलेल्या हवाई हल्ल्यानंतर हा हल्ला झाला. या तिन्ही कमांडरांनी बिंट जबील भागातून असंख्य दहशतवादी हल्ले निर्देशित केले होते, ज्यात इस्रायली नागरिकांवर आणि दक्षिण लेबनॉनमध्ये कार्यरत असलेल्या इस्रायली सैन्यावर क्षेपणास्त्रे डागणे समाविष्ट आहे. इस्रायलने शनिवारी (26 ऑक्टोबर) इराणवर मोठा लष्करी हल्ला केला. ज्यामध्ये इराणचे दोन सैनिक मारले गेले. यापूर्वी इराणने या हल्ल्यात किरकोळ नुकसान झाल्याचे म्हटले होते. इराणच्या अधिकृत वृत्तसंस्थेनुसार, एअर डिफेन्स बेसने या हल्ल्यानंतर सांगितले की, इराणच्या हवाई संरक्षण यंत्रणेने इस्रायलच्या हल्ल्याचा यशस्वीपणे सामना केला.

## अमित ठाकरेंसाठी महायुतीचा 'राज'मार्ग

# एकनाथ शिंदेंकडून सदा सरवणकरांना मिळाला 24 तासांचा अल्टिमेटम

प्रतिनिधी

**मुंबई**

माहीम मतदारसंघावरुन महायुतीत शीतयुद्ध सुरु असल्याचे चित्र आहे. मनसेकडून अमित ठाकरे यांना माहीममधून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांना पाठिंबा दिला जावा अशी महायुतीची भूमिका आहे. मात्र शिंदे सेनेचे सदा सरवणकर माघार घेण्यास इच्छुक नाहीत. सरवणकर यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. त्यामुळे महायुतीच्या नेत्यांमध्ये शिष्टाईचे प्रयत्न सुरू असल्याचे समजत आहे. यादरम्यान एक मोठी घडामोड समोर आली असून, एकनाथ शिंदे यांनी सदा सरवणकर यांना 24 तासांचा अल्टिमेटम दिल्याचे वृत्त आहे.



सदा सरवणकर यांना आपली भूमिका ठरवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 24 तासांची मुदत दिली आहे. नुकतीच सरवणकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. महायुती माहीम विधानसभा मतदारसंघात मनसेचे उमेदवार अमित राज ठाकरेंना पाठिंबा देण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे एकनाथ शिंदे यांनी सदा सरवणकर यांना सांगितले आहे. राज ठाकरे यांनी लोकसभेला मदत केली होती. यापुढेही त्यांची मदत होईल असे शिंदे यांनी सदा सरवणकर यांना सांगितले असल्याचे समजते.

### शेलारांनी मांडली होती भूमिका

अमित ठाकरेंना पाठिंबा देण्यासाठी आशिष शेलार प्रस्ताव पाठवणार असल्याचं समजत आहे. सदा सरवणकरांच्या उमेदवारीला विरोध नाही असंही आशिष शेलार यांनी स्पष्ट केलं आहे.तसेच अमित ठाकरेंना पाठिंबा दिला तर जमणार नाही का? असा उलट सवालही आशिष शेलार यांनी विचारला आहे. दरम्यान अमित ठाकरे 28 ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. सध्याच्या स्थितीनुसार, माहीम मतदारसंघात तिहेरी लढत होणार आहे. शिवसेनेकडून सदा सरवणकर, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून महेश सावंत रिंगणात आहेत.

## राज्यात महायुतीचेच सरकार; फेक नरेटिव्ह चालणार नाही

### देवेंद्र फडणवीसांचा दावा



प्रतिनिधी

**मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकीची तारीख आता काही दिवसांवर आली आहे. या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी आता जोरदार तयारी करण्यास सुरुवात केली आहे. उमेदवारांची नावे देखील जाहीर करणे सुरू असून ही प्रक्रिया देखील आता अंतिम टप्प्यात आली आहे. यंदा सरकार कोणाचे येणार यावर बोलताना महायुतीचे सरकारच येईल असा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

फडणवीस पुढे म्हणाले, हरियाणाबाबत सगळे पोलपंडीत सांगत होते भाजपाचा दारुण पराभव होणार. पण भाजपाला प्रचंड बहुमत मिळाली. त्यामुळे सकाळी टीव्हीसमोर बोलणारे दुपारी काय बोलू या संभ्रमात पडले होते, असे म्हणत त्यांनी संजय राऊत यांच्यावर नाव न घेता टोला लगावला आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला काही प्रमाणात यश मिळवता आले. फेक नरेटिव्हच्या भरवशावर त्यांनी यश मिळवले, असे ते म्हणाले.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, राहुल गांधींनी आरक्षण कसे संपवणार याचा फॉर्म्युला सांगितला. नाना पटोले त्यांचीच रि ओढत आहेत. तसेच लोकसभेच्या निवडणुकीत व्होट जिहाद हा महत्त्वाचा घटक होता. सगळी धार्मिक स्थळे आणि धर्मगुरु व्होट जिहादचा नारा देत होते. आता याचा फायदा होणार नाही. तसेच व्होट जिहादमुळे बहुसंख्य समाजाच्या लक्षात आले की मोदी नकोत म्हणून व्होट जिहाद करणार असेल तर मतपेटीतून उत्तर देता येईल. त्यामुळे फेक नरेटिव्ह आता चालणार नाही.

### लाडकी बहीण योजनेवर विरोधकांचे कन्फ्युजन

लाडकी बहीण योजनेबाबत मी हे सांगू इच्छितो की आमच्या विरोधकांचं कन्फ्युजन बघा. लाडकी बहीण योजनेमुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था कोलमडणार, निवडणुकीनंतर योजना बंद होणार. दुसरीकडे तेच भाषणांमध्ये सांगतात की हे 1500 रुपये देतात आम्ही निवडून आलो तर 2000 रुपये देऊ. यांच्याकडे खजिना आहे का? पैशांचं झाड आहे? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला आहे.

## शिंदे शिवसेनेची दुसरी यादी घोषित वरळीतून देवरा, तर दिंडोशीतून निरुपम

प्रतिनिधी

**मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीची घटक पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाने आपली दुसरी यादी आज, रविवारी जाहीर केली आहे. आदित्य ठाकरेंच्या विरुद्ध मिलिंद देवरा यांना संधी देण्यात आली आहे. याशिवाय मुंबईतील 5 जागांवर उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. यात संजय निरुपम, मुरजी पटेल, तुकाराम काते आणि सुवर्णा करंजे यांचा समावेश आहे.



शिंदे शिवसेनेने 22 ऑक्टोबर रोजी 45 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. यानंतर आज शिंदे सेनेने 20 उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. यात भाजपाचे 3 नेते धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढवताना दिसणार आहेत.

### दुसऱ्या यादीत यांना मिळाली संधी

- अक्कलकुवा – आमश्या पाडवी
- बाळापूर- बळीराम शिरसकर
- रिसोड – भावना गवळी
- हदगाव- बाबुराव कोहळीकर
- नांदेड दक्षिण- आनंद पाटील (बोंडारकर)
- परभणी – आनंद भरोसे
- पालघर – राजेंद्र गावित
- बोईसर (अज) – विलास तरे
- भिवंडी ग्रामिण (अज) – शांताराम मोरे
- भिवंडी पूर्व – संतोष शेट्टी
- कल्याण पश्चिम – विश्वनाथ भोईर
- अंबरनाथ (अजा) – डॉ बालाजी किणीकर
- विक्रोळी – सुवर्णा करंजे
- दिंडोशी – संजय निरुपम
- अंधेरी पूर्व – मुरजी पटेल
- चेंबूर – तुकाराम काते
- वरळी – मिलींद देवरा
- पुरंदर – विजय शिवतारे
- कुडाळ – निलेश राणे
- कोल्हापुर उत्तर – राजेश क्षिरसागर

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीची तिसरी यादी जाहीर

### अभिनेत्री स्वरा भास्करच्या पतीला उमेदवारी

प्रतिनिधी

**मुंबई**

शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी पक्षाची तिसरी यादी आज जाहीर करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन यादीची घोषणा केली. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने यापूर्वी 45 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. त्यानंतर 22 उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली.

तिसऱ्या यादीत बीड जिल्ह्यातील माजलगाव आणि परळी विधानसभा उमेदवारांचा समावेश आहे. यावेळी पवारांच्या राष्ट्रवादीने मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात परळीतून राजेसाहेब देशमुख यांना उतरवले आहे. तर माजलगावमध्ये अजित पवार यांच्या आमदार प्रकाश सोळंके यांना मोहन जगताप टक्कर देणार आहेत. तर अभिनेत्री स्वरा भास्कर यांच्या पतीला तिकीट दिले आहे.

1. करंजा - ज्ञायक पटणी
2. हिंगणघाट - अतुल वांदिले
3. हिंगणा - रमेश बंग
4. अणुशक्तीनगर - फहाद अहमद
5. चिंचवड - राहुल कलाटे
6. भोसरी - अजित गव्हाणे
7. माजलगाव - मोहन जगताप
8. परळी - राजेसाहेब देशमुख
9. मोहोळ - सिद्धी रमेश कदम

## जयश्री थोरातांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य; वसंत देशमुख पोलिसांच्या ताब्यात

**पुणे**

जयश्री थोरात यांच्यावर आक्षेपार्ह भाषेत टीका करणाऱ्या सुजय विखे समर्थक वसंत देशमुख यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. गुन्हे शाखेने ही कारवाई केली असून त्यांना पुण्यातून ताब्यात घेतल आहे.

बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांच्यावर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी वसंत देशमुख यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून ते गायब झाले होते. स्थानिक गुन्हे शाखेने आज त्यांना नगर जिल्ह्याबाहेरुन ताब्यात घेतले आहे. त्यांना लवकरच जिल्ह्यात आणले जाणार आहे. त्यानंतर त्यांना कोर्टात हजर करण्यात येईल. शुक्रवारी रात्री धांदरफळ येथे सुजच विखे यांच्या वतीने आयोजित मेळाव्यात बोलताना वसंत देशमुख यांनी भाषणादरम्यान बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांच्या टीका करताना आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी सभास्थळी ठिय्या आंदोलन केले होते.

## फडणवीस आमचे राजकीय विरोधक, शत्रू नाहीत !

### संजय राऊतांच्या विधानाने चर्चेला उधाण

प्रतिनिधी

**मुंबई**

सध्या राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. जागावाटप आणि अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टींवर सध्या राज्यात गोंधळ सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यातच खासदार संजय राऊत यांनी एक महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्याशी आमची दुश्मनी नाही. ते आमचे राजकीय विरोधक आहेत, शत्रू नाही असेही ते यावेळी म्हणाले आहेत. राऊतांच्या या विधानाने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्याशी आमची वैयक्तिक दुश्मनी नाही. ते फक्त आमचे राजकीय शत्रू आहेत, असे संजय राऊत माध्यमांशी बोलले



आहेत. महाराष्ट्राची एक राजकीय संस्कृती आहे. आम्ही कोणाशीही व्यक्तिगत वैर ठेवत नाही. तसेच उद्धव ठाकरे यांचे फडणवीसांना उद्देशून असलेले, 'एकतर तू तरी राहशील, नाहीतर मी तरी राहीन', हे वक्तव्य फक्त राजकारणापुरते मर्यादित होतं, असेही राऊतांनी यावेळी स्पष्ट केले आहे.

### उमेदवार मागे घ्यायला पंडित नेहरू उभे आहेत का ?

तसेच माहीममध्ये आमचा उमेदवार मागे घ्यायला तिकडे पंडित नेहरु उभे आहेत का ? इंदिरा गांधी किंवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर उभे आहेत? ज्यांच्यासाठी उमेदवार मागे घेण्याचा निर्णय घ्यावा. तरुण मुलांना राजकारणात लढू द्या. त्यांना राजकारण घासूनपुसून कळू द्या. त्यांना समजू द्या राजकारणात काय त्रास आहे तो. तरच त्यांचे नेतृत्व उभे राहील. आम्ही काय राजकारणात सहजपणे इथपर्यंत आलो आहोत का ? असे माहीम विधानसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाच्या सदा सरवणकर यांनी माघार घेतली तर ठाकरे सेना आपला उमेदवार मागे घेणार का, या प्रश्नावर राऊतांनी उत्तर दिले आहे.




# वांद्रे स्थानकात चेंगराचेंगरी

### ९ प्रवासी जखमी, दोन जणांची प्रकृती गंभीर

प्रतिनिधी

**मुंबई**

मुंबईमधील वांद्रे रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली . या चेंगराचेंगरीमध्ये ९ प्रवासी जखमी झाले आहेत. तसेच यातील दोण जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती सांगण्यात आली आहे. जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

वांद्रे टर्मिनस रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर पहाटे ५ वाजताच्या सुमारास ही घटना घडली असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. स्पेशल ट्रेन १६ तास उशीरा आल्यामुळे रेल्वेत चढण्यासाठी प्रवाशांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. रेल्वेत चढत असतानाच झालेल्या गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली आणि यामध्ये काही प्रवाशी प्लॅटफॉर्मवर पडले. त्यामुळे चेंगराचेंगरी होऊन ९ प्रवासी जखमी झाले आहेत.



### स्पेशल ट्रेन १६ तास उशीरा आल्याने दुर्घटना

वांद्रे ते गोरखपूर या रेल्वेने प्रवास करण्यासाठी प्रवाशांनी मोठी गर्दी केली होती. त्यामुळे रेल्वे आल्यानंतर प्रवाशांनी रेल्वेत चढण्यासाठी मोठी गर्दी केली आणि या गर्दीमुळे चेंगराचेंगरीची घटना घडली. या चेंगराचेंगरी दरम्यान काही प्रवाशी प्लॅटफॉर्मवर पडले आणि त्यामध्ये ते जखमी झाले. यानंतर त्यांना रेल्वे प्रशासनाकडून तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर सध्या उपचार सुरु आहेत. मात्र, यातील दोन प्रवाशांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.

## दिवाळीच्या पूर्वसंध्येला राहुल देशपांडे यांची अनोखी मैफल

**मुंबई :** गतवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीनिमित्त मुंबई आणि ठाणेकरांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी सुगी ग्रुपतर्फे वसंतोत्सव या प्रतिष्ठित संगीत महोत्सवाचे आयोजन केले आहे. त्यामध्ये द राहुल देशपांडे कलेक्टिव्ह शास्त्रीय संगीत गायक राहुल देशपांडे यांची मैफल बोरिवली, ठाणे आणि डोंबिवली येथे २९ आणि ३०ला रंगणार आहे. राहुल देशपांडे यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि उंची सांगीतिक अनुभव देणाऱ्या या संगीत मैफलीमुळे यंदाची दिवाळी अविस्मरणीय ठरणार आहे. 'वसंतोत्सव' अंतर्गत २९ ऑक्टोबरला रात्री नऊ वाजता 'द राहुल देशपांडे कलेक्शन'चे दिवाळी विशेष आवृत्तीतील पहिले पुष्प डोंबिवली येथील सावित्रीबाई फुले नाट्यगृह येथे गुंफले जाणार आहे. त्यानंतर ३० ऑक्टोबरला सकाळी सात वाजता ठाणे येथील काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे हा कार्यक्रम होणार असून त्याच दिवशी रात्री नऊ वाजता बोरिवली येथील प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहात तिसरे पुष्प गुंफले जाणार आहे. राहुल देशपांडे हे हिंदी चित्रपट संगीतातील गाजलेली गाणी आणि इतर सांगीतिक आविष्कार अगदी आगळ्यावेगळ्या पद्धतीने सादर करतात. या सांगीतिक आविष्कारांचे विविध पैलू ते या मैफलीत सादर करतात.



## थोडक्यात

### ज्येष्ठांसाठी 'मरे'वर राखीव डबा असलेली लोकल डिसेंबरअखेर

**मुंबई:** वर्षाअखेरीस ज्येष्ठ नागरिकांचा मुंबई लोकलमधील प्रवास अधिक सुखकर होण्याची चिन्हे आहेत. ज्येष्ठांसाठी राखीव डब्याचा समावेश असलेली उपनगरी रेल्वे गाडी डिसेंबरमध्ये मध्य रेल्वेच्या ताफ्यात दाखल होणार आहे. मालडब्याची पुनर्रचना करून तो ज्येष्ठासाठी राखीव करण्यात येणार आहे. यामुळे डब्यांच्या संख्येत कोणताही बदल होणार नसला तरी ज्येष्ठांच्या आसन संख्येत दुपट्टीने वाढ होणार आहे.लोकलमधून ज्येष्ठ नागरिक रोज हजारोच्या संख्येने प्रवास करत आहेत. मात्र त्यांच्यासाठी राखीव आसनांची संख्या अत्यंत मर्यादित आहे. यामुळे के. पी. पुरुषोत्तम नायर यांनी रेल्वे प्रशासनाविरुद्ध जनहित याचिका दाखल केली होती. सप्टेंबरमध्ये सुनावणीदरम्यान, ज्येष्ठांसाठी समर्पित डबा उपलब्ध होत नाही तोपर्यंत, ज्येष्ठ नागरिकांना मालडबा वापरण्यासाठी मुभा द्या, अशा सूचना मुंबई उच्च न्यायालयाने रेल्वे प्रशासनाला दिल्या होत्या. सुनावणीदरम्यान झालेल्या युक्तिवादात लोकलमधून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणींचा लेखाजोखा याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी मांडला.

### डोळ्यांचा संसर्ग वाढवतेय कॉर्नियासंबंधी समस्या

**मुंबई:** भारतात कॉर्नियासंबंधी समस्या वाढत चालल्या आहेत. देशात दरवर्षी अंदाजे २० ते २५ हजार नवीन रुग्ण आढळत असल्याचे मत वैद्यकीय तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. एकूण अंधत्व सुमारे ७.५ टक्के आहे. कॉर्नियाविषयक अंधत्वाची कारणे अलीकडच्या वर्षांत केराटायटिससारख्या संसर्गजन्य रोगांपासून डोळ्यांच्या आघात आणि इतर गुंतागुंतींमध्ये बदल झाले आहेत. ग्रामीण भागात डोळ्यांच्या उपचारांवर मोठी मर्यादा येते, असे डॉ. अगरवाल्ज आय रुग्णालयाचे कॅटरॅक्ट सर्जन डॉ. स्मित बावेरिया यांनी सांगितले. केराटायटिस सामान्यतः सौम्य जळजळ, लालसरपणा किंवा दृष्टीदोषापासून कॉर्नियावर गंभीर व्रण किंवा अपारदर्शकतेपर्यंत वाढत जातो. उपचार न केल्यास आंशिक किंवा संपूर्ण दृष्टी नष्ट होते. त्यामुळे लवकर हस्तक्षेप करणाऱ्या रूग्णांमध्ये, ज्यांना संसर्ग किंवा किरकोळ दुखापत झाली आहे, अशा रुग्णांमध्ये उपचार सर्वात प्रभावी आहे. डॉ. अग्रवाल्स आय बँक वरिष्ठ कॉर्निया आणि वैद्यकीय डायरेक्टर डॉ. प्रीती नवीन म्हणाल्या, कॉर्नियलसंबंधी अंधत्वातून सुमारे १२ लाख लोक ग्रस्त आहेत. कॉर्नियाविषयक अंधत्त्वाचे उच्च प्रमाण प्रामुख्याने ट्रॅकोमा आणि केराटायटिस सारख्या संसर्गांमुळे, औद्योगिक आणि कृषी क्षेत्रातील डोळ्यांच्या दुखापतीमुळे आणि अ जीवनसत्वाच्या व्यापक कमतरतेमुळे होते. स्वच्छतेचा अभाव, विलंबित वैद्यकीय हस्तक्षेप आणि विशेषतः ग्रामीण भागात आरोग्य सेवेची मर्यादित उपलब्धता सर समस्येत आणखीनच भर घालते.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वसई, नालासोपारा, बोईसर विधानसभेसाठी अर्जोत्सवाचा माहोल

## ठाकूर, पाटील, गावडे अर्ज भरणार

प्रतिनिधी
■ वसई

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत २९ ऑक्टोबर असल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. आज (२८ ऑक्टोबर) वसई विधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदार हितेंद्र ठाकूर आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. नालासोपारा मतदारसंघातून त्यांचे पुत्र आमदार क्षितीज ठाकूर अर्ज दाखल करतील. याशिवाय, महाविकास आघाडीचे उमेदवार विजय पाटील, बोईसरचे आमदार राजेश पाटील आणि स्वराज अभियानचे अपक्ष उमेदवार धनंजय गावडे हे उद्या (२९ ऑक्टोबर) अर्ज दाखल करणार आहेत.

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी कार्यकर्त्यांच्या गर्दीसह शक्तीप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून पोलिसांचा मोठा फौजफाटा सुरक्षेसाठी तैनात करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज प्रक्रियेत अनुशासन राखण्यासाठी प्रशासनाची जय्यत तयारी आहे.महाविकास आघाडीने वसई मतदारसंघासाठी विजय पाटील यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे बहुजन विकास आघाडी आणि काँग्रेस यांच्यातील संभाव्य आघाडीची शक्यता मावळली आहे. दुसरीकडे, महायुतीने वसईसाठी अद्याप उमेदवार निश्चित केलेला नाही.तर नालासोपारा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीने उमेदवार जाहीर केलेला नसल्याने तिकीट मिळवण्यासाठी इच्छुकांमध्ये धावाधाव सुरू आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वसई आणि नालासोपारा मतदारसंघातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. नेते आणि कार्यकर्ते शक्तीप्रदर्शनाच्या माध्यमातून शक्ती दाखवण्यास सज्ज आहेत. तर प्रशासनाकडून कडक सुरक्षा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### *विजय पाटील यांचे 'विजय' स्वप्न*

*या निवडणुकीत पुन्हा एकदा विजय पाटील आणि बहुजन विकास आघाडीचे आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यात तीव्र संघर्ष रंगणार आहे. गतवर्षी शिवसेना-भाजप युतीकडून लढणारे विजय पाटील यावेळी महाविकास आघाडीतून काँग्रेसच्या तिकीटावर निवडणूक लढवत आहेत. यापूर्वीच्या निवडणुकीत पाटील यांना सुमारे २५,९५५ मतांनी पराभव पत्करावा लागला होता.२०१९ च्या निवडणुकीत हितेंद्र ठाकूर यांना तब्बल १,०२,९५० मते मिळाली होती, तर पाटील यांना ७६,९५५ मते मिळाली होती. यंदाच्या निवडणुकीत वसई विधानसभा क्षेत्रात राजकीय परिस्थितीत काहीसे बदल दिसत असून महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांमधील चुरस वाढली आहे. लोकसभेत भाजप-शिंदे गटाचे प्रभावी मतप्रदर्शन पाहता वसईत बहुजन विकास आघाडीविरोधात जोरदार तुल्यबळ उमेदवार महायुतीकडून उभा केला जाण्याची शक्यता आहे.ठाकरे गटानेही मागील निवडणुकीत बहुजन विकास आघाडीच्या विरोधात प्रभावी मते घेतली होती, ज्यामुळे महाविकास आघाडीला या लढतीत विजयाची संधी दिसत आहे. विजय पाटील यांच्या विजयाबद्दल महाविकास आघाडीचे कार्यकर्ते आशावादी आहेत. मात्र प्रत्यक्ष निकालानंतरच वसईच्या या चर्चेत असलेल्या लढतीत विजय पाटील यांचे राजकीय भवितव्य ठरेल.*

# बापाणे-कामण रोडला वन विभागाची मंजूरी

## रखडलेलं काम लवकरच मार्गी

प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्वमधील वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि वेळ व इंधन बचत करणारा बापाणे-कामण रोड वन विभागाच्या मंजुरीनंतर आता पूर्णत्वाकडे वाटचाल करणार आहे. लोकनेते आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अखेर या प्रकल्पाला हिरवा कंदील मिळाला असून रखडलेले काम लवकरच सुरू होणार आहे.

सुमारे १७ कोटी १२ लाख ५४ हजार ८२३ रुपयांचा खर्च अपेक्षित असलेल्या या रस्त्याचे भूमिपूजन आमदार ठाकूर यांच्या हस्ते झाले होते. पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असले तरी दुसऱ्या टप्प्यातील कामण नदीवरील पूल आणि बापाणेकडील रस्ता वन विभागाच्या विविध परवानग्यांमुळे रखडला होता. तीन वर्षांच्या प्रयत्नांनंतर वन विभागाची परवानगी मिळाल्यामुळे आता काम वेगाने होईल.बापाणे-कामण रोड मुळे सध्याचा चिंचोटी मार्गाने होणारा ६.५ किलोमीटरचा प्रवास ४ किलोमीटरवर येणार आहे, ज्यामुळे अवघ्या पाच मिनिटांत अंतर पार करता येईल. वसई, नायगाव, भिवंडी, मुंबई आणि ठाणे येथील नागरिकांना याचा मोठा फायदा होईल. यामुळे इंधन आणि वेळेची बचत होऊन पूर्व पट्ट्याच्या सर्वांगीण विकासालाही चालना मिळेल. या मार्गामुळे परिसरातील वाहतूक कोंडीही कमी होण्यास मदत होईल.

बापाणे-कामण रोड हा १५ मीटर रुंद आणि १.८५ किलोमीटर लांबीचा असणार आहे. यामध्ये ६० मीटर लांबीच्या आरसीसी पुलाचाही समावेश आहे. या कामाची वेळोवेळी पाहणी केली जात असून प्रकल्पाच्या अडचणी सोडविण्यासाठी आमदार ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू आहे. माजी सभापती कन्हैया भोईर यांनी स्पष्ट केले की, या रस्त्यामुळे कोणत्याही नागरिकांची घरे किंवा सार्वजनिक सुविधा बाधित होणार नाहीत.

# दिवाळीनिमित्त बाजारात इंडो-वेस्टर्नचा ट्रेंड

## खरेदीसाठी मुंबईकरांकडून गर्दी

प्रतिनिधी
■ मुंबई

दिवाळी सणांला उद्यापासून म्हणजेच सोमवारी सुरुवात होत आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबईकरांनी दादर, लालबाग, परळ, सीएसएमटी येथील क्रॉफर्ड मार्केट, फॅशन स्ट्रीट आदी ठिकाणी खरेदीसाठी शनिवारी आणि रविवारी अलोट गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. मुंबईकर कपडे आणि ॲक्सेसरीजमध्ये इंडो-वेस्टर्न ट्रेंडनुसार खरेदी करताना दिसत आहेत. दिवाळीनिमित्त पारंपरिक कपडे परिधान करण्याकडे आजच्या युवा पिढीचा कल असतो. यासाठी पंजाबी पटियाला सूट, फ्लेअर्ड ड्रेस, मॅक्सी ड्रेस, भरजरी कुर्ते हे सर्व तरुणींच्या विशेष पसंतीचे पोशाख गेल्या काही काळापासून बनले आहेत.

याच पार्श्वभूमीवर धोती ड्रेस, सिगार पँट व कुर्ते, स्टोनवर्कचे घागरे, कुर्ते यामध्ये बाजारात संध्या विविधता उपलब्ध आहे. तसेच रेशमी कपड्यांवर कुंदन वर्क केलेले स्कर्ट आणि त्यावर क्रॉप टॉप हेसुद्धा हल्ली ट्रेंडमध्ये आहे. स्कर्टवर क्रॉप टॉप व त्याला लाँग कोटी स्टाइल कुर्ता परिधान केल्यानंतर याला एथनिक लूक देता येणारे कपडे बाजारात उपलब्ध आहेत. तसेच रेशमी एम्ब्रॉयडरी, बिड्स वर्क, एथनिक गाउनला महिला मोठ्या प्रमाणात पसंती देताना दिसतात. असे कपडे खरेदी करण्यासाठी मुंबईकरांनी दादर, लालबाग, परळ, सीएसएमटी येथील क्रॉफर्ड मार्केट, फॅशन स्ट्रीट आदी ठिकाणी खरेदीसाठी गर्दी केल्याचे पाहायला मिळाले.

**मुंबई :** घाटकोपर पूर्वेकडील सार्वजनिक उत्सव मंडळ पटेल चौकाने आदिवासींच्या सानिध्यात जावून यंदा आगळी वेगळी दिवाळी मंडळाच्या कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी साजरी केली. आदिवासी लोकांना दिवाळी निमित्त रायगड जिल्ह्यातील उरण तालुका खारपाडा वैश्विवाडी येथे फराळ वाटप,कपडे वाटप करण्यात आले. यावेळी मंडळाचे मंगेश जाधव,रवींद्र जाधव,अनिल कदम,विजय लाड, सचिन भांगे,सिद्धेश भांगे,यश जाधव,गणेश हुमणे,मनोज माळवदे,ओमकार कदम,निखिल करंबे,जितू सोनी आणि निलेश जाधव,उपस्थित होते. मंडळ पटेल चौक नियमितपणे मागील अनेक वर्ष आदिवासी भागात बालगोपाळ व आदिवासी बांधवांसह दिवाळी साजरी करतात.



# त्या 41 अनधिकृत इमारतींवर कारवाई अटळ; कारवाईसाठी पालिका यंत्रणा सज्ज

प्रतिनिधी
■ वसई

नालासोपारा येथील आरक्षित डम्पिंग ग्राउंड आणि एसटीपीसाठी राखीव असलेल्या ३० एकर भूखंडावर अनधिकृतपणे उभारलेल्या ४१ इमारतींवर ३१ ऑक्टोबरपूर्वी कारवाई करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. यामुळे वसई-विरार महापालिकेने या कारवाईसाठी सविस्तर मास्टर प्लॅन तयार केला आहे. या कारवाईदरम्यान कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात येणार आहे.

महापालिका सूत्रांनुसार, नालासोपारा गावातील आचोळे परिसरातील २२, २३, २६, २७, २८, २९, ३० या सर्वे क्रमांकांच्या भूखंडावर सरकारी जमिनीवर बेकायदेशीररीत्या कब्जा करून बहुजन विकास आघाडीचा माजी नगरसेवक सीताराम गुप्ता याने या जागेवर ४१ अनधिकृत इमारती बांधल्या आहेत.

बोगस दस्त नोंदणी व बेकायदेशीर बांधकाम परवानग्यांच्या आधारे उभ्या राहिलेल्या या इमारतींमध्ये सुमारे ३ हजार कुटुंबे राहतात. न्यायालयाच्या आदेशामुळे ही सर्व इमारती पाडण्याची प्रक्रिया आता अटळ ठरली आहे.स्थानिकांनी याविरोधात मोठी आंदोलने केली असली तरी न्यायालयाच्या आदेशामुळे प्रशासनाची कारवाई रोखण्यास अडथळा निर्माण होणार नाही.

या कारवाईदरम्यान कायदा-सुव्यवस्था बिघडू नये म्हणून महापालिकेने मुख्य रस्त्यांना बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, इमारतीतील रहिवाशांना घरे खाली करण्यास नोटिसा आधीच जारी करण्यात आल्या आहेत. फसवणूक झालेल्या नागरिकांना संबंधित भूमाफियाविरुद्ध आर्थिक गुन्हे शाखेत तक्रारी दाखल करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

या कारवाईमुळे सुमारे ३ हजार कुटुंबांचे घर उद्ध्वस्त होण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये असंतोष आणि चिंता आहे.

# श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत एमडी कॉलेजची 'ब्रह्मपुरा' विजेती

प्रतिनिधी
■ मुंबई

श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठान आयोजित १३व्या चुरशीच्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत महर्षी दयानंद कॉलेजने सादर केलेल्या 'ब्रह्मपुरा'ने अंतिम फेरीत मानाचा विघ्नहर्ता करंडक जिंकून स्पर्धेतील अजिंक्यपद पटकावले.माटुंग्याच्या यशवंत नाट्यगृहात नुकताच मोठ्या दिमाखात हा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.



या स्पर्धेचे नाटककार कुमार सोहनी,ज्येष्ठ रंगकर्मी नारायण जाधव, डॉ.श्याम शिंदे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले,सिनेनाट्य अभिनेते सतीश सलागरे, रमेश रोकडे तसेच मनोहर सकपाळ(उद्योजक) सदानंद चांदे,सुरेशचंद्र तारकर समाजसेवक आदी मान्यवर उपस्थित होते.संस्थेचे अध्यक्ष दत्ता मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.विशाल साळवे यांनी सूत्रसंचलन केले.

श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठानच्या एकांकिका स्पर्धेत सिडनहॅम महाविद्यालयाने सादर केलेल्या "अविघ्नेया" या एकांकिकेला द्वितीय, ज्ञान साधना महाविद्यालयाने सादर केलेल्या "कुक्कर" एकांकिकेला तृतिय पारितोषिक मिळाले.उत्तेजनार्थचे पारितोषिक कलाराग नेरुळच्या "ऑन टॉप ऑफ"एकांकिकेला मिळाले.

लेखनात प्रथम मोहन बनसोडे (अविघ्नेया),तर द्वितीय पारितोषिक रोहित कोटेकर(ब्रम्हपुरा) यांना मिळाले. अभिनयात (पुरुष) प्रथम-साई निरावडेकर(अविघ्नेया), द्वितीय- स्वप्निल पाटील (ब्रह्मपुरा) (स्त्री) प्रथम-श्रावणी ओव्हाळ (अविघ्नेय) द्वितीय रिया सूर्यवंशी (ऑन द टॉप) नैपथ्य-प्रथम यश पवार (ब्राह्मपुरा) द्वितीय सिध्देश नांदलोस्कर (कुक्कर) संगीतात प्रथम- अक्षर घांगर (अविघ्नेया). द्वितीय-संकल्प झोडे (ब्रह्मपुरा) प्रकाश योजना-प्रथम सिध्देश नांदलस्कर (कुक्कर), द्वितीय-राजेश शिंदे (ऑन टॉप ऑफ) यांना पारितोषिके मिळाली. संस्थेच्यावतीने राज जैतपाळ, अमन दळवी,विजय सक्रे,महेंद्र कुरघोडे, श्याम चव्हाण, यांनी काम पाहिले

# घाटकोपरमध्ये ओंकार अंध केईव्हीके सोसायटीतर्फे 36वा दिपावली भेट वस्तू वाटप कार्यक्रम संपन्न

## ३५०० गरजू अंध महिला पुरुषांना दीपावलीची वार्षिक भेट

प्रतिनिधी
■ मुंबई

ओंकार अंध केईव्हीके सोसायटी घाटकोपर मुंबई या सामाजिक संस्थेच्या वतीने अंध महिला पुरुषांना ३६ वा दीपावली सप्रेम भेट कार्यक्रम घाटकोपर पूर्व पंतनगर येथील अरुणकुमार वैद्य मैदान येथे रविवार दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आला होता.

सालाबादप्रमाणे याही वर्षी संस्थेचे सक्रिय सदस्य देवरे पाटील, धर्मेश गिरी यांच्या पुढाकारातून दीपावली निमित्त जे वंचित आणि गरजू आहेत असे ३५०० अंध महिला पुरुष व्यक्तींना ओंकार अंध केईव्हीके सोसायटी तर्फे फराळी किराणा, मिठाई इत्यादींसह खाद्यपदार्थांच्या भेटवस्तू वितरण करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे नम्रमुनी महाराज, माजी खासदार मनोज कोटक, आमदार पराग शाह, विकासक सुंदर भाई शाह,



चंद्रकांत घोघरी, यांच्यासह संस्थेचे प्रमुख पदाधिकारी देवरे पाटील, धर्मेश गिरी, नितीन शाह, विपुल मेहता आदीसह कार्यकर्त्यांच्या हस्ते भेट वस्तू वाटप करण्यात आले. दरम्यान सर्व सहभागी झालेल्या गर्जुना सर्व खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

या दिपावली भेट वस्तूंचा राज्य भरातील कोकण, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबई येथील ३५०० अंध बंधू बघिणी आणि विधवा बहिणींना लाभ मिळाला आहे. अशा प्रकारे राज्य भरात ठीक ठिकाणी दिपावली भेट वस्तू वाटप करण्यात येत असून गुजरातमध्ये ही ओमकार अंध केईव्हीके सोसायटी तर्फे दिपावली भेट वस्तूंचे वाटप करत असल्याचे आयोजक देवरे पाटील व धर्मेश गिरी यांनी सांगितले. या वाटप कार्यक्रमात संस्थेच्या कार्यकर्ते सदस्यांनी प्रचंड मेहनत घेतली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ओंकार अंध केईव्हीके सोसायटी चे सदस्य अशोक टी. देवरेपाटील, धर्मेश गिरी, प्रविणभाऊ तन्ना, विपुलभाई मेहता (छायाचित्रकार), कमलेशभाई ठोसानी (केटरर), डॉ. अनिल सेमवाल, निरुपा नितीन शहा,सचिन रूपारेल, विपुल के. पारेख, भावेश गिरी आदिसह सहकाऱ्यांनी मेहनत घेऊन हा दीपावली भेट कार्यक्रम यशस्वी केला.

# महामुंबई शिक्षण संस्था संघटनेची सहविचार सभा



■ मुंबई

महामुंबई शिक्षण संस्था संघटनेच्या संस्थाचालकांची वार्षिक सर्वसाधारण सभा विक्रोळीच्या विकास हायस्कूल सभागृहात यशस्वीरीत्या पार पडली. सदर संस्था गेली 39 वर्षे शिक्षण क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहे. या सभेत संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष स्व. प. म. राऊत, सदस्य स्व. बाळासाहेब हांडे आणि स्व. केशव सामंत यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात आला. सभेत शिक्षण विभागाच्या नर्सरी ते उच्च माध्यमिक विद्यालयांशी संबंधित विविध समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. संचमान्यता, विद्यार्थी सुरक्षेबाबत शैक्षणिक संस्थांनी करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला, तसेच नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण 2024 या शासकीय निर्णयांच्या अनुषंगाने चर्चा झाली. विशेष आमंत्रित माजी केंद्रीय मंत्री, ॲड. डॉ. विजय नवल पाटील, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ, पुणे, डॉ. प्रकाश पाटील,विश्वस्त सिंहगड शिक्षण संस्था, पुणे तसेच गिरीश सामंत, सुदाम कुंभार यांनी विविध शैक्षणिक विषयांवर मार्गदर्शन केले. महामुंबई शिक्षण संस्था संघटनेचे सर्व सदस्य आणि मुंबई-ठाणे येथील मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू व इतर प्रादेशिक माध्यमाच्या संस्थाचालकांनी सभेत सक्रिय सहभाग घेतला.

# चर्नी रोड पूर्वेला स्टेशन जवळ साडेचार कोटी खर्चून पालिका बांधणार नवा पादचारी पूल

प्रतिनिधी
■ मुंबई

चर्नी रोड पूर्वेला स्टेशन लागत असलेल्या महर्षी रोडवरील अपघातांना आळा बसण्यासाठी मुंबई महानगरपालिका सैफी रुग्णालयाच्या पदपथालगत साडेचार कोटी रुपये खर्चून नवा पादचारी पूल बांधणार आहे. या कामाच्या आराखड्याला महानगरपालिकेने मंजुरी दिल्यानंतर आता निविदा सुद्धा मंजूर करण्यात आली आहे.

महर्षी कर्वे रस्ता हा वाहतुकीची प्रचंड वर्दळ असते. त्यामुळे रस्ता ओलांडताना अनेकदा तिथे अपघात होतात. आता पादचारी पूल बांधला जाणार असल्याने अशा अपघातांना आळा बसणार आहे.

या परिसरातील केळेवाडी येथील जुना पूल पाडून टाकल्यानंतर तेथे नवा पूल उभारला जाणार होता. त्यासाठी कंत्राटदाराने जागेची पाहणी, मृदा चाचणी आदी सोपस्कार पार पाडून पायाचे खोदकाम करण्याची तयारी सुरू केली होती. पण या कामाला गल्लीतील रहिवाशांनी विरोध केल्यामुळे ही योजना बारगळली. त्याऐवजी सैफी रुग्णालयाच्या पदपथालगत नवा पादचारी फुल बांधण्याची शिफारस स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली. त्यानुसार पुलाचा आराखडा, नियोजन, संकल्पचित्र आणि अंदाजपत्रक तयार करण्यासाठी टीपीएफ इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेड या तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी एकत्रित अनुसूचीनुसार या पुलाचे अंदाजपत्रक तयार केले. ते दोन कोटी 98 लाख 59 हजार रुपये खर्चाचे होते.

महापालिकेने या कामासाठी निविदा मागविल्या असता बुकॉन इंजिनियर्स अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांची उणे 15.48 टक्के दराची निविदा ही लघुत्तम देकाराची ठरली. ती मंजूर करण्याची शिफारस स्थायी समितीला करण्यात आली होती. जीएसटी, भौतिक सादिलवार, पाणीपट्टी -मल नि:सारण कर, दहा टक्के पर्यवेक्षण आकार आणि सल्लागारांचे शुल्क तसेच भूमिगत सेवा वळविण्याचा खर्च लक्षात घेता या कंत्राटाची एकूण किंमत चार कोटी 51 लाख 70 हजार रुपये इतकी होत आहे. त्याला महानगरपालिकेने मंजुरी दिल्याने या पुलाचे काम लवकरच मार्गी लागणार आहे.

***असा असेल पूल***

*लांबी -18.8 मीटर, रुंदी -तीन मीटर, गाळे म्हणजेच स्पॅन- एक स्पॅनची लांबी- 17.30 मीटर , पायाचे बांधकाम- आरसीसी पाइल्स आणि पाईल कॅप, बांधकामाचा प्रकार- स्टील गर्डर आणि आरसीसी डेक स्लॅब*

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल मीरा श्रीराम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित पत्ता. एम.टी.एन.एल रोड, शांती पार्क, मिरा रोड (पूर्व) ता व जि ठाणे ४०११०७, यांच्या मालकीची मौजे भाईंदर येथे जुना सर्व्हे क्र. ७२८, नवीन सर्व्हे क्र. १२१, क्षेत्र १८३७ चौ.मी. (अंदाजे) जागा आहे.
सदर संस्थेने आपल्या इमारतीचा पुनर्विकास करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी त्यांनी इच्छुक विकासकाकडून आपल्या इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी अर्ज मागविले होते. त्या अनुषंगाने ३ विकासकांनी संस्थेकडे इमारत पुनर्विकास करण्यासाठी अर्ज केले आहेत. संस्था पुन्हा एकदा विकासकांना आपल्या जागेचे पुनर्विकासासाठी संधी देऊ पाहत आहे. व त्यासाठी संस्थेने ज्या विकासकांनी किमान ३ इमारती बांधल्या आहेत त्याची माहिती देऊन वरील इमारतीचे पुनर्विकास करण्यासंदर्भातील आपले अर्ज बंद लिफाफ्यात खालील पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत देण्यात यावे. १४ दिवसाचे आत आलेल्या अर्जावर तसेच पूर्वीच्या ३ अर्जावर संस्था विचार विनिमय करून योग्य असलेल्या अर्जावर निर्णय घेतील. आलेले अर्ज स्विकारण्याचा तसेच नाकारण्याचा अधिकार (कुठलेही कारण न देता) सदर संस्थेला असेल याची नोंद घ्यावी. इच्छुक विकासकांना जागा तसेच कागदपत्रे पाहणे असल्यास त्यांनी खालील फोनवर संपर्क साधून आगाऊ सुचना द्यावी.
कळावे,
**ॲड. जॉन एम. रॉड्रीक्स**
**वकील**
**पत्ता. ऑफिस क्र.२, पहिला मजला, न्यू शांती गंगा अपार्टमेंट, स्टेशन रोड, भाईंदर (पू), ता. व जिल्हा ठाणे, ४०११०५**
**मो.९८९२४०१३४९**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vrittamanas1@gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issue - 128
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मिडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडावळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मिडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे**, E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - १२८
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## दिलीप प्रभावळकर पहिल्यांदा करणार 'पत्रापत्रीचे' अभिवाचन

**मुंबई :** दिलीप प्रभावळकर पहिल्यांदा इंटरनॅशनल आदित्य बिर्ला सेंटर परफॉर्मिंग आर्ट्स प्रस्तुत रॉयल ऑपेरा हाऊसमध्ये सादरीकरण करणार आहे. त्यांच्या बहुचर्चित पत्रापत्री या अभिवाचनाचा प्रयोग ९ नोव्हेंबर रोजी ऑपेरा हाऊसमध्ये होणार आहे. आतापर्यंत देश- परदेशातील अनेक थिएटरमध्ये सादरीकरण केलेल्या प्रभावळकरांनी याआधी कधीही ऑपेरा हाऊस थिएटरमध्ये सादरीकरण केले नव्हते. त्यामुळे या प्रयोगासाठी ते स्वतः फार उत्सुक आहेत.लेखनामध्ये असो की अभिनयामध्ये वेगवेगळे प्रयोग करण्याला प्राधान्य देणारे अष्टपैलू रंगकर्मी दिलीप प्रभावळकर पुन्हा एकदा काही तरी नवीन करायला जात आहेत. विशेष म्हणजे प्रभावळकर पहिल्यांदा असं काही करणार आहेत जे त्यांनी आपल्या संपूर्ण करिअरमध्ये कधीच केलं नव्हतं.



## मुंबईतील पर्यटकांचा पुन्हा खुल्या आकाशाखाली प्रवास?

प्रतिनिधी
■ मुंबई

पर्यटकांसाठी आकर्षण असलेली आणि मुंबईदर्शन घडवणारी बेस्टच्या ताफ्यातील शेवटची ओपन डेक बस अर्थात, 'निलांबरी'चे आयुर्मान संपल्याने ऑक्टोबर २०२३मध्ये या बस सेवेतून हद्दपार करण्यात आल्या. त्यानंतर या सेवांना मिळणाऱ्या चांगल्या प्रतिसादामुळे बेस्टकडून नवीन डबल डेकर 'ओपन डेक' बस भाडेतत्त्वावर घेण्यात येणार होत्या. मात्र, निविदांना प्रतिसादच मिळत नसल्याने हा प्रकल्प मागे पडला. आता बेस्टने पुन्हा अशा बसचा विचार सुरू केला असून, एका खासगी कंपनीला ओपन डेक पर्यटन बस चालवण्यासंदर्भात विचारणा केली आहे. कंपनीकडून यावर विचार सुरू आहे.

बेस्ट उपक्रमाने 'एमटीडीसी'च्या मदतीने २६ जानेवारी १९९७ला नॉन एसी ओपन डेक बस सुरू केली. यामध्ये अप्पर डेक आणि लोअर डेक असे प्रकार होते. या बसमधून पर्यटकांना दक्षिण मुंबईतील पर्यटनस्थळांचा आनंद लुटता येत होता. या बस कालबाह्य होण्याच्या आधी बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात तीन ओपन डेक बस होत्या. यातील शेवटची बस आयुर्मान संपल्याने ५ ऑक्टोबर २०२३ ला मोडीत काढण्यात आली.

## महापालिका सफाई कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दरात घरे -आयुक्त

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिकेत कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने घरे देणे शक्य नाही. मात्र महापालिकेच्या भूखंडाच्या पुनर्विकासाच्या अंतर्गत सवलतीच्या दरात सफाई कर्मचाऱ्यांना घरे देता येतील, अशी मोठी आनंदाची बातमी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी सफाई कर्मचाऱ्यांना दिली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयुक्त गगराणी आणि अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांनी प्रथमच पालिकेतील घनकचरा खात्यातील सफाई कामगार, मोटर लोडर, मुकादम, पर्यवेक्षक आदिंसोबत दादर, शिवाजी नाट्य मंदिर येथे शुक्रवारी संवाद साधला. त्यावेळी सफाई कर्मचाऱ्यांच्या स्वतःच्या मालकी हक्काची घरे मिळावी, अशी मागणी सफाई कर्मचारी यांनी केली.

पालिकेत आजमितीला २७ हजार ९०० सफाई कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना राहण्यासाठी ६ हजार ५०० सेवा सदनिका देण्यात आल्या आहेत. महापालिकेची घरे सफाई कर्मचाऱ्यांना भाड्याने देण्यात आली आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून सफाई कर्मचारी व कामगार नेते हे कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना राहण्यासाठी पालिकेकडे मालकी हक्काच्या घरांची मागणी वारंवार करीत आहेत. मात्र पालिका प्रशासन व राजकीय नेते केवळ आश्वासने देत आहे. त्या पलिकेकडे काही कृती होत नव्हते.

पालिका सफाई कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने घरे देणे शक्य नाही. मात्र महापालिकेच्या जागेतील जुन्या चाळीत राहणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना केवळ राहण्यापुरता जागा उपलब्ध न करता त्यांच्या कुटुंबीयांना, नवीन पिढीला उद्याने, मोकळी जागा यांचा लाभ घेता यावा, यासाठी आता महापालिकेला आपल्या भूखंडांचा पुनर्विकास करणे ही काळाची गरज झाली आहे. त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दरात घरे देणे शक्य आहे, असे महापालिका आयुक्त म्हणाले.

दरम्यान, महापालिकेने नगरविकास खात्याकडे भूखंडाची मागणी केली आहे. तो भूखंड उपलब्ध झाल्यास महापालिका श्रम साफल्य योजना राबवून त्याचा पुनर्विकास करण्यात येईल, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. तसेच, सध्या महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना घरांसाठी भत्ता देण्यात येतो आहे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. पालिकेच्या वसाहतीत राहणाऱ्यांच्या वेतनामधून तो कापला जातो. तर, जे पालिकेच्या वसाहतीत राहत नाहीत, त्यांना तो त्यांच्या वेतनातून श्रेणीनुसार देण्यात येतो.

### ४६ वसाहतींपैकी ३० वसाहतींचा पुनर्विकास



### पुनर्विकासाला विरोध करू नये

*मुंबई महापालिका आश्रय योजनेच्या अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागातील कामगारांच्या ४६ वसाहतींपैकी ३० वसाहतींचा पुनर्विकास केला जात आहे. एकूण सुमारे १२ हजार सदनिकांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. कामगार सदनिकांचे विद्यमान क्षेत्रफळ अंदाजे १५० चौरस फुट आहे. तर, प्रस्तावित क्षेत्रफळ ३०० चौरस फुट असेल. प्रस्तावित बहुमजली इमारती उद्यान, मनोरंजन केंद्र यासह आधुनिक सुविधांयुक्त दर्जेदार स्वरूपाच्या असतील. मात्र सफाई कर्मचाऱ्यांनी भूखंड पुनर्विकासाला विरोध न करता सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त भूषण गगराणी यांनी यावेळी केले.*

## आमच्यापैकी कोणाची बायको हिरॉइन नाही म्हणून आम्हाला टाळले असावे!

### शरद पवारांचे कार्यकर्ते आक्रमक; मुंबईत बंडखोरी होणार?

प्रतिनिधी
■ मुंबई

शरद पवारांच्या राष्ट्रवादीने आज नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली. आजच्या यादीत त्यांनी अनुशक्तीनगरमधून अभिनेत्री स्वरा भास्कर हिचे पती फहाद अहमद यांना उमेदवारी देऊ केली आहे. या उमेदवारीवरून आता वाद सुरू झाला आहे. अनुशक्तीनगरमधील स्थानिक पदाधिकारी यांनी संताप व्यक्त केला आहे. हे पदाधिकारी एका मराठी टीव्ही वाहिनीशी बोलत होते.

अणुशक्तीनगर येथून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अनेक पदाधिकारी इच्छूक होते. अजित पवारांनी राष्ट्रवादी पक्षात बंडखोरी केल्यानंतर अनेक पदाधिकाऱ्यांनी शरद पवारांना समर्थन दिले होते. त्यामुळे शरद पवार निष्ठावान कार्यकर्त्याला संधी देतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. परंतु, या जागेवरून शरद पवारांनी समाजवादी पक्षाच्या नेत्याला आपल्या पक्षात घेऊन उमेदवारी देऊ केली. त्यामुळे अणुशक्तीनगर मधील कार्यकर्ते नाराज झाले आहेत. इच्छूक उमेदवार निलेश भोसले यांनी यासंदर्भात मराठी टीव्ही वाहिनीशी संपर्क साधताना फहाद अहमद यांच्यावरही टीका केली.

निलेश भोसले म्हणाले, आम्ही जेवढ्या इच्छूकांनी अर्ज केला होता, आमच्यापैकी कोणाची बायको हिरॉइन नसल्याने आम्हाला टाळले असावे. राष्ट्रवादी काँग्रेसचा कणा म्हणजे पक्षाचा सर्वसामान्य कार्यकर्ता आहे. कार्यकर्ते आम्हाला दिशा ठरवून देत नाहीत, तोवर कोणताही निर्णय घेणार नाही.

ते उच्च शिक्षित असून मुस्लीम तरुण आहेत. त्यांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्समध्ये अभ्यास केला आहे. ते चांगले ॲक्टिव्हिस्ट असून देशभर त्यांचे चांगले नाव आहे. ते आधी आमच्या पक्षात नव्हते. ते पूर्वी समाजवादी पक्षात होते. चर्चा करून आम्ही त्यांना आमच्या पक्षात घेतलं असून त्यांना निवडणुकीसाठी उमेदवारी दिली आहे", असं जयंत पाटील म्हणाले.

### निष्ठावंत कार्यकर्त्यांचा विचार झाला नाही

*"अजित पवारांसह ४० आमदार गेले, तरीही आम्ही हललो नाही. चांगले दिवस येतील तेव्हा आमच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा विचार होईल असं वाटलं होतं. पण अर्ध्या तासांपूर्वी समाजवादी पक्षाचा कार्यकर्त्याचा पक्षात प्रवेश केला अन् त्याला उमेदवारी दिली. हे दुर्भाग्यपूर्ण आहे", असं निलेश भोसले म्हणाले.*

## राजकीय जाहिरातींसाठी माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीची परवानगी आवश्यक

प्रतिनिधी
■ मुंबई

सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ती यांनी राजकीय जाहिरातींचा प्रत्यक्ष वापर / प्रसारण करण्यापूर्वी या जाहिरातींना राज्यस्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. या समितीचे अध्यक्ष अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी हे आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

जाहिरातींमध्ये दूरचित्रवाहिन्या, केबल नेटवर्क/ केबल वाहिन्यांवरचे प्रक्षेपण प्रसारण, चित्रपटगृहे, रेडिओ, खाजगी एफएम, सार्वजनिक ठिकाणी दृकश्राव्य माध्यमाद्वारे (Audio-Video Display) होणारे प्रसारण, ई-वृत्तपत्रांमधील जाहिरातींचे प्रकाशन, बल्क एसएमएस (SMS) / व्हॉईस मॅसेजेस यांचा समावेश होतो. तसेच मुद्रीत माध्यमांमध्ये (Print Media Paper) मतदानाच्या आधीच्या दिवशी तसेच मतदानाच्या दिवशी प्रकाशित केल्या जाणाऱ्या जाहिरातींकरीता देखील माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

जाहिरातीचे पुर्वप्रमाणीकरण करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती व राज्य स्तरावर राज्य पूर्वप्रमाणीकरण समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हा स्तरावरील समितीकडे समितीच्या कार्यकक्षेत येणाऱ्या मतदारसंघातील व्यक्ती किंवा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने इलेक्ट्रॉनिक मीडियावर जारी करावयाच्या जाहिरातीच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करावयाचा आहे. तसेच राज्य स्तरीय समितीकडे सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष, संस्था यांनी जाहिरात पूर्व प्रमाणीकरणासाठी अर्ज करावयाचा आहे. या समितीकडून भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व राजकीय जाहिरातीचे प्रमाणीकरण केले जाते.

जिल्हास्तरावर जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती व राज्य स्तरावर राज्य पूर्वप्रमाणीकरण समिती यांनी मान्यता दिल्याशिवाय राजकीय पक्ष / उमेदवारांनी राजकीय जाहिरातीचे प्रसारण करू नये. आजपर्यंत 169 जाहिरातींचे राज्यस्तरावरील राज्य पूर्व प्रमाणीकरण समितीकडून प्रमाणिकरण करण्यात आलेले आहे.

## आधी केली आईची हत्या नंतर आत्महत्येचा प्रयत्न

**मुंबई:** मुंबईतून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील वरळी भागातील एका मुलाने आपल्या आईची हत्या केली आणि त्यानंतर आपल्या हाताची नस कापत आत्महत्येचा प्रयत्न केला. वरळी येथे राहणारे ५० वर्षीय बालसुब्रमण्यम कृपास्वामी मुंबईत आपली पत्नी आणि मुलीसह राहत होते. कधी कधी ते त्याच भागात राहणाऱ्या आपल्या आईला भेटायला येत असतं. २६ ऑक्टोबरला शनिवारी दुपारीही बालसुब्रमण्यम आपल्या आईला भेटायला गेले. त्यानंतर उशीने तोंड दाबून त्यांनी तिची हत्या केली. त्यानंतर हाताची नस कापली. बालासुब्रमण्यम यांनी चार पानांची सुसाईड नोट लिहिले. यात त्यांनी कर्जामुळे बेजार झाल्याने हे पाऊल उचलल्याचे म्हटले आहे.

## रेल्वे कामगार संघटनेच्या मान्यतेसाठी नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी कामगारांचे शक्ती प्रदर्शन

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतात रेल्वे कामगारांची संख्या जवळजवळ अकरा लाख असून, मध्य रेल्वेच्या कामगारांची संख्या जवळपास एक लाख आहे. या उद्योगात कामगार कायद्यानुसार युनियन मान्यतेसाठी गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक केली जाते. या उद्योगात नॅशनल रेल्वे मजदूर युनियनला पुन्हा मान्यता मिळविण्यासाठी ४ ते ६ डिसेंबर २०२४ दरम्यान निवडणूक होणार असून, या निवडणुकीचे नामांकन अर्ज २५ ऑक्टोबर २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथील महाप्रबंधक कार्यालयात कामगारांच्या उपस्थित भरण्यात आले. याप्रसंगी नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे पदाधिकारी व सक्रिय कार्यकर्त्यांनी सीएसटी येथे मोर्चा नेऊन आपले शक्तिप्रदर्शन केले.

मिटिंग सुरू होण्यापूर्वी प्लॅटफॉर्म क्रमांक ७ आणि ८ पासून DRM कार्यालय मार्गे उपनगरीय लॉबीपर्यंत कामगार मोर्चाने गेले, त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना ऑल इंडिया रेल्वे फेडरेशनचे (AIRF) महामंत्री कॉ. शिवगोपाल मिश्राजी आणि नॅशनल रेल्वे मजदूर युनियन ( NRMU ) व कोकण रेल्वेचे महामंत्री (CRKR) कॉ. वेणू पी. नायरजी यांनी पुष्पहार अर्पण केला, त्यानंतर जनरल मॅनेजर ऑफिस कंपाऊंड क्षेत्राकडे मोर्चा पुढे जाऊन मिटिंग सुरू झाली. नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे महामंत्री कॉ. वेणू नायरजी यांनी आपल्या तेजस्वी भाषणातून चांगला संदेश देऊन रेल्वे कामगारांचा उत्साह वाढविला. त्यानंतर ऑल इंडिया रेल्वे फेडरेशनचे महामंत्री कॉ. शिवगोपाल मिश्राजी यांनी सरकारची सद्यस्थिती, युनियनची गरज आणि पेन्शन योजनेच्या UPS गोंधळाबद्दल बोलून इंटक प्रणित संघटना कामगारांच्या पाठीत खंजीर खुपसते. उदा. १९६०,१९७४ चा संप फोडून सरकारची लॉयल्टी व आपल्या मुलांना रेल्वेत नोकरीत सामावून घेतले. AIRF/ NRMU ला 100 वर्षाचा इतिहास या युनियनला आहे. UPS मध्ये राहिलेले मुद्दे सुद्धा चर्चेद्वारे सोडविले जातील याची हमी यावेळी त्यांनी कामगारांना दिली व ज्या कर्मचाऱ्यांना आपल्या निवडीनुसार UPS किंवा NPS घेण्यासाठी ऑप्शन देण्यात आले आहे त्यांनी ऑप्शन देताना विचार पूर्वक निवड करावी हे सुद्धा सांगितले आहे.NRMU व AIRF सारख्या संघर्षशील युनियनची कर्मचाऱ्यांना गरज का आहे. हे स्पष्ट केले. नॅशनल रेल्वे मजदूर युनियनच्या अध्यक्षा कॉ. कामाक्षी बागलवाडीकर यांनी सर्वांचे आभार मानले.



रेल्वे मुख्यालय व विभागातील सर्व पदाधिकारी, युवा, महिला कॉम्रेड, सर्व DC चे पदाधिकारी आणि विभागातील सर्व सक्रिय सदस्यांनी या मिटिंगमध्ये सहभाग घेतल्यामुळे मिटींगला हजारोच्या संख्येने उपस्थिती होती . याप्रसंगी ऑल इंडिया रेल्वेमेन्स फेडरेशनचे झोनल सचिव कॉ. पी. जे. शिंदे,

नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे सर्व सहाय्यक सचिव कॉ. विवेक नायर, कॉ. पी. टी. एस. राजा, कॉ. श्याम नायक, कॉ. बी.एल. यादव, कॉ. विनय सावंत कॉ. संतोष कुमार, कॉ. आर. के. मलबारी, WP, सर्व मंडळाचे अध्यक्ष, मंडळ सचिव, युवा महिला, शाखा पदाधिकारी आणि सक्रिय कार्यकर्ते यांच्या साक्षीने नॅशनल रेल्वे मजदूर युनियनने मान्यतेच्या निवडणुकीसाठी नामांकन मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य कार्मिक अधिकारी सहर्ष बाजपेयी यांना दिले


AXIS FINANCE

**ॲक्सिस फायनान्स लिमिटेड**
(सीआयएन यू६५९२१एमएच१९९५पीएलसी२१२६७५)
ॲक्सिस हाऊस, सी-२, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - 400 025

संदर्भ क्र. :- एएफएल/सीओ/२०२४-२५/लिगल/सप्टेंबर — २७ सप्टेंबर २०२४

**स्पीड पोस्ट / रजिस्टरर्ड ए. डी. / ईमेल द्वारे**
**कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय**

प्रति,

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नरेश रमेश धक्कड (कर्जदार/ गहाणदार)<br>बीच व्यू, इमारत सदनिका क्र. ८, ३ रा मजला, चौपाटी, ग्रांट रोड, मुंबई – ४००००७.<br>**येथे देखील:**<br>सदनिका क्र. २१०५, २१ वा मजला, सी विंग, व्हर्सटाईल व्हॅली, गाव निळजे, कटाई नाक्याजवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे ४२१२०४<br>**येथे देखील:**<br>सदनिका क्र. २१०२, २१ वा मजला, सी विंग, व्हर्सटाईल व्हॅली, गाव निळजे, कटाई नाक्याजवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे ४२१२०४.<br>ई-मेल: cbzmetals@gmail.com | २. | पूजा नरेश धक्कड (सह-कर्जदार १)<br>बीच व्यू, इमारत सदनिका क्र. ८, ३ रा मजला, चौपाटी, ग्रांट रोड, मुंबई – ४००००७.<br>**येथे देखील:**<br>सदनिका क्र. २१०५, २१ वा मजला, सी विंग, व्हर्सटाईल व्हॅली, गाव निळजे, कटाई नाक्याजवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे ४२१२०४<br>**येथे देखील:**<br>सदनिका क्र. २१०२, २१ वा मजला, सी विंग, व्हर्सटाईल व्हॅली, गाव निळजे, कटाई नाक्याजवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे ४२१२०४<br>ई-मेल: cbzmetals@gmail.com |
| ३. | आरएचजे ट्यूब्ज प्रायव्हेट लिमिटेड (सह-कर्जदार ३)<br>येथील नोंदणीकृत कार्यालय पत्ता:<br>२८१/२ जीआयडीसी इंडस्ट्रीयल इस्टेट, उंबरगाव, गुजरात, भारत, ३९६१७१,<br>**येथे देखील:**<br>तळ, मजला, प्लॉट क्र. १११-११९, शेठ नथुराम, पोद्दार बाग, डॉ. बाबासाहेब जयकर, चर्नी रोड, मुंबई – ४०० ००४<br>**येथे देखील:**<br>सदनिका क्र. २१०५, २१ वा मजला, सी विंग, व्हर्सटाईल व्हॅली, गाव निळजे, कटाई नाक्याजवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे ४२१२०४<br>**येथे देखील:**<br>सदनिका क्र. २१०२, २१ वा मजला, सी विंग, व्हर्सटाईल व्हॅली, गाव निळजे, कटाई नाक्याजवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे ४२१२०४. ई-मेल: cbzmetals@gmail.com | ४. | आदीव नरेश धक्कड (सह-कर्जदार ३)<br>बीच व्यू, इमारत सदनिका क्र. ८, ३ रा मजला, चौपाटी, ग्रांट रोड, मुंबई – ४००००७.<br>**येथे देखील:**<br>सदनिका क्र. २१०५, २१ वा मजला, सी विंग, व्हर्सटाईल व्हॅली, गाव निळजे, कटाई नाक्याजवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे ४२१२०४<br>**येथे देखील:**<br>सदनिका क्र. २१०२, २१ वा मजला, सी विंग, व्हर्सटाईल व्हॅली, गाव निळजे, कटाई नाक्याजवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे ४२१२०४<br>ई-मेल: cbzmetals@gmail.com |

प्रिय महोदय / महोदया,

**विषय: सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना (वेळोवेळी सुधारित केल्यानुसार) आणि त्याअंतर्गत केलेले नियम**

मी, ॲक्सिस फायनान्स लिमिटेडचा प्राधिकृत अधिकारी (यापुढे "एएफएल / सुरक्षित कर्जदार" म्हणून संदर्भित), कंपनी कायदा, १९५६ च्या तरतुदीनुसार समाविष्ट केलेली कंपनी आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, १९३४ अंतर्गत नोंदणीकृत नॉन-बँकिंग वित्तीय कंपनी आहे त्याचे नोंदणीकृत कार्यालय ॲक्सिस हाऊस, ॲक्सिस फायनान्स, तळमजला, सी-२, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०००२५, याद्वारे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत ही सूचना देतो., (यापुढे "सरफेसी कायदा" म्हणून संदर्भित) खालीलप्रमाणे :

एएफएलने, त्याच्या व्यवसायाच्या सामान्य वाटचालीत, कर्जदाराच्या विनंतीनुसार, मालमत्ता १ आणि २ करीता गृह कर्जाच्या (परिशिष्ट ए मध्ये अधिक सविस्तर वर्णन करण्यात आलेल्या) स्वरूपात दोन कर्ज सुविधा संमत केल्या आहेत. कर्ज सुविधा सुरक्षित करण्यासाठी गहाणदार/ हमी देणाऱ्यांनी एएफएलच्या नावे परिशिष्ट ए मध्ये तपशिलामध्ये वर्णन करण्यात आलेल्या स्थावर मालमत्ता रक्कम रु. १,०२,००,०००/- (रुपये एक कोटी दोन लक्ष मात्र) (एकत्रितपणे) करिता ("कर्ज सुविधा") त्यात नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीवर अनुक्रमे शिल्लक हस्तांतरण आणि मालमत्तांवरील कर्जाच्या उद्देशाने दोन मुदत कर्ज सुविधा मंजूर केल्या.

१. त्या अनुषंगाने, तुम्ही कर्जदार, सह- कर्जदार आणि गहाणदार म्हणून तुमच्या क्षमतेनुसार गहाण कर्ज करार दिनांक २० जानेवारी २०२२ ("सुविधा करार") यावर स्वाक्षरी केली आणि त्याची अंमलबजावणी केली. उपरोक्त सुविधा करारांतर्गत देय असलेल्या सर्व रक्कम आणि परिणामी, कर्जदाराने घेतलेल्या क्रेडिट सुविधेच्या परतफेडीसाठी संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे उत्तरदायी बनले आहेत. तुम्ही पत्ता धारक समान मासिक हप्त्यांमध्ये क्रेडिट सुविधेची परतफेड करण्याचे मान्य केले होते. [सुविधा कराराच्या संदर्भात क्रेडिट सुविधेसाठी कार्यान्वित / सबमिट केलेली सुविधा आणि सुरक्षा दस्तऐवज यापुढे या सूचनेमध्ये एकत्रितपणे "व्यवहार दस्तऐवज " म्हणून संबोधले जातील]
२. उपरोक्त क्रेडिट सुविधेअंतर्गत देय असलेल्या सर्व रकमांच्या परतफेडीसाठी हमी म्हणून, २१ जानेवारी २०२२ रोजी, गहाणदाराने क्रेडिट सुविधा सुरक्षित करण्याच्या हेतूने, गहाणखत तयार केले आणि त्यांचे सर्व हक्क, शीर्षक, जमिनीवरील / मालमत्तावरील व्याज येथे अनुसूची ए मध्ये अधिक तपशीलवार दिले आहे. अनुसूची ए मध्ये नमूद केलेली मालमत्ता यापुढे "सुरक्षित मालमत्ता" म्हणून संबोधली जाईल ]
३. येथे हे सांगणे उचित आहे की कर्जदार / गहाणदार, सह- कर्जदार १, सह – कर्जदार २, आणि सह-कर्जदार ३ ह्यांनी कर्ज सुविधा कराराद्वारे एएफएल कडून अनुसूची ए मध्ये नमूद केलेली मालमत्ता गहाण ठेवून क्रेडिट सुविधा मिळवल्या आहेत आणि एएफएल च्या बाजूने त्याद्वारे सुरक्षित व्याज निर्माण केले आहे. अनुसूची ए मध्ये नमूद केलेली सुरक्षा ही सरफेसी कायद्याच्या कलम २(१)(झेडसी) च्या अर्थामध्ये "सुरक्षित मालमत्ता" आहे.
४. तुमच्या विनंतीनुसार, एएफएल ने विविध तारखांना विशिष्ट सूचनांवर कर्जदाराला येथे अनुसूची बी मध्ये तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे क्रेडिट सुविधा वितरित केल्या होत्या.
५. व्यवहार दस्तऐवजाच्या अटींनुसार, तुम्ही कर्जदार / गहाणदार आणि सह- कर्जदार १, सह – कर्जदार २, आणि सह-कर्जदार ३ ह्यांनी या कर्ज सुविधेअंतर्गत थकबाकीची परतफेड करणे आवश्यक होते आणि पुढे तुम्हाला कर्जदार आणि सह - कर्जदार (ने) देखील सुविधा करार आणि त्यानंतरच्या संप्रेषण मध्ये नमूद केलेल्या पद्धतीने त्यावरील व्याज आणि कराराच्या दरांवर इतर शुल्क भरणे आवश्यक होते.
६. तथापि, तुम्ही कर्जदार / गहाणदार, सह- कर्जदार १, सह – कर्जदार २, आणि सह-कर्जदार ३ ह्यांनी व्यवहार दस्तऐवजांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झालात आणि सुविधा करारांतर्गत देय रकमेची परतफेड करण्यात चूक केली. एएफएल ने तुम्हाला नमूद पत्ता धारकांना विविध सूचनांद्वारे सूचित केले होते, तथापि, आजपर्यंत, ते दुरुस्त केले गेले नाही किंवा थकित रकमेची परतफेड करण्यासाठी कोणतीही पावले उचलली गेली नाहीत.
७. या संदर्भात, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की तुम्ही पत्ता धारकाने सतत चूक केली असल्याने, कर्जदाराचे खाते रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या मालमत्तेच्या वर्गीकरणाशी संबंधित निर्देश / मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून दि. ०३.०९.२०२४ रोजी नॉन परफॉर्मिंग ॲसेट ("एनपीए" ) म्हणून वर्गीकृत झाले आहे.
८. येथे हे सांगणे अत्यावश्यक आहे की एनपीए म्हणून खात्याच्या वर्गीकरणाची वरील माहिती तुम्हाला एएफएल द्वारे ०९.०९.२०२४ रोजीच्या एनपीए सूचना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.
९. सरफेसी कायद्याच्या तरतुदींनुसार, सुरक्षित कर्जदाराचे देय कर्ज हे सुरक्षित मालमत्तेवर सुरक्षित केलेले कर्ज आहे आणि तुम्ही कर्जदार असल्याने, गहाणदार आणि सह- कर्जदार १, सह – कर्जदार २, आणि सह-कर्जदार ३ ने व्यवहार दस्तऐवजांच्या दृष्टीने/क्रेडिट सुविधा च्या नियमांनुसार अशा सुरक्षित कर्जाची परतफेड करण्यात चूक केली आहे.
१०. कर्जदार / गहाणदार, सह- कर्जदार १, सह – कर्जदार २, आणि सह-कर्जदार ३ द्वारे सुरक्षित कर्जदाराला देय असलेले आणि देय असलेले थकबाकी कर्ज रु. ८९,९१,५०६/- (रुपये एकूण नव्वद लक्ष एक्याणव हजार पाचशे सहा मात्र) आहे. हे अनुसूची सी येथे अधिक तपशीलवार वर्णन केले आहे.
११. उपरोक्त लक्षात घेता, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत, सुरक्षित कर्जदार कर्जदार/ सह-कर्जदार / गहाणदार यांना ही वैधानिक सूचना जारी करण्याचा अधिकार असून आणि याद्वारे तुम्हाला सर्व पत्त्यावर एकत्रितपणे आणि स्वतंत्रपणे सुरक्षित कर्जदार रकमेची/ एकूण रु. ८९,९१,५०६ /- (रुपये एकूणनव्वद लक्ष एक्याणव हजार पाचशे सहा मात्र) सोबत लागू व्याज, पुढील व्याज, डिफॉल्ट व्याज, प्रिमिया, खर्च, शुल्क इ. ची संपूर्ण थकबाकी भरण्याचे आवाहन करते. यासह ५ सप्टेंबर २०२४ रोजी करारानुसार या तारखेपासून परतफेडीच्या तारखेपर्यंत, सरफेसी कायद्याच्या कलम १३ (२) अंतर्गत जारी केलेल्या या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत (साठ दिवसांच्या) क्रेडिट सुविधेचा आदर करणे, असे करण्यात अयशस्वी झाल्यास, सुरक्षित कर्जदारास या सरफेसी कायद्यांतर्गत तुम्हाला कोणत्याही संदर्भाशिवाय सुरक्षितता व्याजाच्या अंमलबजावणीचे अधिकार वापरण्यास प्रतिबंधित केले जाईल आणि खर्च आणि परिणामांच्या बाबतीत पूर्णपणे तुमच्या जोखमीवर असेल.
१२. या तारखेपासून ६० दिवसांची मुदत संपल्यावर आणि मागणीचे पालन करण्यात अपयश आल्यावर, सुरक्षित कर्जदार सरफेसी कायद्यांतर्गत खालील कार्यवाही करण्यात येईल:
ए. यासह अनुसूची ए मध्ये नमूद केल्याप्रमाणे ते पूर्ण करण्यासाठी भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार यासह सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला जाईल.
बी. सरफेसी कायद्याचे कलम १३ (४) (बी) आणि कलम १५ मधील तरतुदीमध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचा अधिकार यासह तुमच्या व्यवसायाचे व्यवस्थापन ताब्यात घेण्यात येईल.
सी. सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करून ज्याचा ताबा एएफएल द्वारे घेतला जाईल.
डी. कोणत्याही वेळी लेखी सूचना देऊन, कोणत्याही व्यक्तीने, ज्याने तुमच्याकडून कोणतीही सुरक्षित मालमत्ता मिळवली आहे आणि ज्याच्याकडून कोणतेही पैसे देय आहेत किंवा तुमच्याकडे देय होऊ शकतात त्यामुळे अशा व्यक्तीने सुरक्षित कर्ज भरण्यासाठी पुरेसा पैसा एएफएल ला भरणे आवश्यक आहे.
१३. मी सरफेसी कायद्याच्या कलम १३ (८) कडे तुमचे लक्ष वेधून घेतो, ज्याद्वारे तुम्हाला वर सांगितल्याप्रमाणे देय रकमेची रक्कम सर्व खर्च, शुल्क आणि खर्चासह सार्वजनिक लिलावासाठी किंवा सुरक्षित मालमत्तेची भाडेपट्टी, नियुक्ती किंवा विक्रीच्या मार्गाने हस्तांतरणासाठी सार्वजनिक किंवा खाजगी करारातून कोटेशन किंवा निविदा आमंत्रित करण्याची सूचना प्रकाशित झाल्याच्या तारखेपर्यंत किंवा त्याआधी सादर करण्याची संधी आहे.
१४. तुम्हा सर्वांना सूचित केले जाते आणि सावध केले जाते की सरफेसी कायद्याच्या कलम १३ (१३) च्या तरतुदींनुसार, सुरक्षित मालमत्तेचे (येथे अनुसूची ए मध्ये नमूद केलेले) विक्री, भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा सुरक्षित कर्जदाराच्या पूर्व लेखी संमतीशिवाय कोणतेही हस्तांतरण केले जाणार नाही. कृपया लक्षात घ्या की, सरफेसी कायद्याच्या कलम 29 अंतर्गत नियमांसह वाचलेल्या सरफेसी कायद्यामध्ये समाविष्ट असलेल्या तरतुदीचे कोणतेही पालन न करणे / उल्लंघन करणे, शिक्षापात्र गुन्हा आहे.
१५. कृपया पुढे लक्षात ठेवा की ही वैधानिक सूचना सुरक्षित कर्जदाराच्या अधिकारांचा पूर्वग्रह न ठेवता जारी करण्यात आली आहे, ज्यामध्ये सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींनुसार योग्य आणि आवश्यक समजल्या जाणार्या कोणत्याही अन्य कायदेशीर कार्यवाही आणि / किंवा करारानुसार कार्यवाही किंवा दोन्हीचा समावेश आहे.
१६. मी याद्वारे स्पष्टपणे संबंधित व्यवहार दस्तऐवज, इतर कोणतेही संबंधित दस्तऐवज, कायद्यानुसार किंवा अन्यथा सर्व अधिकार राखून ठेवतो. या सूचनेमध्ये समाविष्ट असलेली कोणतीही गोष्ट किंवा आमच्याद्वारे कोणतीही कृती किंवा निष्क्रियता संबंधित व्यवहार दस्तऐवजांतर्गत आमचे कोणतेही वर्तमान किंवा भविष्यातील अधिकार किंवा उपाय किंवा यापैकी कोणतेही माफी, किंवा पूर्वग्रह किंवा अन्यथा विपरित परिणाम म्हणून कार्य करणार नाही. कायदा किंवा सामान्यतः, जो कायम आहे आणि पूर्ण शक्ती आणि प्रभावाने चालू राहील.
१७. ही सूचना जारी करण्यासाठी आणि सरफेसी कायद्यांतर्गत सुरक्षित कर्जदाराच्या वतीने नियमांसह वाचलेले अधिकार करण्यासाठी अधोस्वाक्षरी केलेल्या प्राधिकृत अधिकारी म्हणून अधिकृत आहे.
१८. या सूचनेची पावती आपण कळवावी ही विनंती. या नोटीसची प्रत भविष्यातील संदर्भासाठी आमच्या कार्यालयात ठेवली जात आहे.

**आपले विश्वासू**
**प्राधिकृत अधिकारी**
**ॲक्सिस फायनान्स लिमिटेड**

**अनुसूची ए**
**सुरक्षित मालमत्तेचा तपशील**
**मालमत्ता – १**
गाव निळजे तालुका कल्याण, जिल्हा ठाणे येथे असलेल्या, वसलेल्या जमिनीचा धारण केलेला जूना सर्वे क्र. ११/९, १३, १४, १५, १६/ १ ए आणि १६/ बी त्याच्याशी सुसंगत नवीन सर्वे क्र. १२/९, १४, १५, १६, १७/ १ ए आणि १७/ १ बी वर बनध्ण्यात आलेल्या "व्हर्सटाईल व्हॅली" म्हणून ज्ञात असलेल्या प्रकल्पाच्या सी विंग च्या २१ मजल्यावरील ५५.७६ चौ. मी. चटई क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. २१०२. ("नमूद मालमत्ता/ मालमत्ता क्र. १)
**मालमत्ता – २**
गाव निळजे तालुका कल्याण, जिल्हा ठाणे येथे असलेल्या, वसलेल्या जमिनीचा धारण केलेला जूना सर्वे क्र. ११/९, १३, १४, १५, १६/ १ ए आणि १६/ बी त्याच्याशी सुसंगत नवीन सर्वे क्र. १२/९, १४, १५, १६, १७/ १ ए आणि १७/ १ बी वर बनध्ण्यात आलेल्या "व्हर्सटाईल व्हॅली" म्हणून ज्ञात असलेल्या प्रकल्पाच्या सी विंग च्या २१ मजल्यावरील ५५.७६ चौ. मी. चटई क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. २१०५. ("नमूद मालमत्ता/ मालमत्ता क्र. २) ("नमूद मालमत्ता/ मालमत्ता क्र. २)

**अनुसूची बी**
**वितरणाचा तपशील**
**कर्ज खाते क्र. ०४५६एएचए००००१९१९**
ए. आयएनआर: ७२४४/- टाटाकरीता — बी. आयएनआर: १४,९३१/- बीपीएलकरीता — सी. आयएनआर: ४८,३८०/- प्रक्रिया शुल्काटाटाकरीता
डी. आयएनआर: ४७,७३,४९०/- व्हर्सटाईल डेवलपर्स पीएनबी ए/ सी क्र. ०४५६१०११००४७४७ — ई. आयएनआर: ११८/- सेरसाई करीता
**कर्ज खाते क्र. ०४५६एएचए००००१९२०**
ए. आयएनआर: ७२४४/- टाटाकरीता — बी. आयएनआर: १४,९३१/- बीपीएलकरीता — सी. आयएनआर: ६०,१८०/- प्रक्रिया शुल्काटाटाकरीता
डी. आयएनआर: ४७,७३,४९०/- व्हर्सटाईल डेवलपर्स पीएनबी ए/ सी क्र. ०४५६१०११००४७४७ — ई. आयएनआर: ११८/- सेरसाई करीता

**अनुसूची सी**
**५ नोव्हेंबर २०२४ अनुसार थकीत रकमेचा तपशिल**
**(रक्कम रु. मध्ये)**

| अनु. क्र. | कर्ज क्र. | मूळ मुद्दल | थकीत व्याज | दंड आणि अन्य वसुली | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०४५६एएचए००००१९१९ | ४३,४२,३०१/- | १,४४,७६१/- | ८६९१/- | ४४-९५,७५३/- |
| २ | ०४५६एएचए००००१९२० | ४३,४२,३०१/- | १,४४,७६१/- | ८६९१/- | ४४,९५,७५३ |
| | ५ नोव्हेंबर २०२४ अनुसार एकूण रक्कम | | | | ८९,९१,५०६/- |

टिप: सुविधा करारामध्ये नमूद करण्यात आलेल्या व्याजाच्या दराने व्याज लागू असेल.

कृतीशिवाय दृष्टी केवळ स्वप्न आहे, दृष्टी नसलेली कृती म्हणजे केवळ वेळ घालवणे; पण दृष्टी आणि कृती एकत्र आल्यास जग बदलू शकतात.



- सुधा मूर्ती


वृत्तमानस

मुंबई, सोमवार, २८ ऑक्टोबर २०२४


# फक्त अभियान नकोय, गती हवीय

**देशाला** तेलबियांच्या उत्पादनात स्वयंपूर्ण बनवणे हे तसे मोठे आव्हान समोर आहे. देश शेती प्रधान असून सुद्धा स्वातंत्र्य प्राप्ती नंतर आता पर्यंत आपण तेलबियांची आयात केली आहे. अर्थात त्यामुळे आपले आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होते. सरकारने उशिरा का होईना याची जाण ठेवत पुन्हा एकदा पिवळी क्रांती अभियान सुरू करण्याचा मानस केला आहे. अलीकडेच मंजुरी दिलेले राष्ट्रीय खाद्यतेल-तेलबिया अभियान २०२४- २५ ते २०३०-३१ या सात आर्थिक वर्षात देशाला तेलबियांच्या उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने राबविले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यासाठीच्या खर्चाची तरतूद करण्यात आली असून मोहरी, भुईमूग, सोयाबीन, सूर्यफूल आणि तीळ या सारख्या मुख्य तेलबिया पिकांचे उत्पादन वाढवण्यावर अभियानाचा भर असेल. सरकी तेल, राईस ब्रान ऑइल, आणि एरंडेल तेलाच्या उत्पादनातही वाढ करण्याचे सरकारचे उद्दिष्ट असून ते स्वागतार्ह मानावे लागेल. वास्तविक देशात ८० च्या दशकात पिवळ्या क्रांतीची सुरुवात झाली होती. देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी देशात खाद्यतेलबियांचे उत्पादन वाढवण्यासाठी ते सुरू करण्यात आले. ही भारतातील सर्वात महत्त्वाची क्रांती मानली जाते. असे असूनही त्याला त्यानंतर आवश्यक गती प्राप्त झाली नसल्याने मधल्या काळात ही क्रांती काहीशी थंडावली होती. सिंचनाचा लाभ केवळ नगदी पिकांसाठी घेतला गेल्याने हा असमतोल निर्माण झाला आहे. या असमतोलाचा एक गंभीर परिणाम म्हणजे तेलबिया आणि कडधान्यांच्या बाबतीत कधीकाळी स्वयंपूर्ण असणारा आपला देश आता मोठ्या प्रमाणावर आयातदार बनला असून त्यावर मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्ची पडत आहे. आजमितीस भारत खाद्यतेलाच्या आयातीसाठी कोट्यवधी मूल्याचे परकीय चलन खर्ची पडते. या पार्श्वभूमीवर तेलबियांच्या उत्पादनात प्रोत्साहन दिले तर परकीय चलनाची बचत होऊ शकेल. त्याचबरोबर शेतकर्यांना योग्य भाव मिळून त्यांची आर्थिक स्थिती सुधारू शकेल; परंतु यंदाच्या रब्बी हंगामाकडे पाहिल्यास महाराष्ट्रात तेलबियांचा पेरा कमी झाल्याचे दिसत आहे. राज्यात मराठवाडा आणि विदर्भात तेलबियांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. यामध्ये भुईमूग, करडई, सूर्यफूल आणि जवस ही रब्बीतील तेलबियांची पिके आहेत. दोन दशकांपूर्वीचा विचार केल्यास राज्यात करडईचे क्षेत्र सुमारे तीन लाख हेक्टर होते. सूर्यफुलाच्या क्षेत्रातही वेगाने घट झाली. जवसाची लागवड नगण्य राहील. मागील काही वर्षांपासून रब्बी हंगामात तेलबियांच्या लागवड क्षेत्रात वेगाने घट होत आहे. कमी उत्पादकता, मजूरटंचाई आणि उत्पादन खर्चात झालेली वाढ ही यामागची कारणे आहेत. महाराष्ट्रात तेलबियांचे उत्पादन करण्यात जळगाव जिल्हा पूर्वीपासून आघाडीवर आहे. मात्र, सध्या या जिल्ह्यातील तेलबियांचे क्षेत्र नाममात्र उरले असून उत्पादन जवळजवळ संपुष्टात आले असून ही बाब चिंताजनक मानावी लागेल. भुईमुगाची लागवड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर होत होती. आता ही लागवड नगण्य राहिलेली आहे. जळगावसह संपूर्ण राज्यातच भुईमूग, तीळ, जवस, कारळा, सूर्यफूल ही पिके कमी होत आहेत. भुईमूग हे तेलबियांपैकी प्रमुख पीक असून खरीप आणि रब्बीबरोबरच उन्हाळी हंगामातही भुईमुगाची लागवड होऊ शकते. तीनही ऋतूत येणारे हे पीक आता अत्यल्प प्रमाणात घेतले जाते. तेलबियांच्या पिकांचा दुहेरी फायदा होतो. एकतर तेलबियांची पिके मध्यम कालावधीची, जिरायती जमिनीत येणारी आणि आंतरपीक पद्धतीस पोषक ठरत असल्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होऊ शकतो. पूर्वी गावपातळीवर तेलाचे घाणे असत आणि तेथे तेलबिया गाळून तेल काढण्यात येत असे. शेतकऱ्यांना घरचे तेल वर्षभर वापरायला मिळत होते आणि उर्वरित तेलाची ते विक्रीही करू शकत होते. देशी घाण्यातून काढलेले तेल आरोग्यवर्धक असते. या घाण्यांमधून निघणारी पेंड हा दुभत्या जनावरांसाठी पोषक चारा म्हणून वापरला जात असे, तेही जवळजवळ बंद झाले आहे. कडधान्ये आहारात असणे उत्तम प्रकृतीसाठी आवश्यक आहे. आहारात कडधान्यांचा समावेश नसल्यामुळे गरीब लोक कुपोषित राहतात. कडधान्यांचे उत्पादन कमी झाल्यामुळे आयात वाढली आहे. परिणामी कडधान्ये महाग झाली असून ती गरिबांना परवडत नाहीत. अनेकांना रास्त दरात कडधान्ये उपलब्धच होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. दुसरीकडे सिंचीत शेती क्षेत्रात उसासारखी नगदी पिके मोठ्या प्रमाणावर घेण्यात येतात. सर्वात महत्वाचे म्हणजे २०१५ नंतर सातत्याने तेलबिया, खाद्यतेल उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात आला. पण प्रत्यक्षात आजवर एकही योजना यशस्वी झालेली नाही. २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियानाची सुरुवात झाली, त्यास अपेक्षित यश आले नाही. त्यानंतर २०२१ मध्येही विशेष खरीप कार्यक्रमांत तेलबियांची लागवड ६.३७ लाख हेक्टरने तर तेल उत्पादन २४.३६ लाख टनांनी वाढविण्याचे उद्दिष्ट होते. मग २०२२ मध्ये ११,०४० कोटी रुपयांची तरतूद असलेल्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियानाची सुरुवात करण्यात आली. प्रामुख्याने ईशान्येकडील राज्यांत अंमलबजावणी होणार होती, पण तिलाही अपेक्षित यश मिळालेले नाही ही वस्तुस्थिती. तेलबियांची लागवड प्रामुख्याने मध्य भारतात-म्हणजेच प्रमुख मोसमी पावसाच्या प्रदेशात होते. विदर्भ, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांत तेलबियांचे उत्पादन जास्त होते. सोयाबीन उत्पादनात महाराष्ट्र आघाडीवर आहे. वेळेत आणि समाधनकारक पाऊस झाला तरच खरीप हंगामात तेलबियांची लागवड वाढते. मुळात आपल्याकडील प्रतिहेक्टरी उत्पादकता कमी आहे. अलीकडे अतिवृष्टी, पूर, पावसाचा खंड यामुळे उत्पादकता आणखी कमी झाली आहे. दीर्घकालीन धोरणांचा अभाव, तेलबियांना हमीभाव न मिळणे, उत्पादन खर्चावर योग्य हमीभाव न मिळणे आणि नैसर्गिक आपत्तींमुळे तेलबिया खाद्यतेलांबाबतच्या योजनांना अपेक्षित यश मिळताना दिसत नाही. एकीकडे आपण गहू आणि भाताचे उत्पादन आपल्या गरजेपेक्षा अधिक करत आहोत आणि जगाला याचा पुरवठा करीत आहोत, तर दुसरीकडे आपले तेलबियांचे उत्पादन कच्च्या तेलासारखेच धोकादायक स्थितीत आहे. सर्वाधिक खाद्यतेल आयात करणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक लागतो. आपल्या गरजेच्या तुलनेत ७० टक्के खाद्यतेल आयात केले जाते. त्यातसुद्धा पामतेलाचे प्रमाण सर्वाधिक असते. ही परिस्थिती कायम राहिली तर काही वर्षांतच आपले खाद्यतेलाच्या आयातीवरील अवलंबित्व ८० टक्क्यांवर पोहोचेल. अशा परिस्थितीत तेलबियांचे उत्पादन वाढवण्याबाबत धोरणात्मक प्रयत्न व्हायला हवेत. गेल्या काही दशकांमध्ये गहू आणि तांदळाचे उत्पादन वाढले आहे. त्याचे प्रमुख कारण या पिकांना मिळणारा हमीभाव हे आहे. आपल्या उत्पादनाचा काही हिस्सा तरी चांगल्या किमतीवर खरेदी केला जाईल, याची खात्री शेतकऱ्यांना असते. या पार्श्वभूमीवर सरकार तेलबियांच्या उत्पादनाच्या बाबतीत खरोखर गंभीर असेल तर सरकारने एक व्यावहारिक रस्ता शेतकऱ्यांना दाखवला पाहिजे. जो पाहन शेतकरी स्वतःच तेलबियांच्या शेतीकडे वळतील, असे काहीतरी केले पाहिजे. पिकांच्या हमीभावात गाडे अडू शकते. शेतकर्यांचा कल तेलबियांऐवजी गहू आणि भाताच्या पिकाकडे का आहे, याचा विचारही केंद्र आणि राज्य सरकारांनी केला पाहिजे. सरकारने या सर्व बाबींचा गांभीर्याने वेळीच विचार करणे आवश्यक आहे. केवळ अभियान सुरू होऊन धन्यता न मानता त्याला आवश्यक गती दिली तरच तेलबियांच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण होऊ शकतो.

# निवडणूक आणि बेस्टची परवड...

**राज्यातील** विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम मुख्य निवडणूक आयुक्तांनी दिल्लीत १५ ऑक्टोंबर रोजी जाहीर केल्यानंतर राजकीय पक्षांच्या हालचालींना वेग आला आहे. सत्ताधारी महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातच खरी लढत होणार असली तरी या दोन्ही युती आघाडीने आपल्या मित्र पक्षांना नाराज केले आहे. त्याचबरोबर प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांनी तिसरी आघाडी उघडली आहे. राज ठाकरे यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि अँड. प्रकाश (बाळासाहेब) आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी हे स्वबळावर लढत आहेत. या दोन्ही पक्षांची स्वबळावर १०० पेक्षा जास्त जागा लढविण्याइतकी ताकद राज्यात आहे का? हा संशोधनाचा विषय नसला तरी विचार करायला लावणारा नक्कीच प्रश्न आहे. मराठा उद्धारक मनोज जरांगे पाटील हे सुद्धा भाजपचे उमेदवार पाडण्यासाठी उमेदवार उभे करीत आहेत. बाकी इतर लहान सहान पक्ष की जे निवडणुकीच्या वेळेसच त्यांची नावे ऐकायला मिळतात असे अनेक पक्ष ही निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. सध्या उमेदवारी अर्ज सादर करणे सुरू आहे. त्यावरून या पक्षांचे अस्तित्व दिसून येते. उमेदवारी अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख २९ ऑक्टोबर २०२४ आहे. त्यानतंर ३० ऑक्टोंबर २०२४ रोजी अर्जाची छाननी आणि मग ४ नोव्हेंबर २०२४ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख आहे. त्यानतंर अंतिमतः निवडणुकीच्या रिंगणात किती उमेदवार आहेत हे स्पष्ट होणार आहे. पण ही विधानसभेची निवडणूक अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण होत आहे. अनेक घडामोडी घडत आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ज्या खासदारांना उमेदवारी देण्यात आली नव्हती किंवा ज्या खासदारांना तिकीट मिळाल्यानंतर ते पराभूत झाले होते त्यांना या विधानसभा निवडणुकीत पुन्हा नशीब अजमावण्याची संधी त्यांच्या पक्षाने उपलब्ध करून दिली आहे. शिंदे गटाचे राज्य सभेचे सदस्य असलेले मिलिंद देवरा यांना ही वरळी विधानसभा क्षेत्रात शिवसेना( उध्दव ठाकरे) उमेदवार आदित्य ठाकरे यांच्या विरोधात उभे करण्यात आले आहे. केवढा हा टोकाचा विरोध. खासदार झाल्यानंतर पुन्हा आमदार ... आश्चर्य जनक आहे. पण वस्तुस्थिती आहे. खरे तर सरकारी नोकरीचा प्रथम राजीनामा दिल्यानंतरच त्या कर्मचाऱ्याला निवडणुकीत भाग घेता येतो. पण राजकारणात सर्व माफ आहे. त्यामुळेच एक व्यक्ती दोन पदे भूषवत असते. मिलिंद देवरा हे राज्य सभेचे सदस्य होऊन वर्ष ही झाले नाही तोच ती खासदारकी कायम ठेऊन विधानसभेची उमेदवारी त्यांना दिली जाते, नगरसेवक असताना विधानसभा निवडणूक लढविण्याचीही परवानगी असते. आणि मग निवडून आल्यानंतर आमदारकी व नगरसेवक पद एकच व्यक्ती भूषविते. खरे तर अशा प्रकारे निवडणुका लढविण्यास कायद्याने निर्बंध घालायला हवे. एकाचा राजीनामा द्या व नंतर दुसऱ्या पदाची निवडणूक लढवा. असा कायदा करण्याची गरज आहे. परिवार वाद तर आता शिल्लक राहिलेला दिसत नाही. असे वाटावे अशी परिस्थिती दिसत आहे. ज्या पक्षाने परिवार वादाला विरोध केला होता त्या पक्षासह इतर सर्वच पक्षाने या निवडणुकीत परिवारातल्या लोकांना उमेदवारी देऊन परिवारवाद संपुष्टात आणला आहे. तिकीट वाटपात रुसवे फुगवे असतात ते ही यावेळी दिसून आले.

आमदारपद भूषवित असताना नुकतेच खासदार झालेल्या काँग्रेसच्या वर्षा गायकवाड व शिवसेना शिंदे गटाचे रवींद्र वायकर यांनी आपल्या विधानसभा मतदार संघात आपल्याच परिवारातल्या सदस्यांना उमेदवारी मिळवून दिली आहे. गायकवाड यांनी धारावीत आपल्या बहिणीला व रवींद्र वायकर यांनी आपल्या पत्नीला उभे केले आहे. महाविकास आघाडीतील शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये फूट पाडून भाजपने राज्यात सरकार स्थापन केले. पण या दोन्ही पक्षांतील जे ४०-४० आमदार फुटून भाजपला मिळाले. त्या आमदारांच्या विधानसभा क्षेत्रात शिवसेना उध्दव ठाकरे व शरद पवार यांना नवीन चेहरे द्यावे लागले आहेत.या नवीन चेहऱ्यांना संधी मिळाली याबद्दल त्यांनी एकनाथ शिंदे व अजितदादा पवार यांचे आभारच मानायला हवेत. अन्यथा त्यांना साहेबांचा प्रचार करणे, झेंडे हातात घेऊन बेंबीच्या देठापासून घोषणा देणे, साहेबांच्या मागे



**महापालिकायन**


सुनील शिंदे

मोबाईल नंबर-९८२१९९६११७


पुढे करणे, इतकीच कामे त्यांच्या नशिबी होती. हे त्यांना विसरून चालणार नाही. पालिकेतील काही माजी नगरसेवकही इच्छुक होते पण त्या सर्वांना उमेदवारी मिळालेली दिसत नाही. ज्यांना मिळाली नाही ते नाराज झाले आहेत. काँग्रेसचे पालिकेतील माजी विरोधी पक्ष नेते रवी राजा हे त्यापैकी एक आहेत. सायन कोळीवाडा येथून त्यांना उमेदवारी हवी होती. मिलिंद देवरा जेव्हा शिंदे गटात गेले तेव्हा रवी राजा ही त्यांच्या सोबत जाणार होते. त्यांचा पक्षांतरांचा विचार होताच तशा बातम्याही वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या होत्या. पण काँग्रेसला अच्छे दिन आल्यामुळे कदाचित त्यांनी पक्षांतर करण्याचा निर्णय बदलला असेल. पण पक्षाकडे त्यांनी सायन कोळीवाडा विधानसभा निवडणुकीचे तिकीट मागितले होते पण पक्षाने त्यांना न देता अगदी नवे नाव असलेल्या व्यक्तीला उमेदवारी दिली आहे त्यामुळे रवी राजा यांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे. आता ते काय करतात. ते बघावे लागेल. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी ने पालिकेतील पक्षाच्या गटनेत्या राखी जाधव यांना घाटकोपर पूर्व येथून उमेदवारी देण्यात आली आहे.मघाशी म्हटल्याप्रमाणे पक्ष फुटीनंतर शरद पवार आणि उध्दव ठाकरे यांनी नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. त्यात जोगेश्वरी पूर्व येथून रवींद्र वायकर यांच्या जागी उध्दव ठाकरे यांनी माजी नगरसेवक अनंत (बाळा) नर तर भायखळा येथून यामिनी जाधव यांच्या विरोधात मनोज जामसुतकर यांना उभे केले आहे.तर वडाळा येथून माजी महापौर श्रद्धा जाधव, कुर्ला येथून माजी नगरसेविका प्रविणा मोरजकर, गोरेगांव मधून शिवसेना नेते सुभाष देसाई यांच्या ऐवजी समीर देसाई आणि दहिसर मधून उदेश पाटेकर , काँग्रेस चे आसिफ झकेरिया वांद्रे पश्चिम, मनसेचे संदीप देशपांडे वरळीतून तर स्नेहल जाधव वडाळा येथून. वडाळ्यात जाधव या दोन माजी नगरसेविका आमने सामने आल्या आहेत. भाजपचे विनोद शेलार मालाड मधून अशा या माजी नगरसेवकांना( श्रद्धा जाधव वगळून) प्रथमच विधानसभा निवडणूक लढविण्याची संधी मिळाली आहे. तर काँग्रेस मधून फुटून शिंदे गटात गेलेले हाजी बब्बू खान यांनी गेल्या आठवड्यात पुन्हा काँग्रेस मध्ये प्रवेश केला. काँग्रेस व शिवसेनेचे अनेक नगरसेवक शिंदे गटात गेले आहेत. पण परत स्वगृही परतणारे बब्बू खान हे पहिले माजी नगरसेवक ठरले आहेत. या विधानसभा निवडणुकीनतंर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बार उडणार आहे. त्यावेळी फुटून गेलेल्या किती नगरसेवकांना शिंदे गटाकडून पुन्हा उमेदवारी मिळते.ते पाहूनच मग नाराज झालेले स्वगृही परतण्याचा सिलसिला सुरू करतील. यात शंका नाही.

**बेस्ट कर्मचाऱ्यांची दिवाळी अंधारात**

मुंबई महानगर पालिकेचे एक अंग असलेल्या बेस्ट उपक्रमाची गेल्या काही वर्षापासून आर्थिक स्थिती खूपच दयनीय स्वरूपात बघायला मिळते. त्यामुळे बेस्ट मध्ये नव्याने येणारे महाव्यवस्थापक (सनदी अधिकारी) काम करायला फार उत्साहित असतात असे दिसून येत नाही. ते कुणाला भेटत नाहीत. पत्रकारांना प्रतिक्रया देत नाहीत. या पदावरून लवकरात लवकर बदली कशी करून घेता येईल याच विचारात ते असतात. बेस्ट कडे पैसे नसल्यामुळे प्रत्येक वेळी पालिका आयुक्तांपुढे त्यांना हात पसरावे लागतात. २०२१ पासून बेस्ट बसचे तिकीट दर सरकारच्या सांगण्यावरून तेव्हाचे पालिका आयुक्त प्रवीण परदेशी यांनी कमी करून ५ रुपये ठेवल्याने बेस्ट चा तोटा वाढत गेला आहे. पण तिकिटदर कमी केल्यामुळे प्रवासी संख्या वाढली होती. हाच एकमेव उद्देश तिकीट दर कमी करण्यामागचा होता. पण आता पुन्हा तिकीट दर वाढवायचे म्हटले तर आज प्रस्तावाला मंजुरी द्यायला बेस्ट समिती व पालिका सभागृह ही अस्तित्वात नाही.जो पर्यंत पालिका निवडणूक होत नाही तोपर्यंत भाडेवाढ करता येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. दरवर्षी बेस्ट उपक्रमातून २००० पेक्षा अधिक कामगार कर्मचारी सेवा निवृत्त होतात त्यांचे अधिदान द्यायला बेस्ट कडे पैसे नसतात. ते देण्यासाठीही पालिका आयुक्तांकडे जावे लागते. बसेस विकत घेतल्या जात नाहीत, उलट आहे त्यातील आयुर्मान संपलेल्या बसेस भंगारात काढाव्या लागत आहेत. त्यामुळे बसेस ची संख्या कमी कमी होत गेली आहे. भाडेतत्त्वावरील बसेस २०१९ पासून घेण्यात आल्या तरी बेस्ट चे आर्थिक मान उंचावले नाही. आता त्यातील काही ठेकेदार बेस्ट मधून माघार घेत आहेत. ५ पैकी ३ ठेकेदारांनी आपल्या बसेस बंद केल्या आहेत. त्यामुळे बेस्ट मध्ये वाहकांप्रमाणे चालक ही अतिरिक्त झाले आहेत. त्यांना त्यांचे वेतन दर महिन्याला द्यावे लागते. कामगार भरती २०१६ पासून बंद आहे. त्यामुळे एक एका विभागात नावाला कर्मचारी शिल्लक राहिले आहेत. अशी हालाखीची परिस्थिती एकाबाजूने सुरू असताना बेस्ट उपक्रमात सध्या असलेल्या २७ हजार मराठी कामगार कर्मचाऱ्यांची दिवाळी अंधारात जाणार आहे. पालिका बरखास्त झाल्यापासून कोणताही निर्णय घ्यायचा असल्यास नगरविकास विभाग असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केल्याशिवाय आयुक्तांना निर्णय घेता येत नाही. यावेळी विधानसभा निवडणुक आहे. त्यामुळे पालिकेला जे काही निर्णय घ्यायचे होते ते आचारसंहिता लागू होण्यापूर्वी घ्यायचे होते. त्यात पालिका व बेस्ट मधील कामगार कर्माचाऱ्यांचा दिवाळीसाठी सानुग्रह अनुदानाचा प्रश्नही महत्वाचा होता. आचारसंहिता ज्या दिवशी लागू होणार होती त्याच दिवशी म्हणजे जे १५ ऑक्टोंबर रोजी मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार आयुक्त भूषण गगराणी यांनी पालिका कामगार नेत्यांच्या समन्वय समितीच्या नेत्यांना बोलावून २९ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर केले. त्याच वेळी बेस्ट कर्मचाऱ्यांना ही सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय अपेक्षित होता. पण तो घेतलाच गेला नाही. पालिका आयुक्त म्हणतात बेस्ट कर्मचाऱ्यांच्या सानुग्रह अनुदानासाठी ७० कोटी रुपये ठेवण्यात आले आहे.पण बेस्ट ने मागितले च नसल्यामुळे देण्याचा प्रश्नच आला नाही. त्यातच आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे बेस्ट कामगारांना रक्कम असूनही ती हातात पडली नाही. आता जेव्हा सानुग्रह अनुदानाची रक्कम त्यांच्या हाती पडेल तेव्हा दिवाळी संपलेली असेल आणि पालिकेचे दिवाळे निघालेले असेल. पण दोन दिवसांवर आलेली दिवाळी बेस्ट कर्मचाऱ्यांना अंधारातच साजरी करावी लागेल. पण खरेच यात दोष कुणाचा आहे की, त्यामुळे बेस्ट कर्मचाऱ्यांना दिवाळी पूर्वी रक्कम हाती मिळू शकली नाही. बेस्ट कामगारांचे नेते सुहास सामंत आणि शशांक राव हे सानुग्रह अनुदान मिळावे म्हणून बेस्ट प्रशासनाकडे पाठपुरावा करत होते. सुहास सामंत तर पालिका आयुक्तांना पत्र देऊन संयुक्त बैठक घेण्याची मागणी करत होते. त्यानंतरही बेस्ट कर्मचाऱ्यांना दिवाळी सानुग्रह अनुदान मिळू शकलेले नाही. याची खरे तर चौकशी होणे आवश्यक आहे.

## पत्र मानस

### बेस्ट मध्ये नक्की चाललंय काय?

कुंपणच शेत खाते हे आपण सर्वांनी ऐकलेले आहे आता तसंच काहीसं बेस्ट उपक्रमां मध्ये घडतय. गेले काही दिवस बेस्ट उपक्रमाने स्मार्ट मीटरिंग हा प्रोजेक्ट अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई यांना पुढील दहा वर्षांसाठी दिलेला आहे आणि या प्रोजेक्ट नुसार बेस्ट उपक्रमातले जेवढे सध्याचे जे एनर्जी मीटर्स आहेत ते टप्प्याटप्प्याने स्मार्ट मीटरने बदलायचे आहेत . कितीतरी हजार करोड रुपयांना हे कंत्राट अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई या कंपनीला बहाल केलेले आहे तर या कंत्राटानुसार बेस्ट मधील जेवढे विद्यमान एनर्जी मीटर्स आहेत ते सर्वच्या सर्व अदानी कंपनीने बदलणे अपेक्षित आहे त्यानुसार त्यांचे कामही सुरू झालेले दिसते पण गेल्या काही दिवसांपासून उपक्रमामध्ये गुपचूपपणे उपक्रमाचा कर्मचारी वर्ग वापरून हे स्मार्ट मीटर लावण्याचे काम सुरू आहे म्हणजे कंत्राट दिले अदानीला परंतु ते काम अदानीमार्फत न होता बेस्ट उपक्रमाचे कर्मचारी वापरून बेस्ट उपक्रमाच्या कार्य वेळेत हे सर्व होत आहे प्रश्न असा पडतो की अदानीला हे सर्व कंत्राट दिलेले असताना बेस्ट उपक्रमाचे कर्मचारी वापरून हे काम का केलं जातंय? हा नाहक भुर्दंड बेस्ट उपक्रमावर येतो असं वाटत नाही का? एकाच कामासाठी बेस्ट उपक्रम दोन वेळा खर्च करीत आहे आणि प्रचंड मोठा भ्रष्टाचार आहे. या सर्व कार्यपद्धती मागे मोठे अधिकारी आहेतच पण नकळत पणे थोड्याफार तात्पुरत्या फायद्यासाठी बेस्ट कर्मचारी देखील गुंतलेले दिसत आहेत. एकीकडे बेस्ट वाचवा असं जनआंदोलन उभं असताना आणि सर्वसामान्य नागरिकांची तीच भावना असताना देखील बेस्ट उपक्रमामध्ये गुपचूप पणे हे सर्व सुरू आहे. या सर्वांचा लेखाजोखा हा बेस्ट उपक्रमा कडून मिळणे अपेक्षित आहे.....

**- सुहास सामंत**

### रेल्वे फलाटावरील चेंगराचेंगरी

मुंबईतील रेल्वेच्या वांद्रे प्रस्थानकातील फलाटावर उत्तरेकडे जाणाऱ्या गाडीत चढण्यासाठी झालेल्या प्रचंड गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली.त्यात काही प्रवासी जखमी झाल्याची घटना घडली.मुळात गर्दीच्या दिवसात प्रवाशांची फलाटावर गर्दी होणार त्यात गाड्या उशिराने फलाटावर आली तर प्रवाशांची पळापळ होणार हे नित्याचे असताना रेल्वे प्रशासनाने त्या स्थानकातील फलाटावर प्रवाशांना मार्गदर्शन, सूचना करण्यासाठी तसेच प्रवासी रांग लावण्यासाठी अधिकतर रेल्वे कर्मचारी,पोलीस का तैनात केले नाहीत.असा प्रश्न आहे.घडलेली घटना चिंताजनक, दुर्देवी आहे.भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने दक्षता घ्यावयास हवी.

**- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव**

### आघाडीत राष्ट्रीय पातळीवर बिघाडी, जबाबदार कोण?

महाराष्ट्र, झारखंड विधानसभेच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच देशातील १५ इतर राज्यांतील ४८ पोटनिवडणुकांच्या राजकीय गदारोळास प्रारंभ झाला आहे. यामध्ये काँग्रेसला हरेक राज्यात स्थानिक राजकीय पक्षांशी युती करण्यास अडचणी येत आहेत. उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाने हरयाणा, मध्य प्रदेशात जागावाटपात दुर्लक्ष केल्यामुळे पक्षाने आडमुठेपणाचे धोरण अवलंबिले. परिणामी सौदेबाजीची ताकद शिल्लक न राहिल्याने भाजपाला पराभूत करण्याच्या नावाखाली विनाअट स.प.ला पाठिंबा द्यायचे ठरले आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि डाव्या आघाडीने तडजोडीचे पर्याय शिल्लक न राहिल्याने प. बंगाल मध्ये आघाडी बिनसली आहे. आसाममध्ये राजकिय दबावाखाली विरोधी छावण्यांत काँग्रेसच्या उमेदवारीमुळे राजकीय समीकरणे बदलली गेली आहेत. झारखंडमध्ये तिकीट वाटपाच्या तिढ्यातून काँग्रेस आणि राजद या आघाडी पक्षांतील घटक पक्ष यांमध्ये उमेदवार एकमेकांसमोर उभे राहत आहेत. महाराष्ट्रातही उमेदवार, मतदारसंघ आणि मित्रपक्ष यांच्या वाटपाबाबत एकमत होऊ न शकल्याने जागावाटप रखडले आहे. यावरून ध्यानात येते की हरयाणा निवडणुकीतील निकालांनंतर काँग्रेसची विश्वासार्हता आणि मित्रपक्षांशी निवडणुकीपूरती व्यवहारी सौदेबाजी करण्याच्या क्षमतांत घट झाली आहे. काँग्रेस आपल्या पूर्वीच्या धोरणांची आणि ताकदीची मित्र पक्षांवर अद्याप छाप पाडू पहात आहे, वास्तविक सर्वत्र त्यांच्या राजकीय ताकदीबाबत मित्र पक्षांत संभ्रम निर्माण झाला आहे त्याची नोंद पक्षाच्या वरिष्ठ नेतेमंडळींनी समजून घेण्याऐवजी बरचसे दुर्लक्ष केले जात असल्याने अनेक राज्यांत त्यांच्याशी असणारी राजकीय युती टिकवण्याऐवजी तुटली जात आहे. याचा अभ्यास करून आगामी राजकीय भूमिकांत वास्तवाला अनुसरून सुयोग्य फेरबदल आणि जनतेशी संपर्क वाढविण्यावर भर दिल्यास ते जास्त प्रभावी ठरु शकतील असे वाटते.

**- स्नेहा राज, गोरेगांव**

### पक्ष मोठा की व्यक्ती ?

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूका जाहीर झाल्यानंतर सर्वच पक्षात इकडून तिकडे उड्या मारण्याची स्पर्धा सुरु झाली आहे. प्रत्येकाला आमदार व्हायचय.ज्यांची साधा नगरसेवक होण्याची लायकी नाही तो आमदारकीची तिकिट मागतोय.त्यासाठी पक्षाला वेठीस धरण्याची आणि दबाव टाकण्याची खेळी खेळली जात आहे.आपल्याला जनतेचा किती पाठिंबा आहे याचा विचार न करता केवळ स्वार्थासाठी आपल्या मुठभर पाठीराख्याना घेऊन पक्षावर दबाव टाकला जातोय.मुळातच या व्यक्तिं स्वत:ला पक्षापेक्षा मोठा समजत असल्याचे भासवत आहेत.पण प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे की पक्षामुळे तुम्ही आहात.जनतेचा पाठिंबा नसेल तर पक्षाविरुद्ध बंडखोरी केल्यास काय होते याचा प्रत्यय आतापर्यंत अनेकाना आलेला आहे.

**- अरुण पां.खटावकर, लालबाग**

### ब्रिक्स परिषदेत भारताचा दबदबा

'ब्रिक्स' शिखर परिषद म्हणजेच ब्राझील,रशिया,भारत,चीन आणि दक्षिण आफ्रिका असे एकूण पाच देशांची नावांची आद्य अक्षरे एकत्र घेऊन 'ब्रिक्स' शिखर परिषद अशी आंतरराष्ट्रीय संघटना तयार झाली आहे. येत्या दोन महिन्यात जगातील सर्वात श्रीमंत राष्ट्र सौदी अरेबिया तसेच इराण इत्यादी महत्त्वाची देश 'ब्रिक्स' शिखर परिषदेचा भाग होणार आहे. जागतिक स्तरावर याआधीच मोजक्या संघटना अस्तित्वात आहे पण त्याचे नेतृत्व व नियंत्रण मात्र पाश्चिमात्य देशाकडे आहे. मात्र नव्याने निर्माण झालेली ब्रिक्स संघटना ही पर्याय ठरणार आहे. मागील दहा वर्षात संपूर्ण जगात भारताने चांगलाच दबदबा निर्माण केला आहे त्याचा प्रत्यय आता 'ब्रिक्स' शिखर परिषदेतही दिसू लागला आहे. महासत्ता रशिया याने चीनला या परिषदेत भारताशी जुळवून घेण्यास सांगितले आहे. त्यामुळेच भारत - चीन सीमेवरील विशेषतः डेमचोक आणि डेप्सांग येथून चीनने सैन्य माघारी घेण्यास सुरूवात केलेली आहे. थोडक्यात 'ब्रिक्स' शिखर परिषदेत भारताचा दबदबा असा जाणवला आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही,असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर. कुर्ला**

## कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेतर्फे दिवाळी फराळ वाटप

**उरण :** कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था ही उरण तालुक्यातील नामांकित व अग्रेसर सामाजिक संस्था असून या संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी विविध उपक्रम राबवले जातात. सामाजिक बांधिलकी जपत कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान सिबर्ड विशेष मुलांची शाळा बोरी नाका उरण मोरा रोड येथे दिवाळीनिमित्त मुलांना फराळ वाटप तसेच चित्रकलेचे साहित्य वाटप करण्यात आले. त्यानंतर रायगड जिल्हा परिषद शाळा पागोटे, कुंडेगाव, नवघर या शाळेतील सर्व मुलांना दिवाळीच्या फराळाचे वाटप करण्यात आले. फराळ व साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.यावेळी संस्थेचे संस्थापक कुणाल पाटील, सल्लागार महेश पाटील, अध्यक्ष सुमित पाटील, उपाध्यक्ष नकुल पाटील, सदस्य - प्रणय पाटील,ऋषिकेश म्हात्रे,विनय पाटील, अमित पाटील,हेमंत पाटील,आकाश म्हात्रे,रोशन म्हात्रे,ज्योतेश तांडेल, ऋतिक पाटील, साईराज पाटील,रितेश पाटील,अभिषेक केशवे,सेतराज साकेत, ऋषिकेश पाटील आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.फराळ वाटप साहित्य वाटपाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला.



### महत्त्वाचे

## तृतीयपंथींकडून मतदानाबाबत जनजागृती

**डोंबिवली :** कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघातील विठ्ठलवाडी परिसरातील खडेगोळवली येथील किन्नर अस्मिता संस्था आणि ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेने मतदान जनजागृती केली. मतदानाचा टक्का वाढण्यासाठी तृतीयपंथींसह ज्येष्ठ नागरिकांकडून जनजागृती करण्यात येत आहे. कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघात मतदार जनजागृतीसाठी विविध जनजागृतीपर स्वीप कार्यक्रमांची अंमलबजावणी ठिकठिकाणी होत आहे. या अनुषंगाने कल्याण पूर्वचे निवडणूक निर्णय अधिकारी रमेश मिसाळ आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्वाती घोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (ता. २६) नोडल अधिकारी विजय सरकटे यांच्या अधिपत्याखाली विठ्ठलवाडी परिसरातील खडेगोळवलीतील किन्नर अस्मिता संस्थेत मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी तृतीयपंथी मतदारांनी आम्ही मतदान करणार आणि तुम्ही पण मतदान करा, अशा घोषणा दिल्या. यावेळी मतदान जनजागृतीची शपथ घेण्यात आली. ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष आणि सचिव, त्याचप्रमाणे मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांना मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. यावेळी स्टुडंट ऑयकानचे प्रणव देसाई, स्वीप टीमचे कर्मचारी समाधान मोरे, सर्जेश वेलेकर, रवींद्र तवर, जितेश म्हात्रे, अदिती पवार, प्रियंका पडवळ, प्रतीक्षा भोईर आदी उपस्थित होते.

## पुरवठा शाखेत नागरिकांची गर्दी

**पनवेल :** पनवेलच्या पुरवठा शाखेत रेशनिंग कार्ड व इतर कामांसाठी नागरिकांची गर्दी होत आहे. मात्र महिना उलटून गेला तरी देखील नागरिकांना रेशन कार्ड हातात मिळत नसल्याने नागरिक नाराज आहेत. एक ते दीड महिन्यांपूर्वी पुरवठा विभागाचे अधिकारी प्रदिप कांबळे यांची बदली झाल्यानंतर अश्विनी धनवे यांची हा ठिकाणी नियुक्ती करण्यात आली. मात्र त्यांची काम करण्याची पद्धत वेगळी असल्याने त्याचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. नवीन रेशनिंग कार्ड मोठ्या प्रमाणात या ठिकाणी बनवण्यासाठी ढीग लागलेला दिसून येत आहेत. नागरिकांना दिलेल्या तारखेला रेशनिंग कार्ड मिळत नसल्याचे चित्र सध्या दिसत आहे. नवीन रेशनिंग कार्ड मिळण्यासाठी साधारण 30 दिवसांचा कालावधी लागतो मात्र दोन महिने उलटून गेले तरी देखील काही कार्डधारकांना रेशन कार्ड मिळाले नाहीत. तर नाव कमी किंवा वाढवण्यासाठी अंदाजे तीन ते सात दिवसांचा कालावधी लागतो.

# आमचं तिकीटही फुकट आणि पाठिंबाही फुकट, कुणीही पैशाचा व्यवहार करु नये : जरांगे पाटलांचं आवाहन

प्रतिनिधी
■ जालना

मी किंवा माझ्या जवळचे कोणीही इच्छुक उमेदवारांना तिकिटासाठी पैसे मागत नाहीत. आपलं तिकीटही किंवा पाठिंबाही फुकट असल्याचे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केलं आहे. कुणीही पैशाचा व्यवहार करू नये अशी विनंती देखील मनोज जरांगे यांनी केली आहे. माझ्या पाठिंबाच्या नावाखाली पैसे मागितल्याची चर्चा सुरु असल्याचे मनोज मनोज जरांगे यांनी सांगितलं.

आपलं तिकीट किंवा पाठिंबा हा फुकट असून कुणीही पैशाचा व्यवहार करु नये अशी विनंती देखील मनोज जरांगे यांनी केली आहे. माझ्या पाठिंबाच्या नावाखाली पैसे मागितल्याची चर्चा सुरु होती. याबाबत बोलताना जरांगे पाटील यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. आपलं तिकीट आणि पाठिंबा फुकट असल्याचे जरांगे पाटील म्हणाले.



आंतरवाली सराटीत आज शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते संदीप क्षीरसागर यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतली आहे. दोघांमध्ये जवळपास 20 ते 25 मिनिट चर्चा झाली. आपली किंवा पक्षाची भूमिका लपलेली नसून आपण अंधारात नाही तर दिवसा भेटायला आलो आहे. आपण जरांगे यांची भूमिका आणि त्यांच्या विचारांसोबत असल्याची प्रतिक्रिया यावेळी संदीप क्षीरसागर यांनी दिली आहे. संदीप क्षीरसागर यांना शरद पवार गटाकडून बीड विधानसभेची उमेदवारी मिळाली आहे.

***मनोज जरांगे पाटील यांना भेटण्यासाठी अनेकजण अंतरवाली सराटीत***

*विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम सुरु झाला आहे. अनेक राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी वाढल्या आहे. राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं पाहायला मिळत आहे. अशातच मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना देखील अनेकजण भेटायला येत आहेत. आज शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट (Sanjay Shirsat) यांनी मनोज जरांगे यांची जालन्यातील अंतरवाली सराटीत भेट घेतली. दोघांमध्ये अर्धा तास झालं चर्चा सुरु आहे. शिरसाट हे छत्रपती संभाजीनगर पश्चिम विधानसभा क्षेत्रातून शिवसेनेचे उमेदवार आहेत. दरम्यान, मंत्री उदय सामंत यांनी यांनी देखील कालच मनोज जरांगे यांची अंतरवाली सराटीत भेट घेतली होती. त्यानंतर लगेच आज शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी देखील आज अंतरवली सराटीमध्ये जाऊन मनोज जरांगे यांची भेट घेतलीय. त्यामुळं राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. गेल्या काही दिवसापासून शिंदे गटाच्या आमदारांच्या मनोज जरांगे पाटील यांच्याशी गाठी भेटी वाढल्या आहेत. त्यामुळं विविध चर्चांना उधाण आलं आहे.*

# लेकासाठी बापाने सख्ख्या भावाविरुद्ध थोपटले दंड



श्रीनिवास पवारांनी युगेंद्रच्या प्रचाराचा फोडला नारळ

प्रतिनिधी
■ बारामती

आगामी विधानसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघाकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. लोकसभा निवडणुकीला ननंद विरुद्ध भावजय असा सामना झाल्यानंतर आता विधानसभेला काका विरुद्ध पुतण्या अशी लढत बारामती मतदारसंघात पहायला मिळणार आहे. श्रीनिवास पवार यांनी युगेंद्र पवार यांच्या प्रचारासाठी भावाविरुद्ध दंड थोपटले असून आज त्यांनी मुलाच्या प्रचाराचा नारळ फोडला.

बारामती मतदारसंघातून अजित पवार आणि युगेंद्र पवार यांच्यात लढत होणार आहे. अजित पवार यांनी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शरद पवार गटाकडून युगेंद्र पवार यांना उमेदवारी देण्यात आली. युगेंद्र पवार 28 ऑक्टोबर रोजी शरद पवार यांच्या उपस्थितीत उमेदवारी नामांकन दाखल करणार आहेत. त्यापूर्वीच वडील श्रीनिवास पवार यांनी बारामती शहरातील काशी-विश्वेश्वर मंदिरात नारळ फोडून मुलगा युगेंद्र पवार यांच्या प्रचाराचा शुभारंभ केला. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघात सख्खे भाऊ एकमेकांच्या विरोधात पहायला मिळणार आहे. 64 वर्षांनंतर इतिहासाची पुनरावृत्ती होणार आहे.

दरम्यान, अजित पवार हे शरद पवारांपासून वेगळे होत भाजपसोबत सत्तेत सहभागी झाले. त्यांच्या या बंडाने राष्ट्रवादी फुट पडली. त्यानंतर घड्याळ चिन्ह आणि पक्षाचे नाव देखील अजित पवार यांना मिळाले. अजित पवार यांनी शरद पवारांची सोडली असली तरी त्यांचे सख्खे भाऊ श्रीनिवास पवार हे शरद पवारांसोबत राहिले. अजित पवार नालायक माणूस आहे, वडीलधाऱ्या व्यक्तींचा मान त्यांना ठेवता आला नाही, अशी खरमरीत टीका श्रीनिवास पवार यांनी अजित पवारांवर केली होती.शरद पवार यांनी त्यांच्या पुस्तकात म्हटलंय की, माझा भाऊ काँग्रेसच्या विरोधात उमेदवार होता.

***शरद पवारांनी केला होता भावाविरोधात प्रचार***

*1960 मध्ये बारामती लोकसभा मतदारसंघात लोकसभेची पोटनिवडणूक होती. यावेळी यशवंतराव चव्हाण यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. या निवडणुकीत शेकापने शरद पवार यांच्या मोठ्या भावाला म्हणजे वसंतराव पवारांना उमेदवारी दिली. अन् शरद पवारांनी काँग्रेसला मदत करताना भावाच्या विरोधात प्रचार केला. या निवडणुकीत वसंतराव पाटील यांचा पराभव झाला आणि काँग्रेसचे गुलाबराव जेधे विजयी झाले होते.*

# नितेश राणेंविरुद्ध मुस्लीम नेत्यानं ठोकला शड्डू

## सर्वधर्म समभावाचा संदेश देऊन विधानसभा लढणार

प्रतिनिधी
■ कणकवली

राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठीच्या लढती आता अंतिम होत आहेत. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असाच मुख्य सामना होत असून आता या दोन्ही युती व आघाडींकडून उमेदवारांच्या याद्यांना अंतिम स्वरुप देण्यात येत आहे. भाजपने ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती, त्यामध्ये कणकवली मतदारसंघातून विद्यमान आमदार नितेश राणेंना उमेदवारी दिली आहे. तर, निलेश राणेंनी काही दिवसांपूर्वीच शिवसेनेत प्रवेश केला असून तेही विधानसभा निवडणुकीच्या रणांगणात उतरणाले आहे. नितेश राणे येथील कणकवली-देवगड मतदारसंघातून दोनवेळा आमदार राहिले आहेत. त्यामुळे, यंदा ते हॅटट्रीक साधण्याच्या तयारीत आहेत. मात्र, त्यांच्या अडचणी वाढताना दिसून येते. कारण, नितेश राणेंविरुद्ध एका मुस्लीम नेत्यानेही शड्डू ठोकला आहे. राणेंनी मुस्लीम समजाबाबत केलेल्या वक्तव्याची किंमत त्यांना मोजावी लागेल, असे उमेदवार नवाज खाणी यांनी म्हटले आहे.



विधानसभा निवडणुकांची रणधुमाली सुरू असून बंडखोरी रोखण्यासाठी सर्वपक्षीय नेते कामाला लागले आहेत. मात्र, याचदरम्यान, मुस्लिम समाजावर टीका करणे आमदार नितेश राणेना भोवणार आहे. कारण, मागील अनेक निवडणुकांमध्ये सहकार्य करणाऱ्या मुस्लिम समाजाच्यावतीने अपक्ष उमेदवार विधानसभा निवडणूक रिंगणात उतरवण्यात येणार आहे. मुस्लिम समाजाचे नेते नावाज खाणी यांनी नितेश राणे यांच्या विरोधात दंड थोपटले असून नितेश राणेंना समाजाची ताकद दाखवणार असल्याचं खाणी यांनी म्हटलं आहे. तसेच, एमआयएम पक्षाबाबत माझी बोलणी सुरू असून मला पाठिंबा मिळेल, असा विश्वास आहे. मी माझ्या धर्मातील वरिष्ठांना, समाजातील महत्त्वाच्या पदाधिकारी व व्यक्तींना विचारुनच मी हा निर्णय घेतलेला आहे, असेही खाणी यांनी म्हटले. त्यामुळे, खाणी यांनी नितेश राणेंविरुद्ध रणशिंग फुंकल्याचं पाहायला मिळत आहे.

नितेश राणे दोन गटांमध्ये वाद करण्याचा प्रयत्न करत आहेत, आपल्या जिल्ह्यात तसे चालत नाही, यापूर्वीही तसे नव्हते. त्यामुळे, सर्वधर्म समभाव हा संदेश घेऊन मी नितेश राणेंविरुद्ध निवडणूक लढवणार आहे. मुस्लीम समाजाने राणेंना यापूर्वी भरभरुन दिलंय. मात्र, आता राणेंविरुद्ध मी मैदानात उतरणार आहे, मी माझी भूमिका जाहीर केल्यापासून माझ्यावर दबाव येत आहे, मला धमकीचे फोन येत आहेत, पण आम्ही घाबरणाऱ्यांपैकी नाही. आम्ही लढणार आणि जिंकणार, असे नवाज खाणी यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले.

# आझाद हिंद सरकारचा वर्धापन दिन संपन्न

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबईत सोमवारी आझाद हिंद सरकारचा 81 वा वर्धापन दिन वाशी रेल्वे स्थानकासमोर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे मेजर जनरल जीडी बक्षी, नेताजींचे नातू चंद्रकुमार बोस, उमा मेनन बोस, राष्ट्रीय अध्यक्ष पंजाबराव मुधाने उपस्थित होते. त्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद सरकारच्या सन्मानार्थ तिरंगा फडकावला. व पाहुण्यांनी नेताजींच्या चित्राला पुष्पहार अर्पण करून, दिप प्रज्वलित करून नेताजींना अभिवादन केले.

मंचावर मेजर जनरल जीडी बक्षी, सन्मा चंद्रकुमार बोस, उमा मेनन बोस, राष्ट्रीय संरक्षक श्री डॉ. ए.के. सक्सेना, राष्ट्रीय संरक्षक गणपत कोठारी, राष्ट्रीय संरक्षक इक्बाल मेमन ऑफिसर, डॉ. सारिका शाह, जम्मू काश्मीर डोग्रा समाजाचे अध्यक्ष कृष्णा पंडीत,युवा सेवा मंचचे अमरीश बारोट, सावरकर मंचचे सुभाष कानडे या सर्वांचे जयहिंद सैनिक संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष पंजाबराव मुधाणे यांनी शाल, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन स्वागत केले. श्रीमती नर्गिस चिरडे यांनी ये "मेरे वतन के लोगो" हे गाणे गायले.



***जयहिंद सैनिक संस्थेच्या मागण्या***

*१) नेताजींच्या आझाद हिंद सरकारच्या स्मरणार्थ 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी प्रमाणे दरवर्षी 21 ऑक्टोबर रोजी 60,000 आझाद हिंद सेना आणि 26,000 शहीद सैनिकांना लाल किल्ल्यावरून तसेच देशाच्या कानाकोपऱ्यात तिरंगा ध्वज फडकवून आदरांजली वाहण्यात यावी. २) नेताजी सुभाषचंद्र बोस यांची देशभक्ती, संघर्षमय कार्य आणि क्रांतिकारी विचार देशातील सर्व शाळा-महाविद्यालयांमध्ये शिकवले जावेत! ३) जपानच्या रिंकुजी मंदिरात असलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या अस्थी भारतात परत आणाव्यात! ४) नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 23 जानेवारी ला सुट्टी देऊन 23 ते 31 जानेवारी दरम्यान देशभरात "सुभाष जयंती पंधरवडा" साजरा करण्यात यावा.५) सैनिकांचे गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी महावीर चक्र दिगेंदर कुमार यांना राज्यसभेत खासदार करावे.*

राष्ट्रीय अध्यक्ष पंजाबराव मुधाणे यांनी प्रस्तावना केली व संस्थेच्या कार्याची ओळख करून दिली. संस्थेच्या कार्यकर्त्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला! त्यानंतर मेजर जनरल जी.डी. बक्षी आणि नेताजींचे नातू चंद्रकुमार बोस जी यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस जी आणि आझाद हिंद फौज यांच्या शौर्याबद्दलच्या रोमांचक कथांनी सभा भारावली. नेताजी आणि आझाद हिंद फौजेला देशात पाहिजे तसा आदर मिळत नाही, अशी खंत चंद्रकुमार बोस यांनी व्यक्त केली .

# महिलांच्या अपमानाचे समर्थन करणार नाही, पण जाळपोळ, तोडफोडीचे हे कुठले राजकारण!

## मंत्री विखे -पाटील यांचा काँग्रेसला सवाल

प्रतिनिधी
■ संगमनेर

महिलांचा अपमान होत असेल त्या ठिकाणी आम्ही कधीच समर्थन करणार नाही, असे भाजप नेते आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले आहेत. काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांची कन्या जयश्री थोरात यांच्याबाबत भाजपचे नेते वसंत देशमुख यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यासंदर्भात ते असे म्हणाले आहेत. संगमनेर येथे महायुतीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधता त्यांनी हे वक्तव्य केले.

विखे पाटील म्हणाले की, गाड्यांची जाळपोळ आणि तोडफोड झाली. या घटनेचे निषेध करणारे फलक गावागावात लावायला हवे होते. मात्र लागले नाही. गावामध्ये जागृती केली नाही, मग कोणत्या निवडणुकीला सामोरे



जाणार? संगमनेरमध्ये महायुतीचा उमेदवार कोण? यासंदर्भात आपण विचार केला पाहिजे. उमेदवार कोणीही असूद्या, युती म्हणून आपण भूमिका घ्यायला हवी, असं ते कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले.'ते पुढे म्हणाले, काँग्रेसच्या लोकांनी सभेत येऊन धिंगाणा घातला. राजकारणात कधी अशी घटना घडली नाही. घटनेचे राजकारण करून आम्हाला राज्यात बदनाम करण्याचे प्रयत्न तुम्ही करताय. चोराच्या सगळ्या उलट्या बोंबा सुरू आहेत. या तालुक्याचे नेतृत्व असं आहे की, आपलं ठेवायचे झाकून, दुसऱ्याचे बघायचे वाकून.

'वसंत देशमुख यांच्या वक्तव्याचे मी समर्थन करत नाही'

विखे पाटील म्हणाले की, ' चौथी सभा झाल्यानंतर सुजयच्या लक्षात आले, काहीतरी गडबड आहे. वसंत देशमुख यांच्या वक्तव्याचे मी समर्थन करत नाही. अर्ध्या तासात काठ्या कुऱ्हाडी घेऊन लोक जमा झाले. कार्यकर्त्यांना मारहाण करायची होती आणि सुजयवर सुद्धा प्राणघातक हल्ला करण्याचा डाव होता. संगमनेर तालुक्यात इतका दहशतवाद मी कधी बघितला नाही. महिलांचा अपमान होत असेल त्या ठिकाणी आम्ही कधीच समर्थन करणार नाही. सामान्य माणसात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न होतोय. त्यांना काहीतरी निम्मित हवं होतं. इथल्या कंत्राटदारांचे काय करायचे ते बघू.. तुम्ही चिंता करू नका,असेही विखे शेवटी म्हणाले.

# पुण्यातील प्रसिद्ध चितळे बंधूंच्या दुकानात दरोडा

## CCTV फुटेज व्हायरल

प्रतिनिधी
■ पुणे

पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. दिवाळीच्या सणाच्या तोंडावर पुण्यातील आणि देशभर प्रसिद्ध असलेल्या चितळे बंधू मिठाईच्या दुकानात चोरी झाली आहे. पहाटेच्या दरम्यान ही घटना घडली असून १ लाख ४१ हजारांची रोख रक्कम चोरांनी लंपास केली. त्यासोबतच चितळेंची प्रसिद्ध असलेली बाकरवडीही त्यांनी चोरांनी नेली. या चोरीच्या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोरल आले आहे. बाणेर पोलिसांना चोरी झाल्याची माहिती समजताच घटनास्थळी पाहणी करून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

चितळे बंधू मिठाईवाल्यांच्या बाणेर शाखेत आज पहाटे चार वाजण्याच्या सुमारास दोन चोरट्यांनी गल्ल्यातील रोख रक्कम लंपास केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही रक्कम १ लाख ४१ हजार रुपये इतकी आहे. लॉकरमधील मध्यभागी असलेला शटर लॉक केलेला नसल्यामुळे चोरट्यांना तो उघडणे सोपे गेले. मात्र, एवढी आतली माहिती




***पैसे आणि दाग-दागिन्यांची घ्या काळजी***

*दिवाळीचा सण असल्याने आता प्रत्येकजण आपले दाग-दागिने आणि पैसे घरी आणतात. लक्ष्मीपूजनाला या गोष्टी पूजल्या जातात. त्यानंतर सुट्टीत बरेचजण दिवाळीच्या सणाला गावी जातात. मात्र याच गोष्टीचा चोर फायदा घेतात, त्यामुळे घरी चोरी होणार याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी. घरात आणलेले दागदागिने आणि कॅश रक्कम सोबत घेऊन जा किंवा बँकमध्ये ठेवा जेणकरून चोरांच्या हाती लागणार नाही.*

चोरट्यांना कशी मिळाली, याचाही पोलीस शोध घेत आहेत. या कटात कोणता कामगार किंवा आतला माणूस सहभागी आहे का, याची शंका वर्तवली जात आहे. बाणेर पोलीस स्टेशनमध्ये या चोरीसंदर्भात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरांचा शोध घेतला जात आहे. चोरांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेतला आणि चोरी केली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज पाहत तपासाला सुरूवात केली आहे. चोरी करून झाल्यावर कोणत्या मार्गाने फरार झाले हे पाहून त्यांची माहिती घेत आहेत.

## लाडक्या बहिणी'साठी पैसे घेणाऱ्यावर गुन्हा

**डोंबिवली :** कल्याण ग्रामीण सागाव चेरानगर भागात 'लाडकी बहीण' योजनेसाठी महिलांचे अर्ज भरण्याच्या प्रक्रियेसाठी पैसे उकळल्याचा प्रकार उघड झाला आहे. या घटनेमुळे महिलांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या प्रकारावर आवाज उठवणारे धीरज तिवारी यांनी सोशल मीडियावर याची माहिती दिली असता त्यांना राजन पांडे यांनी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला जात आहे. याप्रकरणी मानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार धीरज तिवारी हे सागाव येथे राहणारे आहेत, काही लोक गरीब महिलांकडून अर्ज भरण्याच्या बदल्यात पैसे घेत आहेत. या योजनेसाठी कोणतेही शासकीय शुल्क नसताना महिलांकडून ३०० रुपये घेतले जात आहेत. याबाबत तिवारी यांनी विरोध केला असता तिवारी यांना विरोधकांकडून धमकावण्यात आले. याप्रकरणी धीरज यांनी मानपाडा पोलिस ठाण्यात पांडे यांच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे.

# आरपीआयला किमान 2-3 जागा द्या!

## आठवलेंची महायुतीकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

महायुतीचे जागावाटप अंतिम टप्प्यात पोहचले आहे. काही जागांवरील तिढा आज सुटण्याची शक्यता आहे. महायुतीचा घटकपक्ष आरपीआयला अद्याप एकही जागा मिळाली नाही. रामदास आठवले यांनी महायुतीला दोन जागा देण्याची मागणी केली आहे.

आरपीआयने महायुतीकडे दोन जागांची मागणी केली आहे. या आधी आठवलेंनी आरपीआयला 8 ते 10 मागीतल्या होत्या. मात्र किमान दोन तीन जागा तरी द्याव्यात किंवा विधान परिषद मिळावी. महामंडळ मिळावे. सत्तेत सहभाग ठिक ठिकाणी देण्याचा निर्णय करावा, अशी आमची मागणी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे.



पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात विकास सुरू आहे, म्हणून आम्ही महायुती सोबत आहोत. मात्र आरपीआयच्या कार्यकर्त्यायमध्ये नाराजी आहे. त्यामुळे महायुतीने विचार करावा आणि दोन जागा द्याव्यात, अशी मागणी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. एका कार्यक्रमासाठी आठवले कल्याणात आले होते. यावेळी त्यानी पत्रकारांशी संवाद साधला.

महाराष्ट्रात आरपीआय आठवले गटाला महायुतीकडून एकही जागा न दिल्यामुळे आता आरपीआय आठवले गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या कुठल्याच उमेदवाराचं प्रचार करणार नसल्याचं आरपीआय आठवले गटाच्या कार्यकर्त्यांनी घोषित केला आहे मुलुंड मध्ये आरपीआय कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत देवेंद्र फडणवीस आणि भाजपचा निषेध केला. ईशान्य मुंबईमध्ये आम्ही महायुतीच्या कुठल्याही उमेदवाराचा प्रचार करणार नसल्याचं यावेळी या कार्यकर्त्यांकडून सांगण्यात आलं.

## अजिवली प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रथम पुरस्कार जाहीर

**पनवेल :** केंद्र व राज्य शासनाच्या वतीने शासकीय रुग्णांचा आरोग्य सुविधांचा दर्जा व नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात या हेतून आरोग्य संस्थांना 'कायाकल्प' पुरस्काराने गौरविण्यात येते. सन 2023-24 या वर्षातील 'कायाकल्प' पुरस्कारांची घोषणा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आली.रायगड जिल्ह्यामध्ये सन 2023 - 24 या वर्षांमध्ये राबविण्यात आलेल्या कायाकल्प उपक्रमामध्ये 54 आरोग्य केंद्रांनी तसेच 288 आरोग्य उपकेंद्रानी सहभाग घेतला होता, त्यामध्ये 10 प्राथमिक आरोग्य केद्रांसह 43 आरोग्य उपकेद्रांना हा पुरस्कार जाहीर झाला

# दीपावलीचे पारंपारिक अध्यात्मशास्त्र

अज्ञानाच्या अंधःकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारा सण म्हणजे दिवाळी ! दिवाळी हा शब्द दीपावली या शब्दापासून बनला आहे. दीपावली हा शब्द दीप + आवली (रांग, ओळ) असा बनला आहे. त्याचा अर्थ आहे, दिव्यांची रांग किंवा ओळ. दिवाळीला सर्वत्र दिवे लावतात. चौदा वर्षांचा वनवास संपवून प्रभू श्रीराम अयोध्येला परत आले, त्या वेळी प्रजेने दीपोत्सव केला. तेव्हापासून दीपावली उत्सव सुरू आहे. सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखात दीपावलीचे अध्यात्मशास्त्र जाणून घेऊया. दीपावलीसारखा सण शास्त्र म्हणून साजरा केला, तसेच तो साजरा करतांना होणारे अपप्रकार टाळले तर आपल्याला चैतन्याची अनुभूती घेता येईल. श्री लक्ष्मी, श्रीकृष्ण आणि यमदेव आदींचे स्मरण करून हा दीपोत्सव शास्त्रानुसार साजरा करून आनंद द्विगुणित करूया !




**दिवाळीतील दिवसांचे महत्त्व**

आश्विन वद्य त्रयोदशी (धनत्रयोदशी), आश्विन वद्य चतुर्दशी (नरक चतुर्दशी), आश्विन अमावास्या (लक्ष्मीपूजन) आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा (बलीप्रतिपदा) असे चार दिवस दिवाळी साजरी केली जाते. काही जण त्रयोदशीला दिवाळीत न धरता, दिवाळी उरलेल्या तीन दिवसांची आहे, असे समजतात. वसुबारस आणि भाऊबीज हे दिवस दिवाळीला जोडून येतात, म्हणून त्यांचा समावेश दिवाळीत केला जातो; पण वस्तूतः ते सण वेगवेगळे आहेत. दिवाळीतील प्रत्येक दिवसाचे अध्यात्मशास्त्रीय महत्त्व थोडक्यात समजून घेऊया.

**वसुबारस आणि गुरुद्वादशी :** आश्विन वद्य द्वादशी या दिवशी वसुबारस तसेच गुरुद्वादशी हे सण साजरे केले जातात. या दिवशी आपल्या अंगणातील गाईला वासवदत्तेचे स्वरूप प्राप्त होते, म्हणजेच तिचे एकप्रकारे बारसे होऊन तिला देवत्व प्राप्त होते. यासाठीच या दिवसाला वसुबारस असे म्हणतात. समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या, अशी कथा आहे. त्यातल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे. याच तिथीला गुरुद्वादशीच्या निमित्ताने शिष्य गुरूंचे पूजन करतात.

**धनत्रयोदशी (धनतेरस) :** आश्विन वद्य त्रयोदशीच्या दिवशी हा सण साजरा केला जातो. दीपावलीला जोडून येणाऱ्या या सणाच्या निमित्ताने नवीन सुर्वणालंकार विकत घेण्याची प्रथा आहे. व्यापारी वर्ग आपल्या तिजोरीचे पूजनही याच दिवशी करतात. हा दिवस व्यापारी लोकांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो; कारण धनप्राप्तीसाठी श्री लक्ष्मीदेवीचे पूजन केले जाते. साधनेसाठी अनुकूलता आणि ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठी या दिवशी धनलक्ष्मीची पूजा करतात. वर्षभर योग्य मार्गाने धन कमवून वार्षिक उत्पन्नाचा १/६ भाग धर्मकार्यासाठी अर्पण करावा.

**यमदीपदान -** या दिवशी यमदीपदानाला विशेष महत्व आहे. अकाली मृत्यू कुणालाच येऊ नये, याकरिता धनत्रयोदशीस यमधर्माच्या उद्देशाने कणकेचा तेलाचा दिवा (काही जण तेरा दिवे लावतात) करून तो घराच्या बाहेरच्या बाजूस दक्षिणेला तोंड करून सायंकाळी लावावा. एरव्ही दिव्याचे तोंड दक्षिणेस कधीही नसते. फक्त या दिवशी तेवढे दिव्याचे तोंड दक्षिणेस करून ठेवावे. त्यानंतर पुढील प्रार्थना करावी – 'धनत्रयोदशीला यमाला केलेल्या दिव्याच्या दानाने प्रसन्न होऊन त्याने मृत्यूपाश आणि दंड यातून माझी सुटका करावी.'

**धन्वंतरि जयंती :** आयुर्वेदाच्या दृष्टीने धनत्रयोदशी हा दिवस धन्वंतरि जयंतीचा आहे. वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीचे (देवांचा वैद्य) पूजन करतात. कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे आणि साखर असे 'प्रसाद' म्हणून देतात. यात मोठा अर्थ आहे. कडुनिंबाची उत्पत्ती अमृतापासून झाली आहे. धन्वंतरि हा अमृतत्व देणारा आहे, हे त्यातून प्रतीत होते. या दिवशी तोच धन्वंतरि प्रसाद म्हणून देण्यात येतो.

**नरक चतुर्दशी :** नरकासुर राक्षसाच्या वधाप्रित्यर्थ साजरा केला जाणाऱ्या दिवाळीतील या सणाच्या निमित्ताने पहाटे सूर्योदयापूर्वी उठून अभ्यंगस्नान केले जाते. अभ्यंगस्नानानंतर अपमृत्यू निवारणार्थ यमतर्पण करण्यास सांगितले आहे. हा तर्पणाचा विधी पंचांगात दिलेला असतो. त्याप्रमाणे विधी करावा. श्रीकृष्णाने नरकासुराला ठार मारले, याचे स्मरण करून श्रीकृष्णाला प्रार्थना करावी, 'माझ्यातील नरकरूपी पापवासना आणि अहं यांचा नाश करून माझा ईश्वरप्राप्तीचा मार्ग सुलभ कर.' या दिवशी ब्राह्मणांना भोजन आणि वस्त्रांचे दानही दिले जाते तसेच प्रदोषकाळी दीपदान करतात. ज्याने प्रदोषव्रत घेतले असेल, तो प्रदोषपूजा आणि शिवपूजा करतो.

**लक्ष्मीपूजन :** लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्रीविष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले आणि त्यानंतर ते सर्व देव क्षीरसागरात जाऊन झोपले, अशी कथा आहे. प्रातःकाळी मंगलस्नान करून देवपूजा, दुपारी पार्वणश्राद्ध अन् ब्राह्मणभोजन आणि प्रदोषकाळी लतापल्लवींनी सुशोभित केलेल्या मंडपात लक्ष्मी, श्रीविष्णु इत्यादी देवता आणि कुबेर यांची पूजा, असा लक्ष्मीपूजन या दिवसाचा विधी आहे. या दिवशी श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व कार्यरत असते. या तत्त्वाचा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी श्री लक्ष्मीदेवीची पूजा यथासांग करावी.

**बलीप्रतिपदा :** कार्तिक शुद्ध प्रतिपदा (दिवाळी पाडवा). श्रीविष्णूने ही तिथी बलीराजाच्या नावाने केली, म्हणून या तिथीला 'बलीप्रतिपदा' म्हटले जाते. अत्यंत दानशूर, परंतु दान कोणाला द्यावे याची जाण नसलेल्या बलीराजाला भगवान श्रीविष्णूने वामनावतार घेऊन पाताळात धाडल्याचा हा दिवस. दिवाळी पाडवा साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त आहे. हा 'विक्रम संवत' कालगणनेचा वर्षारंभदिन म्हणून साजरा करतात. या दिवशी अभ्यंगस्नान करून स्त्रिया पतीला ओवाळतात. या दिवशी गोवर्धन पूजा करतात. नवीन वस्त्रालंकार घालून, पक्वानांचे भोजन करून आनंद साजरा करतात.

**भाऊबीज (यमद्वितीया) :** कार्तिक शुद्ध द्वितीया हा दिवस म्हणजे भाऊबीज. या दिवशी यम आपली बहीण यमुना हिच्या घरी जेवायला गेला; म्हणून या दिवसाला 'यमद्वितीया' असे नाव मिळाले. या दिवशी मृत्यूची देवता यम आपल्या बहिणीकडे जेवायला जात असल्याने नरकातील जिवांना या दिवशी नरकयातना भोगाव्या लागत नाही, असे म्हटले जाते. तसेच या दिवशी बहीण भावाला ओवाळून त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. या दिवशी भावाने बहिणीकडे जावे आणि बहिणीने भावाला ओवाळावे. एखाद्या स्त्रीला भाऊ नसेल, तर तिने कोणाही परपुरुषाला भाऊ मानून त्याला ओवाळावे. ते शक्य नसल्यास चंद्राला भाऊ मानून ओवाळावे. अपमृत्यू निवारणार्थ 'श्री यमधर्मप्रीत्यर्थं यमतर्पणं करिष्ये ।' असा संकल्प करून यमाच्या चौदा नावांनी तर्पण करावे. हा विधी पंचांगात दिलेला असतो. याच दिवशी यमाला दीपदान करायचे असते.

हल्ली दिवाळी सणात रात्री उशिरापर्यंत कानठळ्या बसणारे व मोठ्या आवाजाचे फटाके फोडले जातात. यातून ध्वनी आणि वायू प्रदूषण तर होतेच तसेच जीवित आणि वित्तहानीच्या घटना सुद्धा फटाक्यांमुळे घडतात. फटाक्यांमध्ये लक्ष्मीबार, कृष्णबार, नेताजी सुभाषचंद्र बाँब आदी देवता व राष्ट्रपुरूष यांची चित्रे असलेले फटाके सुद्धा फोडले जातात. देवता आणि राष्ट्रपुरुषांचे चित्र असलेले फटाके वाजवल्यावर त्या चित्रांचे तुकडे इतरत्र पडून त्यांचा अनादर होतो आणि धर्महानी केल्याचे पातक लागते. फटाक्यांवर खर्च होणारे पैसे राष्ट्र आणि धर्मकार्यासाठी अर्पण करा ! दिवाळी हा सण पावित्र्याचा, मांगल्याचा, आनंदाचा आहे. दिवाळीच्या दिवसांत अधिकाधिक साधना (म्हणजेच नामजप, प्रार्थना, सत्सेवा, दान आदी) करण्याचा प्रयत्न करावा. याचा साधना करणाऱ्या व्यक्तीला आध्यात्मिक लाभ होईल !

**संदर्भ :**
**सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण साजरे करण्याच्या पद्धती'**

# फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या!



आपण वर्षभर विविध सण साजरे करतो त्यात दिवाळी या सणाला विशेष महत्व आहे. दिवाळी सणाला सणांचा राजा म्हंटले जाते कारण दिवाळी हा एकमेव असा सण आहे जो पाच दिवस चालतो. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचाच आवडीचा हा सण आहे. या सणाचा उत्साह काही औरच असतो. या सणाइतका आनंद दुसऱ्या कोणत्याच सणात नसतो. दिवाळी सण म्हणजे दिव्यांचा सण, प्रकाशाचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या कालावधीत पणत्या, मेणबत्त्या, आकाशकंदील, नवी खरेदी, नवे कपडे, मिठाई, रांगोळी, दिवाळी अंक, धार्मिक गोष्टी, मित्र - मैत्रीणी, नातेवाईकांच्या भेटी, कौटुंबिक संमेलन आणि फटाके या साऱ्या गोष्टी आल्या. यातील सर्वात महत्वाचे म्हणजे फटाके. फटाके आणि दिवाळी हे तर जणू समीकरणच झाले आहे. फटाक्यांशिवाय दिवाळीच साजरी होऊ शकत नाही अशी आजची अवस्था आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच फटाके उडवतात. वास्तविक दिवाळी हा दिव्यांचा सण आहे, फटाक्यांचा नाही तरीही दिवाळीत फटाक्यांना अवास्तव महत्व दिले जाते. दरवर्षी दिवाळीत फटाके उडवू नका, फटाक्यांमुळे होणाऱ्या दुष्पिणामांचा फटका केवळ मानव जातीलच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीला बसतो त्यामुळे दिवाळीत फटाके उडवू नका. फटाके उडवायचेच असेल तर हरित फटाके उडवा असे आव्हान सरकारतर्फे तसेच अनेक सामाजिक व सेवाभावी संस्थांकडून केले जाते मात्र त्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जाते. अर्थात काही लोक त्यांच्या आव्हानास प्रतिसाद देतात मात्र त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. फटाक्यांचे समर्थन करणारे नेहमी म्हणत असतात की दिवाळीतच फटाके न वाजवण्याचे आव्हान का केले जाते ? याचे कारण असे आहे की दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात. दिवाळी इतके फटाके इतर कोणत्याही वेळी वाजवले जात नाही. अधिक फटाके वाजवल्याने त्याचे दुष्परिणामही अधिक होतात. दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे प्रदूषण वाढते. आधीच आपल्या देशाची हवा प्रदूषित आहे. मुंबई - दिल्लीसारख्या शहरांच्या हवेने धोक्याची पातळी गाठली आहे त्यात जर फटाक्यांच्या प्रदूषणाची भर पडली तर लोकांना श्वास घेणेही मुश्कील होईल तसे झाले तर त्याचा परिणाम केवळ मानवाच्याच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीच्या आरोग्यावर होईल. कॉपर, कॅडियम, लेड, गंधक, फॉस्फरस, सल्फर, मॅग्नेशियम, सोडियम, झिंक, नायट्रेट आदी रसायनांपासून फटाक्यांची निर्मिती केली जाते. ही रसायने मानवी आरोग्यास घातक आहेत. फटाक्यातील कॉपरमुळे श्वसनमार्गात दाह होतो. त्यामुळे दम्याच्या रोगांच्या आजारात वाढ होते. हृदयविकार आणि फुफ्फुसांचे आजार होण्याची शक्यता असते. लेड मज्जासंस्थेवर परिणाम करते. कॅडीयम मूत्रपिंडाचे नुकसान करते. सल्फर हे वनस्पतींसाठी घातक आहे. सल्फरमुळे वनस्पतींची वाढ खुंटते. सल्फरमुळे झाडांच्या फळावर अनिष्ट परिणाम होतो. ही फळे खाण्यात आल्यास खणाऱ्यांना विषबाधा होण्याचा धोका असतो. फटाक्यांमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा लहान मुले, वयोवृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांना खूप त्रास होतो. सतत चार ते पाच दिवस कानठळ्या बसवणाऱ्या आवाज ऐकल्यावर कायमचे बहिरेपणा येण्याची शक्यता असते. शिवाय फटाके फोडताना योग्य ती काळजी घेतली नाही तर अपघात होऊन कायमचे अपंगत्व येण्याची शक्यता असते. ऐन दिवाळीत फटाक्यांच्या दुकानांना किंवा कारखान्यांना आग लागून दुर्घटना घडल्याचे आणि त्यात जीवित आणि वित्त हानी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत हे देखील विसरता येणार नाही. या सर्व बाबींचा विचार केला तर फटाके किती घातक आहेत हे लक्षात येईल. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची वेळ आली आहे. मानवी आणि सजीव सृष्टीवर परिणाम करणारे हानिकारक फटाके दूर ठेवून आपण दिवाळी साजरी केली तर वाढत्या प्रदूषणाला आळा घालता येईल शिवाय आरोग्यही चांगले राहील. चला तर मग फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या! फटाके दूर करून हा आनंदाचा सण साजरा करू या!!

# भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा !

मागील वर्षी बाघ बकरी चहा कंपनीचे संचालक पराग देसाई यांचा भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला होता. पराग देसाई यांचा असा वेदनादायी अंत खरोखरीच दुर्दैवी होता. पराग देसाई यांच्या मृत्यूनंतर भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला होता. पराग देसाई यांच्यावर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्यावर स्वतःचा बचाव करताना पराग देसाई अडखळून पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला त्यातच त्यांचा दुर्दैवी अंत झाला. पराग देसाई यांचा मृत्यूने संपूर्ण राज्य हळहळले. पराग देसाई हे प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे त्यांच्या मृत्यूची बातमी



झाली न्युज चॅनलवर त्याची ब्रेकिंग न्युज झळकली होती तेंव्हा अशी अपेक्षा होती की भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनातर्फे ठोस पावले उचलण्यात येतील मात्र ही अपेक्षा फोल ठरली कारण भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनातर्फे कोणतेही ठोस पावले उचलण्यात आली नाहीत. उलट भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढतच चालला आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेले पराग देसाई हे देशातील पहिले व्यक्ती नसून याआधीही अशा अनेक घटना घडल्या आहेत. आपल्या देशात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दररोज सहा हजारांहून अधिक लोक जखमी होतात अशी सरकारी आकडेवारी आहे. दररोज सहा हजारांहून अधिक लोक जर भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी होत असेल तर ती मोठी गंभीर बाब आहे. केवळ शहरातच नाही देशातील गावागावात भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत आहे. गाव असो वा शहर, चाळ असो वा सोसायटी, पायवाट असो वा महामार्ग, चौक असो वा नाका सर्वत्र तुम्हाला भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी उभ्या असलेल्या दिसतील. हे भटके कुत्रे रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकांवर अचानक हल्ला करतात. विशेषतः शाळकरी मुले , वृध्द, अपंग व महिलांना भटके कुत्रे टार्गेट करतात. दबा धरून बसलेले भटके कुत्रे अचानक घेराव घालून हल्ला करतात. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात लोक अक्षरशः रक्तबंबाळ होतात. भटक्या कुत्र्यांच्या चावण्याने रेबीज नावाचा रोग होतो या रोगावर जर वेळीच उपचार केला नाही तर रोगी दगावण्याची देखील शक्यता असते मात्र अनेक सरकारी रुग्णालयात रेबीज वरील लसच उपलब्ध नसते. ग्रामीण भागात तर हे नेहमीचेच चित्र आहे. भटक्या कुत्र्यांची दहशत केवळ रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकानांच आहे असे नाही तर पाळीव प्राण्यांना देखील आहे. शेळी, मेंढी, कोंबड्या यासारख्या पाळीव प्राण्यांवर देखील भटकी कुत्री हल्ले करतात. भटक्या कुत्र्यांच्या झुंडी अचानक येऊन पाळीव प्राण्यांचा फडशा पाडतात. भटक्या कुत्र्यांचा त्रास वाहन चालकांना देखील होतो विशेषतः दुचाकी स्वारांना भटके कुत्र्यांची मोठी दहशत आहे. रस्त्यांवर दुचाकी दिसली की भटके कुत्रे वाहनांच्या मागे धावतात, वाहनांना आडवे येतात त्यामुळे बऱ्याचदा अपघात होतो आणि त्या अपघातात वाहन चालक जखमी होतात त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांकडून होत असते मात्र त्यावर प्रशासन गंभीर नसते. खूपच मागणी झाली किंवा प्रसार माध्यमातून आवाज उठवला तर दिखाव्यासाठी कारवाई केली जाते. भटक्या कुत्र्यांचे निर्बिजिकरण नियमित केले जाते असे प्रशासनामार्फत सांगितले जाते मात्र वस्तुस्थिती वेगळीच आहे. जर भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण नियमित केले जाते तर मग देशातील भटक्या कुत्र्यांची संख्या का वाढत आहे असा प्रश्न आहे. एकट्या मुंबई शहराचे उदाहरण घेऊ. २०१४ साली मुंबईत ९५ हजार भटकी कुत्री होती आज त्यांची संख्या १ लाख ६४ हजार इतकी आहे याचाच अर्थ मागील , नऊ वर्षात मुंबईतील भटक्या कुत्र्यांची संख्या ७२ टक्क्यांनी वाढली. जर भटक्या कुत्र्यांची संख्या अशीच वाढत राहिली आणि त्यांचे नागरिकांवर होणारे हल्ले देखील वाढत राहिले तर भविष्यात मानव विरुद्ध भटकी कुत्री असा संघर्ष निर्माण होऊ शकतो तो होऊ द्यायचा नसेल तर शासन, प्रशासनाने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी ठोस उपाय योजायला हवेत. केवळ निर्बिजीकरण केल्याने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होणार नाही हे सिद्ध झाले आहे. प्राणीमित्र संघटनांनीही या प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहायला हवे. भटक्या कुत्र्यांना सहानुभूती दाखवताना त्यांच्या हल्ल्यात जखमी होणाऱ्या नागरिकांकडे देखील सहानुभूतीने पाहायला हवे. आपल्या देशात २००१ साली प्राणी कल्याण कायदा लागू झाला या कायद्यानुसार भटक्या कुत्र्यांना संरक्षण मिळाले. भटक्या कुत्र्यांना ते आहेत त्या ठिकणापासून कोणीही हलवू शकत नाही शिवाय त्यांना त्याच ठिकाणी खायला घालणे अनिवार्य करण्यात आले. या कायद्यामुळे भटक्या कुत्र्यांना तर संरक्षण मिळाले पण नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव वाढला. भविष्यात हा उपद्रव आणखी वाढणार आहे . म्हणूनच या कायद्याचा मान राखून नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव कसा रोखता येईल यासाठी कोणता मध्यममार्ग काढता येईल यासाठी सरकारने एक समिती नेमावी. प्राणीमित्र संघटनेच्या सदस्यांसह, तज्ज्ञांचा समावेश या समितीत करावा. या समितीने योग्य मार्ग काढून भटक्या कुत्र्यांना संरक्षण देऊन त्यांच्यापासून नागरिकांना होणारा उपद्रव थांबवावा.

**श्याम ठाणेदार**
**पुणे**

# तिसऱ्या प्रयत्नात न्युझीलंड महिला संघाची बाजी

सुहास जोशी
ज्येष्ठ क्रीडा पत्रकार

दुबईत झालेल्या महिलांच्या ९व्या टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत न्युझीलंड महिला संघाने नवा इतिहास रचताना अखेर तिसऱ्या प्रयत्नात जेतेपदाला गवसणी घातली. याअगोदर २००९ आणि २०१० या दोन विश्वचषक स्पर्धेत न्युझीलंड संघाला उपविजेते पदावर समाधान मानावे लागलें होते. २००९च्या पहिल्या स्पर्धेत त्यांना इंग्लंडकडून हार खावी लागली होती. तर २०१० च्या स्पर्धेत बलाढ्य ऑस्ट्रेलियाने त्यांना नमवले होते. अखेर १४ वर्षांच्या मोठ्या अवधीनंतर जगज्जेतेपदाचे न्युझीलंड महिला क्रिकेट संघाचे स्वप्न पूर्ण झाले असेच म्हणावे लागेल. आतापर्यंत त्यांच्या पुरुष क्रिकेट संघाला कुठलीच विश्वचषक क्रिकेट स्पर्धा अद्याप जिंकता आली नाही. त्यांच्या महिला संघाने मात्र आता पुरुष संघाला याबाबत चक्क मागे टाकण्याचा आगळा पराक्रम केला. तेव्हा त्यांच्या पुरूष संघाने महिला संघाकडून जेतेपदाचा पदाचा धडा गिरवायला हरकत नाही. रविवार २० ऑक्टोबर हा दिवस न्युझीलंड क्रिकेटसाठी ऐतिहासीक ठरला. त्यांच्या पुरुष संघाने बंगळुरू येथे झालेल्या भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात ७ गडी राखून शानदार विजय मिळवला. तब्बल ३६ वर्षांच्या मोठ्या अवधीनंतर पुन्हा एकदा न्युझीलंड संघाने भारत भूमित भारताला नमविण्याचा पराक्रम केला. तर त्यांच्या महिला संघाने विश्वचषक क्रिकेट स्पर्धा जिंकून दुहेरी धमाका उडवून दिला. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी न्युझीलंड संघ जेते पदाच्या शर्यतीत कुठेच नव्हता. स्पर्धेला येण्याअगोदर तब्बल १० सामन्यात न्युझीलंड संघ पराभूत झाला होता. त्यामुळे त्यांच्याकडुन विजेतेपदाची फारशी अपेक्षा कोणी बाळगली नव्हती.परंतु विश्वचषक स्पर्धेत मात्र चक्क विजेते पदावर कब्जा करून न्युझीलंड संघाने चांगलीच खळबळ माजवली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

न्युझीलंड संघाने ही स्पर्धा जिंकल्यामुळे आता महिला किकेट विश्वाला नवा जगज्जेता मिळाला. या स्पर्धेत न्युझीलंड संघाने आपला खेळ चांगलाच ऊंचावला.त्यांची फलंदाजी आणि गोलंदाजी चांगली झाली. .तर क्षेत्ररक्षण देखील चांगलेच ऊच दर्जाचे होते.काही सामने तर न्युझीलंडने अफलातु क्षेत्ररणाच्या जोरावर जिंकले. निर्णायक लढतीत पराभूत होणारा दक्षिण आफ्रिकेचा संघ पुन्हा एकदा दुदैवी ठरला. या अगोदर अमेरिकत झालेल्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत त्यांच्या संघाला भारताकडून हार खावी लागली होती. महत्वाच्या स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेचा पुरुष संघ मोक्याचा क्षणी नांगी टाकतो हा




इतिहास होऊन बसलाय.त्यामुळे त्यांच्या मागे चोकर्सची बिरुदावली चिकटली. आता दुदैवाने त्याच्या महिला संघाबाबत देखील तसेच समिकरण होऊ लागले आहे. गत वर्षी देखील महिलांच्या स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेचा संघ अंतिम सामन्यात बलाढ्य ऑस्ट्रेलियाकडून पराभूत झाला होता. यंदाच्या या स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाला उपांत्य फेरीच्या सामन्यात पराभूत करून गेल्या वेळच्या पराभवाचा बदला घेतला. परंतु यंदा अंतिम सामन्यात त्यानी न्युझीलंड संघाकडून शरणागती पत्करली. विजयासाठी १५९ धावांचे लक्ष्य दक्षिण आफ्रिकेसमोर होते. परंतु त्यांना २० षटकात ९ बाद १२६ धावांची मजल मारली आली. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार बोललेले नाणेफेक जिंकून प्रथम न्युझीलंडला फलंदाजी देण्याचा आफ्रिकन कर्णधाराचा निर्णय चुकला.

न्युझीलंडने २० षटकात ५ बाद १५८ धावांची चांगली मजल मारली. त्यांच्या कारने सर्वाधिक ४३ धावा केल्या तर ब्रुकने ३८ धावा केल्या. या दोघींनी चौथ्या विकेटसाठी ५७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केल्यामुळे न्युझीलंडला १५० धावांचा टप्पा ओलांडता आला. १५९ धावांचा विजयी लक्ष घेऊन उतरणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने चांगली सुरुवात केली. कर्णधार लॉरा-तांझिमने ५१ धावांची भागीदारी केली. ७व्या षटकात तांझिम बाद झाली. तर त्यानंतर १०व्या षटकात कर्णधार लॉरा बाद झाली. तेथूनच दक्षिण आफ्रिकेची पडझड सुरु झाली. १६ षटकात ६ बाद १०० धावा अशी आफ्रिकेची घसरगुंडी उडाली. शेवटचे ३ फलंदाज २७ धावातच माघारी परतले. तेथेच त्यांच्या विजयाच्या आशा संपुष्टात आल्या.

न्युझीलंड तर्फे मेर आणि केरने सुरेख मारा करताना प्रत्येकी ३ बळी टिपले. अंतिम सामन्यात अष्टपैलू खेळ करणारी केर त्यांच्या विजयाची शिल्पकार ठरली. तिने या स्पर्धेत आपल्या अष्टपैलू खेळाची छान चमक दाखवून ६ सामन्यात १५ बळी घेताना १३५ धावा देखील फटकावल्या . तिला स्पर्धेतील आणि अंतिम सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूच्या पुरस्काराने गौरवण्यात आले. केरने या स्पर्धेत सर्वाधिक १५ बळी घेऊन नव्या विक्रमाची देखील नोंद केली. तिने अगोदरचा इंग्लंडची ॲना आणि ऑस्ट्रेलियाची मेगन या दोघांचा प्रत्येकी १३ बळींचा विक्रम मोडीत काढला. उपात्य फेरीच्या पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने विक्रमी ६वेळा ही स्पर्धा जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियाचा दणदणीत पराभव करुन अंतिम फेरीत धडक मारली.

आता पर्यंत झालेल्या या स्पधेत केवळ तिसरयांदा ऑस्टेलियाच्या संघाला अंतिम फेरी गाठता आली नाही.७४ धावांची जबरदस्त खेळी करणारी बॉश त्यांच्या विजयाची शिल्पकार होती. तिने ४८ चेंडू खेळताना ६ चौकार आणि १ षटकार मारले. तिने लॉरा सोबत ९६ धावांची दुसऱ्या विकेटसाठी भक्कम भागिदारी करुन आफ्रिकेचा विजय निश्चित केला. ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजी देण्याचा निर्णय आफ्रिकेचा यशस्वी ठरला. आफ्रिकेच्या गोलंदाजांनी सुरेख मारा करुन ऑस्ट्रेलियाला १३४ धावात रोखण्यात यश मिळवले. त्यांच्या मुनीने सर्वाधिक ४४ धावा केल्या.

आफ्रिकेच्या सोकाने सुरेख गोलंदाजी करताना २ बळी टिपले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात न्यूझीलंड ने माजी विजेत्या विंडीजला पराभूत केले. "अ" गटात ऑस्ट्रेलियाने पहिला आणि न्यूझीलंडने दुसरा क्रमांक मिळवला होता. तर "ब" गटात सरस धावगतीच्या जोरावर विंडीजने पहिला आणि आफ्रिकेने दुसरा क्रमांक मिळवला होता. स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात आपले चारही सामने जिंकणारा ऑस्ट्रेलिया हा एकमेव संघ होता. भारतीय संघाकडून स्पर्धेत चांगल्या कामगिरीची अपेक्षा बाळगली जात होती. परंतु भारतीय संघाने सुमार दर्जाचा खेळ करुन भारतीय क्रिकेट प्रेमींची चांगलीच निराशा केली. बलाढ्य ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडकडून भारतीय संघ पराभूत झाला. दुबळ्या पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्ध भारताने विजय मिळवला. परंतु ते विजय स्पर्धेची उपांत्य फेरी गाठण्यासाठी पुरेसे नव्हते. त्यात भारतीय संघाची धावगती देखील चांगली नव्हती. भारतीय फलंदाजी आणि गोलंदाजी फारशी चांगली झाली नाही. त्यातच सुमार क्षेत्ररक्षणाचा फटका भारतीय संघाला बसला.

आता कर्णधार हरमनप्रीत सिंगला या जबाबदारीतून मुक्त करण्याची वेळ आली आहे. गेली २-३ वर्षे भारतीय संघाची कामगिरी चांगलीच खालावली आहे. त्यामुळे नव्याने संघ बांधणी करण्याची गरज आहे. अगोदर ठरल्या प्रमाणे ही स्पर्धा बांगलादेश मध्ये होणार होती. परंतु तेथील अस्थिरतेचे वातावरण बघून ही स्पर्धा शेवटच्या क्षणी दुबईत हलवण्याचा निर्णय आयसीसीने घेतला. स्पर्धेतील चुरशीच्या सामन्यांनी स्पर्धेची रंगत वाढवली. ऑस्ट्रेलियाचा अपवाद वगळता उपांत्य फेरीत कोणते तीन संघ जाणार याचा फैसला गटातील शेवटचे सामने होईपर्यंत निश्चित नव्हते.त्या मुळे स्पर्धा किती चुरशीची झाली याची कल्पना आपल्याला येते. न्युझीलंडचा हा विजय त्याच्या महिला संघासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल. त्यामुळे न्यूझीलंडमध्ये आता महिला क्रिकेट अधिक जोर धरेल अशी आशा करुया. भविष्यात न्युझीलंड महिला संघ अशीच दमदार सातत्यपूर्ण कामगिरी कायम राखण्यात कितपत यशस्वी ठरेल ते आता बघायचे.

मुंबई : रोटरी भवन, डोंबिवली पूर्व येथे रविवारी पुरुष एकेरी गटाने सुरु झालेल्या रोटरी क्लब रॅपिडो कॅरम सुपर सिक्स स्पर्धेचे उदघाटन रोटरी क्लब ऑफ ठाण्याचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर दिनेश मेहता यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ डोंबिवली पूर्वचे अध्यक्ष माधव सिंग, सचिव चक्रपानी शुक्ला, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे सचिव अरुण केदार, खजिनदार अजित सावंत व ठाणे डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन खजिनदार प्रसाद शेंबेकर उपस्थित होते. पुरुष एकेरी गटाच्या दुसऱ्या फेरीत पालघरच्या नितेश बाबारियाने मुंबईच्या बाळासाहेब कनुकलेवर तीन सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत ६-१९, १६-२ व १८-९ असे पराभव केले. तर मुंबईच्या ओजस जाधवने मुंबईच्याच संदीप जोगळेवर ११-९, १६-१ अशी मात करत आगेकूच केली.



# पालिकेच्या सहकार्याने आयआयटी मुंबई हाफ मॅरेथॉन स्पर्धेला भरघोस प्रतिसाद

## मतदान जनजागृती संदर्भात धावपटूंना दिली शपथ



**प्रतिनिधी**
**मुंबई**

फिटीझन इंडीया, आयआयटी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया प्रायोजक असलेली आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने काल रविवारी पहाटे ५.३० वाजता आयआयटी पवई येथे हाफ मॅरेथॉन (२१, १० आणि ५ किलोमीटर) पार पडली. या हाफ मॅरेथॉन चार हजार पाचशे स्पर्धक सहभागी झाले होते.

स्पर्धेचे ब्रीदवाक्य 'रन फॉर नेट झीरो', 'पर्यावरणीय शाश्वतता' असे होते. आयआयटी पवईच्या निसर्गरम्य परिसरात ही मॅरेथॉन पार पडली. विविध क्षेत्रातील अनुभवी आणि नवोदित धावपटूंनी देखील मॅरेथॉन मध्ये सहभाग घेतला. या स्पर्धेतून निरोगी आयुष्य कसे जगावे आणि तंदुरुस्त कसे राहावे, असा संदेश देण्यात आला.

मॅरेथॉन स्पर्धेमध्ये मतदान जनजागृतीसह मुंबई महानगर स्वच्छ, सुंदर कसे ठेवण्याबाबतही जनजागृती करण्यात आली. मुंबईचा सभोवताल अधिकाधिक हरित ठेवण्यासाठी वृक्ष लागवडीवर भर देण्यासंदर्भातही धावपटू आणि मुंबईकरांना माहिती देण्यात आली.

अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी धावपटूंनी २१, १० आणि ५ किलोमीटरचा पल्ला पार केला. या स्पर्धेत विद्यार्थ्यांसह शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, आणि परिसरातील नागरिकांनी सहभाग घेतला. स्पर्धेनंतर विजेत्या धावपटूंचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रत्येक सहभागी धावपटूंना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. एस विभागाचे सहायक आयुक्त भास्कर कसगीकर यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

***'स्वीप' अंतर्गत मतदान संदर्भात जनजागृती***

*मॅरेथॉनच्या प्रारंभी, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ पार्श्वभूमीवर मतदान करण्यासंदर्भात 'स्वीप' उपक्रम अंतर्गत जनजागृती करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त (परिमंडळ ३) श्री. विश्वास मोटे यांनी शपथ दिली. तसेच मतदान जनजागृतीसाठी स्वाक्षरी मोहीम देखील या ठिकाणी राबविण्यात आली.*

# न्यूझीलंडकडून पराभूत टीम इंडियाची 'दिवाळीची सुट्टी' रद्द

## मुंबईतील प्रतिष्ठेच्या विजयासाठी दिवाळीतही करावा लागणार सराव

**प्रतिनिधी**
**मुंबई**

कसोटी मालिकेतील पराभवानंतर दुखावलेल्या भारतीय संघ व्यवस्थापनाने आता दिवाळीत खेळाडूंना विश्रांती न देण्याचा निर्णय घेतला आहे. २ प्रशिक्षण सत्रेही देण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबत तिसऱ्या सामन्यापूर्वी खेळाडूंना सत्रात सहभागी होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात १ नोव्हेंबर रोजी मालिकेतील शेवटचा कसोटी सामना खेळला जाणार आहे. म्हणजेच भारतीय संघातील खेळाडूंना तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटीपूर्वी दोन सराव सत्रांमध्ये सहभागी व्हावे लागेल. ज्यामध्ये विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि रोहित शर्मा या खेळाडूंचाही समावेश असेल. म्हणजेच या बड्या खेळाडूंनाही सराव सत्रात सहभागी होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

न्यूझीलंडविरुद्ध २ कसोटी गमावलेल्या टीम इंडियाला दिवाळीलाही सराव करावा लागणार आहे. ३ कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारतीय संघ २ -० ने पिछाडीवर आहे. तिसरी कसोटी मुंबईत होणार असून जागतिक कसोटी चॅम्पियनशिपसाठी (WTC) ती महत्त्वाची आहे.



**वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ पॉइंट्स टेबल**

| टीम | मॅच | विजय | पराभव | ड्रॉ | पॉइंट्स | % पॉइंट्स |
|---|---|---|---|---|---|---|
| भारत | १३ | ८ | ४ | १ | ९८ | ६२.८२ |
| ऑस्ट्रेलिया | १२ | ८ | ३ | १ | ९० | ६२.५ |
| श्रीलंका | ९ | ५ | ४ | ० | ६० | ५५.५६ |
| न्यूझीलंड | १० | ५ | ५ | ० | ६० | ५० |
| द. आफ्रिका | ७ | ३ | ३ | १ | ४० | ४७.६२ |
| इंग्लंड | १९ | ९ | ९ | १ | ९३ | ४०.७९ |
| पाकिस्तान | १० | ४ | ६ | ० | ४० | ३३.३३ |
| बांगलादेश | ९ | ३ | ६ | ० | ३३ | ३०.५६ |
| वेस्ट इंडिज | ९ | १ | ६ | २ | २० | १८.५२ |

***डब्ल्यूटीसीच्या दृष्टिकोनातून मुंबई कसोटी महत्त्वाची***

*जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या दृष्टिकोनातून मुंबई कसोटी भारतीय संघासाठी महत्त्वाची आहे. सलग २ सामने गमावल्यानंतर भारताला आता पुढील ६ पैकी ४ कसोटी जिंकाव्या लागणार आहेत. ५ सामने ऑस्ट्रेलियात आहेत. अशा स्थितीत टीम इंडियाला शेवटचा सामना जिंकावाच लागेल. न्यूझीलंडचा संघ भारताविरुद्ध क्लीन स्वीप करण्यात यशस्वी ठरला तर डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत पोहोचणे कठीण होईल.*

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने प्रथमच मायदेशात न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका गमावली. टीम इंडियाच्या या पराभवामुळे खेळाडूंची चांगलीच खरडपट्टी काढली जात आहे. न्यूझीलंडने दुसऱ्या कसोटीत भारताचा ११३ धावांनी पराभव करत तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २ -० अशी अभेद्य आघाडी घेतली. गेल्या १२ वर्षात भारताने आपल्याच भूमीवर मालिका गमावण्याची ही पहिलीच वेळ आहे.

१ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या मुंबई कसोटीसाठी सर्व खेळाडू तयारी करतील, असे संघ व्यवस्थापनाने म्हटले आहे. भारतीय संघ व्यवस्थापनाने वैकल्पिक प्रशिक्षण सत्रे न घेण्याचा निर्णय घेतला आहे. वृत्तानुसार, तिसऱ्या कसोटीपूर्वी टीम इंडिया ३० आणि ३१ ऑक्टोबरला मुंबईत सराव करेल. या सत्रात सर्व खेळाडूंना उपस्थित राहावे लागणार आहे. रोहित, कोहली आणि बुमराह यांसारख्या वरिष्ठ खेळाडूंनाही दिवाळीत विश्रांती मिळणार नाही.

# सुर्यांश शेडगेने मुंबईचा डाव सावरला; दुर्दैवाने शतक मात्र 1 धावेने हुकले

**प्रतिनिधी**
**मुंबई**

फटक्यांची सदोष निवड; तसेच दुर्दैवी धावची घसरला होता. त्याच वेळी सूर्यांश शेडगे शनिवारी ठामपणे खेळपट्टीवर उभा राहिला. त्याच्या धडाकेबाज आक्रमक फलंदाजीमुळे मुंबईने पहिल्या दिवशी ६ बाद २६० अशी समाधानकारक धावसंख्या उभारली.महाराजा



बीर बिक्रम कॉलेज स्टेडियमवर सूर्यांशचे पहिले रणजी शतक एका धावेने हुकले. त्याने १० चौकार आणि चार षटकारांची चौफेर आतषबाजी केली. चेंडू स्क्वेअर लेग सीमारेषेपार धाडण्याच्या प्रयत्नातच तो बाद झाला.सूर्यांशने आक्रमण हाच बचाव मानला. त्याने ४३ चेंडूंतच अर्धशतक केले. त्रिपुराच्या गोलंदाजांनी त्याला आखूड टप्प्याच्या जाळ्यात बाद करण्याचा प्रयत्न केला.

## सुवर्ण महोत्सवी राज्य कुमार व मुली खो-खो

# सोलापूर, रत्नागिरी, नाशिकच्या दोन्ही संघाची विजयी सलामी



**प्रतिनिधी**
**धाराशिव**

सोलापूर, रत्नागिरी व नाशिक या संघाच्या कुमार व मुली संघाने सुवर्ण महोत्सवी ५० वी कुमार व मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेची विजयी सलामी दिली. महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा ३० ऑक्टोबरपर्यंत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर आयोजित केली आहे. रविवारी सुरू झालेल्या या स्पर्धेत सलामीच्या दिवशी सकाळच्या सत्रात सर्व सामने एकतर्फी झाले. सोलापूरच्या मुलांनी जालन्यावर २१-८ व मुलीनी बीडवर १७-५ असा एक डाव राखून दणदणीत विजय मिळविला. रत्नागिरीच्या मुलांनी लातूरचा १७-७ व मुलींनी नांदेडचा १९-६ असा एक डावाने धुव्वा उडवला. नाशिकच्या मुलांनी हिंगोलीला २६-४ तर मुलींनी नंदुरबारला २०-४ असे एका डावाने नमवले.

मुलींच्या गटात धाराशिव, जालना व मुलांच्या गटात सांगली, बीड यांनीही प्रतिस्पर्धी संघावर शानदार विजय मिळविले.

***आज चमकलेले खेळाडू***

***कुमार :*** *अहिल्यानगर (मच्छिंद्र वाघमारे, (३.१० मिनिटे संरक्षण व ६ गुण), रत्नागिरी (आशिष बालाडे ६ व ३ मिनिटे नाबाद),बीड (अभिषेक हिवाळे ३.५० मि. व २ गुण), सांगली (प्रेम दळवी१ मि.नाबाद व ८ गुण), सोलापूर (कृष्णा बनसोडे २.३५मि. व ३ गुण), (शुभम चव्हाण, ३ मि. नाबाद व २ गुण).*

***मुली :*** *सोलापूर (समृद्धी सुरवसे ४.२०मि.), (अनुष्का पवार, ५ गुण), रत्नागिरी (मृण्मयी नागवेकर ४.२० मि.), (युवा पालवे, ५ गुण) नाशिक (तेजल सहारे, ५.१० मि. व ५ गुण), धाराशिव (अश्विनी शिंदे, ३मि. व ४ गुण), प्रणाली काळे (१.३० नाबाद , ३.३० व २ गुण).*

***अन्य निकाल :***

***कुमार :*** *अहिल्यानगर विजयी विरुद्ध नांदेड २२-८ एक डावाने , बीड विजयी विरुद्ध परभणी १२-११ (७.३० मिनिटे राखून), सांगली विजयी विरुद्ध जळगाव २२-८ एक डावाने.*

***मुली :*** *जालना विजयी विरुद्ध हिंगोली १२-२ एक डावाने, धाराशिव विजयी विरुद्ध परभणी १२-६ एक डावाने, पालघर विजयी विरुद्ध जळगाव १२-५ एक डावाने.*

# दक्षिण मुंबईत सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे नवीन कंत्राट देऊनही कामाला सुरुवात नाही

**प्रतिनिधी**
**मुंबई**

दक्षिण मुंबईतील रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामात बराच विलंब होत असल्याबाबत भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी बीएमसी आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र लिहिले आहे. सिमेंट-कॉंक्रिटीकरणाच्या कामांसाठी भूमिपूजन करण्यात आले असले तरी काम सुरू झालेले नाही. नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याने संबंधित ठेकेदाराला प्रतिदिन एक लाख रुपये दंड करावा, अशी मागणी नार्वेकर यांनी केली.

1 ऑक्टोबरपासून दक्षिण मुंबईतील रस्त्यांवर ही कामे करण्यात येणार होती. कुलाब्याचे आमदार राहुल नार्वेकर यांच्या उपस्थितीत रामनाथ गोयंका रोड व व्ही एन रोड या दोन रस्त्यांचे भूमिपूजन करण्यात आले मात्र अद्यापपर्यंत कोणतेही काम सुरू झाले नाही. गेल्या वर्षभरापासून दक्षिण मुंबईतील सीसी रस्त्यांच्या कामाला झालेल्या विलंबाचा मुद्दा सतत मांडत आहोत. बीएमसीचे कंत्राटदार वेळेत कामे सुरू करत नाहीत, त्यांना फक्त कागदावर दंड ठोठावला जातो आणि वाढीव खर्चाने नवीन कंत्राटे दिली जातात. ही नागरिकांची सर्रास लूट आहे, असे मकरंद नार्वेकर म्हणाले.

मकरंद नार्वेकर यांनी बीएमसीला लिहिलेल्या त्यांच्या मागील पत्रांमध्ये विलंब आणि कंत्राट दरवाढीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांनी बीएमसीला अंदाजे खर्चापेक्षा जास्त रकमेच्या निविदा आल्याचा भांडाफोड करून त्यांनी जनतेचे 70 कोटी रुपये वाचवले. रोडवेज सोल्युशन इन्फ्रा इंडिया लिमिटेड (RSIIL) ज्याला यापूर्वी कंत्राट देण्यात आले होते ते काम सुरू करण्यात अयशस्वी झाले. आता ते पहिल्या टप्प्यासाठी NCC Ltd ला देण्यात आले आहे. ऑगस्टमध्ये, कंत्राटदाराने मूळ अंदाजापेक्षा 9% जास्त दराने निविदा भरली होती, परंतु वाटाघाटीनंतर 4% दराने कंत्राट देण्यात आले. बीएमसीची अतिरिक्त ₹52 कोटी रकमेची बचत केली. एकूण कंत्राटाची रक्कम फक्त 1400 कोटी रुपये आहे.

करदात्यांना चांगले रस्ते उपलब्ध करून देणे हे आपले कर्तव्य आहे. या प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. त्यामुळे BMC ने ही कामे गांभीर्याने घेण्याची, काम पूर्ण होण्यासाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्याची आणि कामाच्या स्थितीचा थेट डॅशबोर्ड लावण्याची वेळ आली आहे. कंत्राटदारांना पुन्हा लोकांची लूट करण्याची परवानगी देऊ नये असेही ते म्हणाले.

# मोरे माऊली को-ऑप. सोसायटीला राज्यातील एक मोठी पतसंस्था बनवू

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मोरे माऊली पतसंस्थेला ३७ वर्षे झालीत. हा टप्पा फार मोठा आहे. आता नियोजनबद्ध काम करायचे आहे. मोरे माऊली पतसंस्था ही राज्यातील, मुंबईतील एक मोठी पतसंस्था कशी बनेल याचा विचार करू, असे प्रतिपादन भाजपा गटनेते आणि मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांनी केले आहे.

## भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकरांचे प्रतिपादन



मोरे माऊली को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या घाटकोपर शाखेचे रौप्य महोत्सवी वर्ष व नवीन कार्यालयाचा उदघाटन सोहळा आज पार पडला. या कार्यालयाचे उदघाटन संस्थेचे संस्थापक सद्गुरू दादामहाराज मोरे माऊली यांच्या हस्ते झाले. यावेळी भाजपा आमदार प्रविण दरेकर यांच्यासह आमदार सुनिल शिंदे, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाच्या मुंबई अध्यक्षा राखी जाधव, रा. जि. प. माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, मोरे माऊली पतसंस्थेचे अध्यक्ष एकनाथ निकम, उपाध्यक्ष रामचंद्र महाराज शिंदे, कृष्णा दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ. दरेकर म्हणाले की, सहकार विषय हा माझ्या आवडीचा विषय आहे. सहकारात ताकद आहे. सहकारात केवळ आपण मोठे होत नसतो तर आपला समाज, ज्यांना कुणाचा आधार नसतो अशांना मोठे करण्याचे काम सहकारी पतसंस्था, सहकार चळवळ करत असते. मोरे माऊली पतसंस्थेने गेली ३७ वर्ष कारभार केलाय. नफ्यात चालणारी आपली संस्था आहे. मात्र संस्था गतीने चालवावी लागणार आहे.

मी गेली २०-२५ वर्ष जिल्हा बँकेचे नेतृत्व करत आहे. मी माझ्या कोकणातील सहकाऱ्यांना सांगतोय कोकणात काहीतरी उभे करा. परंतु एकही माणूस धाडसाने काहीतरी करावे यासाठी पुढे येत नाही. कोकणातील जो जो माणूस चांगले प्रकल्प घेऊन येईल त्याला ताकद देण्याचे काम माझ्या जिल्हा बँकेच्या माध्यमातून करेन, असा विश्वासही दरेकरांनी यावेळी दिला.

दरेकर पुढे म्हणाले की, आपल्या मातीतील उद्योजक तयार होईल ही भावना घेऊन आमच्यासारखी लोकं काम करतात यासाठी तुम्ही पुढे या. तुम्ही सर्वांनी पतसंस्था वाढवा. कारण या संस्था सरकार बरोबर विकासात मोठे योगदान देऊ शकतात. मी आज जिल्हा बँकेचा अध्यक्ष आहे. सरकारच्या बरोबरीने राज्यातील सर्व प्रकल्पांना मदत करतो. यावेळी दरेकर यांनी गिरणी कामगार, माथाडी कामगार, सूत गिरण्यांना जिल्हा बँकेच्या माध्यमातून आर्थिक मदत केल्याचा उल्लेखही केला.

यावेळी बोलताना दरेकर म्हणाले की, रायगड बँक अडचणीतील बँक होती. मी तीला ताकद दिली. अडचणीतून बाहेर काढली. त्या बँकेच्या कोकणात रायगडभर शाखा सुरू करणार आहोत. जोपर्यंत आर्थिक ताकद दिली जात नाही तोपर्यंत आपण उभे राहू शकत नाही. आर्थिक विकासाची चळवळ सहकाराच्या माध्यमातून येणाऱ्या काळात निश्चितपणे करू, असेही दरेकर म्हणाले.

# ज्येष्ठ रिपब्लीकन कार्यकर्ते देविदास भोईर यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीची हानी - ना. आठवले

**प्रतिनिधी**
**मुंबई**

रिपब्लिकन पक्षाचे कसारा विभाग अध्यक्ष आणि ज्येष्ठ रिपब्लिकन कार्यकर्ते देविदास भोईर यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीची मोठी हानी झाली आहे अशा शब्दांत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी दिवंगत देवीदास भोईर यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहिली आहे. देविदास भोईर यांचे दीर्घ आजाराने वयाच्या 62 व्या वर्षी दुःखद निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले आहेत. येत्या दि.4 नोव्हेंबर रोजी कसारा येथे दिवंगत देविदास भोईर यांची रिपब्लिकन पक्षातर्फे जाहीर श्रध्दांजली सभा आयोजित करण्यात येत असून या जाहीर श्रद्धांजली सभेस ना रामदास आठवले उपस्थित राहणार आहेत.



दिवंगत देविदास भोईर हे आंबेडकरी चळवळीत भारतीय दलित पँथर पासून कार्यरत होते.दलित पँथर पासून त्यांनी माझ्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन आयुष्यभर मला एकनिष्ठपणे साथ दिली. भारतीय दलित पँथर नंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे कसारा विभाग अध्यक्ष होऊन अनेक वर्षे त्यांनी माझ्या नेतृत्वात काम केले. देविदास भोईर सरखे कार्यकर्ते माझ्या पाठीशी एकनिष्ठपणे उभे राहिल्याने माझे नेतृत्व दिल्ली च्या तख्ता पर्यंत पोहोचले.रिपब्लिकन पक्षाचेच नव्हे तर संपूर्ण आंबेडकरी चळवळीची मोठी हानी झाली आहे अशी शोकभावना ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केली.

# मुंबईमध्ये फुटपाथवर राहणाऱ्या एका इसमाची सात वर्षानंतर खूनाच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता

**प्रतिनिधी**
**मुंबई**

२४ मे २०१७ रोजी पेट्रोलिंग करत असताना पोलिसांना एक इसम रक्ताच्या थारोळ्यात रोशन टॉकीज, गिरगाव समोरील फूटपाथ वर सापडला. दवाखान्यात दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला त्यानंतर भारतीय दंड संहिता कलम ३०२ अंतर्गत खूनाचा गुन्हा नोंद करण्यात आला व तपासादरम्यान आरोपी गोविंद हरिजन यास सदर इसमाच्या खूनाच्या आरोपात अटक करण्यात आली. पोटापाण्यासाठी मुंबई शहरात आलेल्या व फूटपाथ वर राहून आपला दैनंदिन कामकाज करणाऱ्या गोविंद याची गरीबीची परिस्थिती असल्यामुळे तो वकील लावू शकला नाही. दर्द से हम दर्द तक संस्थेच्या वकिलांना तो आर्थर रोड कारागृहात भेटला. संस्थेमार्फत ॲडव्होकेट गणेश नागरगोजे यांनी त्याची केस चालवली व त्याची

## 'दर्द से हमदर्द तक' संस्थेच्या सहकार्याने आरोपी सुटला



निर्दोष मुक्तता झाली.

ही केस परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारित केस होती त्या केस मध्ये आरोपीच्या कपड्यांवर मृताचे रक्त मिळाल्याचे निष्कर्ष कोर्टाने काढला परंतु या व्यतिरिक्त कुठलीही बाब आरोपी विरोधात प्रोसिकुशन सिद्ध करू शकले नाही असे निष्कर्ष कोर्टाने नोंदवले. विशेष म्हणजे या केस मध्ये मयत व्यक्ती कोण होता ही बाब सरकारी पक्ष सिद्ध करू शकले नाही व खुनाचे कारण काय हे सुद्धा केस संपेपर्यंत स्पष्ट झाले नाही.

आरोपीच्या वतीने बचाव पक्षाने असे सांगितले की मराठी न येत असलेल्या, रस्त्यावर राहणाऱ्या गरीब व्यक्तीला या केस मध्ये पोलिसांनी गुंतवले व त्याच्या विरोधात खोटे पुरावे उभा करण्याच्या प्रयत्न केला. आरोपीच्या अटके बद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वाचे पालन करण्यात आलेले नाही आरोपीला कधी अटक केले हे एकही साक्षीदार सांगू शकला नाही. त्यामुळे परिस्थितीजन्य पुराव्याची साखळी पूर्ण होऊ शकलेली नाही व आरोपीनेच हा गुन्हा केला, असे सरकार पक्ष सिद्ध करू शकले नाहीत त्यामुळे आरोपीला सोडण्यात यावे. हे म्हणणे मान्य करत सत्र न्यायाधीश डॉक्टर स्वप्नील तवशीकर यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

अनेक आरोपी हे योग्य प्रकारे त्यांची केस मांडण्यासाठी पैशांच्याअभावी वकील लावू शकत नाही त्यामुळे वर्षानुवर्ष जेलमध्ये अडकलेले असतात. 'दर्द से हमदर्द तक' संस्थेच्या माध्यमातून अशा आरोपींना विनामूल्य मदत दिली जाते, गेल्या दोन वर्षात ६०० पेक्षा गरीब गरजू आरोपींना जेल मधून सोडवल्याचे संस्थेच्या ट्रस्टी सुनिता सालसिंगिकर यांनी सांगितले.

# अणुशक्तीनगर, चेंबूर विधानसभा मतदारसंघासाठी डॉ. हीरा लाल केंद्रीय निवडणूक निरीक्षक

**प्रतिनिधी**
**मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-2024 साठी भारत निवडणूक आयोगाकडून 172- अणुशक्तीनगर आणि 173- चेंबूर विधानसभा मतदारसंघासाठी डॉ. हीरा लाल (भा.प्र.से 2009) यांची केंद्रीय सर्वसाधारण निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. लाल हे उत्तर प्रदेश शासनात जलसंपदा विभागाचे विशेष सचिव तसेच ग्रेटर शारदा सहाय्यक कमांड एरिया डेव्हलपमेंट अथॉरिटीचे अध्यक्ष आणि प्रशासक आहेत.

जनतेला सुशासन देण्यासाठी माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवांचा वापर करून विविध पदांवर यशस्वीपणे प्रशासन चालवण्याचा डॉ. लाल यांचा दांडगा अनुभव आहे. लोकसभा निवडणूक-2024 मध्ये सामान्य निरीक्षक म्हणून डॉ. लाल यांनी लोकसभा मतदारसंघ 6-आनंदपूर साहिब, रूपनगर, पंजाबमध्ये 'ग्रीन इलेक्शन' मॉडेल विकसित केले आहे.

डॉ. लाल सध्या मॉडेल गावचे मानद मार्गदर्शक देखील आहेत. बांदा येथील जिल्हा दंडाधिकारी म्हणून त्यांनी लोकप्रिय केलेल्या विकासाच्या प्रयोगांवर आधारित, मॉडेल गाव ही त्यांची संकल्पना आहे.

वातावरणातील बदलांवरील त्यांचे कार्य उल्लेखनीय ठरले असून हवामान बदलासाठी ग्राउंड ॲक्शन लीडर म्हणून, डॉ. लाल यांनी हवामान बदलामुळे होणारी हानी कमी करण्यासाठी किफायतशीर, अंमलात आणण्यास सोपे उपाय विकसित केले आहेत.

## सुविचार

आयुष्यात कुठल्याही परीस्थितीत
सुखी राहण्याचा प्रयत्न करा, दुखी राहिल्याने
उद्याचे प्रॉब्लेम सुटणार नाहीत
उलट आजचे सुख सुद्धा निघून जाईल.

# दिवाळीतील टिकल्या वाजविण्याची जुनी दुर्मीळ साधने!

लेखक
मकरंद करंदीकर



मुंबईतील जुन्या चाळींमध्ये साजरी होणारी पूर्वीची दिवाळी म्हणजे आठवणींची एक सुंदर कुपी ! ती जितकी जुनी तितका त्याचा सुगंध न्यारा !! गेल्या पिढ्यांमधील मुंबईच्या मध्यमवर्गीय चाळीतील दिवाळीची गंमत, उत्साह, त्यात पाळले जाणारे रीतिरिवाज, लोकांचे स्वभाव, तुटपुंजी साधने, अमाप उत्साह, अकृत्रिम जिवंतपणा सगळे काही अजबच होते. दिवाळी ही फराळ, फटाके, रांगोळ्या, नवे कपडे, आकाशकंदील, किल्ले बनविणे, ओवाळणी अशा अनेक धार्मिक - सामाजिक गोष्टींनी ठासून भरलेली असे.



फटाके वाजवणे हे अनेकदा सामूहिक असायचे. मग एखाद्या फटाक्यावर पत्र्याचा डबा उपडा घालणे, ऍटम बॉम्बची वात उदबत्तीने ४ / ४, ५ / ५ वेळा वाकून लावणे, वाजलेल्या फटाक्यांमधील चित्रे कचऱ्यातून शोधणे, न वाजलेले फटाके शोधणे इत्यादी गोष्टी पुढची पिढी शिकून घेत असे. पण त्यावेळी आक्रस्ताळे फटाके वाजवण्याची प्रथा फारशी नव्हतीच. केपा / टिकल्या, लवंगी फटाके, भुईचक्र, सुदर्शन चक्र, त्रिकोणी छोटे अनार असे ( आजच्या तुलनेत ) सात्विक सोज्वळ फटाके वाजविले जात असत. तेव्हा केपा / टिकल्या वाजविण्याची अनेक हत्यारे सरसकट उपलब्ध होती. सुमारे ५० / ६० वर्षांपूर्वी अगदी दगडावर दगड आपटून टिकल्या वाजविण्याची "अश्मयुगीन " आणि छोट्या हातोडीने वाजविण्याची " लोहयुगीन " हत्यारे उपलब्ध होती. नंतर आधुनिक समजल्या जाणाऱ्या पिस्तुलापर्यंत अनेक वस्तू वापरल्या जात असत. आज या सर्व वस्तू जवळ जवळ अदृष्य झाल्या आहेत. माझ्या संग्रहातील याच गोष्टी आज आपण पुन्हा एकदा पाहणार आहोत.



सोबतच्या पहिल्या फोटोतील राक्षसाच्या तोंडात एक टिकली ठेऊन वरचा दोरा ओढल्यावर ते तोंड बंद होत असे. नंतर ते जमिनीवर आपटल्यावर आतील टिकली फुटून आवाज येत असे. नंतरच्या फोटोतील यंत्रातील पत्र्याच्या पट्टीवर दोन क्लिपा स्प्रिंगने एकमेकात अडकविलेल्या असत. पुढे टिकली ठेऊन मागची क्लिप ओढली की पुढची क्लिप सुटून टिकलीवर आदळत असे. एक नावीन्य म्हणून या पट्टीला असलेली शिट्टीही वाजविता येत असे. पुढील फोटोमध्ये दाखविलेल्या लोखंडी चिमट्याच्या टोकांना खल व बत्त्यासारखी सोय असे. यातील खलामध्ये केप घालून वरील बत्ता त्यावर दाबून हा चिमटा जमिनीवर आपटल्यावर मोठा आवाज होत असे. पुढचे यंत्र म्हणजे चक्क एक छोटेसे ( दळणाचे ) जाते आहे. या जात्याची वरची पाळ उचलून खालच्या पाळीवर एक किंवा अधिक टिकल्या ठेवल्या की वरची पाळ वजनामुळे आपोआप खालच्या पाळीवर बसत असे. मधोमध बांधलेला दोरा धरून हे जाते जमिनीवर आपटले की आतील सर्व टिकल्या एकाचवेळी फुटून मोठा आवाज येत असे. यानंतर आलेली पिस्तुले म्हणजे मोठा कौतुकाचा विषय होता. आधीच्या पिस्तुलातून एकेक टिकली वाजवण्याची सोय होती. पण या पिस्तुलात टिकल्यांचा रोल घालण्याची व्यवस्था होती. एकदा फायरिंग सुरु केले की १०/ १५ टिकल्या लागोपाठ फोडता येत असत. सहाव्या फोटोत त्यावेळी लोकप्रिय असलेली पितळी आपटण्यांची राक्षसमुखे पाहायला मिळतात. त्यावेळी टिकल्या फोडण्यासाठी सहज मिळणारे मोठ्या आकाराचे नटबोल्ट सातव्या फोटोत पाहता येतात. आठव्या फोटोतील हवेत फेकल्यावर जमिनीवर आदळणारी प्लॅस्टिकची रॉकेट्स आहेत. शेवटच्या फोटोंमध्ये दोन "अश्मयुगीन व लोहयुगीन " अशी खूप "आदिम " हत्यारे पाहता येतात. जमिनीवर ठेवलेली टिकली छोट्या दगडाने किंवा छोट्या हातोडीने फोडली जात असे. या सर्व प्रकारात टिकली फुटतांना त्याची ठिणगी हातावर उडू नये म्हणून लांब दोरा, लांब मूठ इत्यादी काळजी घेतली जात असे.

दिवाळीतील एखाद्या संध्याकाळी उगाचच हे जुने सर्व आठवते. स्मृतींची कुपी अचानक उघडते. जुनी दिवाळी समोर अधिक आनंदाने नाचू लागते. खूप झगमगाटातील नवीन दिवाळी उगाचच फिकट वाटायला लागते. तेवढ्यात जवळच एखादा मोठा ऍटम बॉम्ब फुटतो.... आणि आपण धाडकन पुन्हा एकदा नव्या दिवाळीत झगमगायला लागतो.



# आकाशकंदीलाचा कारखाना

लेखक
प्रशांत कुळकर्णी



मुंबई शहरातील वांद्रे पुर्वेकडे खेरवाडी नावाची खुप मोठी वस्ती आहे. खेरवाडीतील शिवाजी नगरात राहाणारी शाळकरी मुले महात्मा गांधी मराठी विद्यालयात शिकत होती. दिवाळीच्या सुट्टीत शाळेत जायचे नाही ,दिवसभर नगरात हैदोस घालायचा आणि सात वाजले की शिवाजी नगराच्या बाहेर रस्त्याच्या जवळ एक जांभळाचे झाड होते,त्या जांभळाच्या झाडाखाली जमा होऊन गप्पा मारत टाईम पास करायचा. एवढेच काम शिवाजी नगरातील बच्चा कंपनी करत होती. इतक्यात एक टेंपो रस्त्यावर येऊन थांबला, त्या टेम्पोच्या मागोमाग एक रीक्षा येऊन थांबली,त्या रीक्षातून एक काका काकी आणि एक लहानशी मुलगी उतरली .टेम्पोतील मजूर लोकांनी हळूहळू सामान उतरवायला सुरुवात केली. ते काका काकी खूप दमलेले होते, त्यांच्या सोबत असलेल्या लहानशा मुलीला तहान लागली होती, त्या काकी झाडाखाली जमलेल्या मुलांच्या जवळ येऊन चौकशी करायला लागल्या,

“अरे मुलांनो आम्हाला थोडे पाणी विकत मिळेल असे दुकान आहे का जवळपास ?” “अहो काकी पाणी दुकानातून का विकत घ्यायचे ? आम्ही तर इथेच राहतो शिवाजी नगरमध्ये, तुम्ही कोणत्या चाळीत राहायला आला आहात तेवढेच सांगा एक धाव मारुन जातो आणि तुमच्यासाठी पाणी घेऊन येतो आमच्या घरातून”.

वैशाली एका दमात बोलून गेली. “अरे वा किती छान छान मुले आहात तुम्ही, आम्ही तिकडे दादोबा चाळीत खोली घेतली आहे भाड्याने !” त्या काकी म्हणाल्या. “अरे दादोबा चाळीत तर ही शिवानी,हा सुरज, सुध्दा राहातात, तुम्ही घरी जा आम्ही आता धावत जातो आणि पळत पळत पाणी घेऊन येतो !” असे बोलून ती मुले सुसाट सुटली, खरोखरच धाव मारुन गेली पळत पळत पाण्याच्या बाटल्या घेऊन सुध्दा आली .

मुलांचा उत्साह पाहून त्या छोट्याश्या मुलीला खुप आनंद झाला ती सगळ्यांना हात मिळवत म्हणाली, “तुम्ही सर्व किती छान छान आहात,माझे नाव रुपाली ! तुम्ही पाणी आणले म्हणून तहान भागली !” “ मुलानो आमच्या नगरात सरकारने इमारत बांधायला घेतली आहे, नवीन घर मिळाले की जाणार आम्ही नवीन घरात राहायला, तोपर्यंत इथे राहाणार. उद्या सामान लागले की या सगळ्यांनी .

” रुपालीच्या आई सगळ्यांना म्हणाल्या. रात्रीचे आठ साडेआठ वाजले होते,सर्व मुले आपापल्या घरी परतली . दुसऱ्या दिवशी मात्र सर्वांना रुपालीची आठवण आली,मग काय मुलामुलींची टोळी दादोबा चाळीत राहायला आलेल्या नवीन पाहुणीला भेटायला एकत्र गेले. रुपालीच्या घराजवळ आले तर रुपालीची आई बाबा,रुपाली सर्व जण बसून जाडसर कागद मुडपत होते,त्याला गोंद लावून चिकटवत होते.रुपालीच्या बाबांच्या हातात एक धारदार कटर होता,ते काळजीपूर्वक पण सराईतपणे कार्ड पेपर,ब्राईट पेपर, नक्षीदारपणे लाकडाच्या हातोडीने ठोकत होते,

रुपालीची आई आणि बाबाच खरे महत्वाचे आणि मेहनतीचे काम करत होते. रुपाली लहान सहान मदत करीत होती. शिवाजी नगरातील मुले रुपालीच्या घरात सुरू असलेला कारखाना पाहून थक्क झाली. रुपालीच्या आई उठल्या,एका डब्यात ठेवलेली चॉकलेट मुलांच्या हातावर ठेवून म्हणाला,

“ आमच्या खोल्या लवकरच तोडल्या गेल्या, नवीन ठिकाणी राहायला आलो,आता कामगार शोधण्यासाठी प्रयत्न करावा लागेल, कामगार नाही मिळाले तर काय करायचे तेच कळत नाही, पालघरच्या आश्रम शाळा, वनवासी वस्त्या, सगळीकडे आकाशकंदील पाठवायचे आहेत. कितीतरी ऑर्डर आहेत !”

काकी म्हणजे तुम्ही आकाशकंदील तयार करता हा तुमचा आकाशकंदीलाचा कारखाना आहे तर !” शिवानी आनंदाने म्हणाली. “हो मित्रांनो आम्ही कागदाच्या थैल्या,कव्हर,पाकीटे , गिफ्ट बॉक्स, सगळं सगळं तयार करतो!” रुपाली म्हणाली.

“ काका काकी आता आम्हाला दिवाळीची सुट्टी आहे आम्ही सर्व मुलेमुली सुध्दा येऊ का तुमच्या आकाशकंदीलाच्या कारखान्यात मदत करायला?” चिराग टाळ्या पिटत विचारु लागला.

“ अरे मुलांनो लहान मुलांकडून काम करुन घेता येत नाही .बालकामगार ठेवणे म्हणजे सरकारचे नियम मोडणे, लहान मुलांकडून काम करुन घेणे म्हणजे अपराध आहे,तो आम्ही कसा करणार ?” रुपालीचे बाबा म्हणाले.

“ अहो काका आम्ही पगार नाही मागणार ! नाही पैसे घेणार ! हातात कातर,कैची,सुरी कटर,चाकू काहीच घेणार नाही, कागदाच्या घड्या मोडून देणार आणि मदत करणार,जशी रुपाली तुमची मुलगी तुम्हाला मदत करते तसेच आम्ही शिवाजी नगरातील मुले तुम्हाला मदत करणार.” धिरज म्हणाला.

“पण काकी पालघरच्या आश्रम शाळेत, वनवासी शाळेत कंदील वाटण्यासाठी आम्ही येणार हाच हवा आहे आम्हाला पगार !” उषा म्हणाली.

त्या दिवसापासून शिवाजी नगरातील मुले रुपालीच्या घरी आकाशकंदीलाच्या कारखान्यात जमा होऊ लागले, लहान मुलांच्या मदतीने खूप खूप आकाश कंदील तयार झाले.रुपालीचे बाबांनी सगळयां मुलांना एका मोटारीतून पालघरला नेले.

शिवाजी नगराच्या मुलांनी आपल्या घरुन करंज्या,लाडू चकल्या नेल्या होत्या. पालघरला वनवासी शाळेत आकाशकंदील वाटले, मुलांच्या आईवडिलांनी पाठवलेली मिठाई आश्रम शाळेत वनवासी शाळांमध्ये आणि वनवासी पाड्यात वाटली . तेथील मुलांसोबत सहभोजन केल्यानंतर सगळी मुले घरी आली.

रुपालीच्या बाबांनी शिवाजी नगरातील मुलांच्या मदतीने तयार झालेले आकाशकंदिल प्रत्येक घराघरात वाटले.अशी दिवाळीची सुट्टी कामी आली.

# नीलकेतू आणि तेनालीरामची गोष्ट



एकदा राजदरबारामध्ये नीलकेतु नावाचा एक प्रवाशी राजा कृष्णदेवराय यांना भेटायला आला. राजाच्या सेवकांनी राजाला याची सूचना दिली. राजा ने नीलकेतूला भेटायची परवानगी दिली.

हा प्रवासी सडपातळ होता. तो राजा समोर आला आणि म्हणाला महाराज मी नीलदेशचा नीलकेतू आहे. व वेळी मी विश्वभ्रमण करिता निघालो आहे. सर्व जागेचे भ्रमण केल्यानंतर मी इथपर्यंत पोहचलो आहे.

राजाने त्याचे स्वागत करीत शाही अतिथी म्हणून घोषित केले. राजा कडून मिळालेला मानसन्मान पाहून प्रवासी खुश झाला व म्हणाला की, महाराज मी त्या जागेला ओळखतो. जिथे खूप सुंदर परी राहतात. मी माझ्या जादूच्या शक्तीने त्यांना इथे बोलवू शकतो.

नीलकेतूचे बोलणे ऐकून राजा म्हणाला, याकरिता मला काय करावे लागेल. नीलकेतू ने राजाला रात्री तलावाजवळ येण्यास सांगितले. व नीलकेतू राजास म्हणाला की, त्या जागेवर मी पारींना नृत्य करण्यासाठी बोलवू शकतो. नीलकेतूचे म्हणणे ऐकून राजा रात्री घोड्यावर बसून निघाला.

तलावाजवळ पोहचल्यानंतर जुन्या किल्ल्याजवळ नीलकेतूने राजाचे स्वागत केले. व म्हणाला महाराज मी सर्व व्यवस्था केली आहे परी आतमध्ये आहे.


राजा नीलकेतू सोबत मध्ये जाऊ लागले. त्यावेळी राजाला आरडाओरडा ऐकू आला. राजाने पहिले तर सैन्याने नीलकेतूला बांधले होते.

हे पाहून राजा म्हणाला की, हे काय सुरु आहे. तेव्हा किल्ल्यातून तेनालीराम बाहेर येऊन म्हणाले की, महाराज मी तुम्हाला सर्व सांगतो.

तेनालीराम ने राजाला सर्व सांगितले की, हा नीलकेतू एक रक्षा मंत्री आहे आणि महाराज किल्ल्यामध्ये काहीही नाही. हा नीलकेतू तुम्हाला जीवे मारणार होता. राजा ने तेनालीरामला आपला जीव वाचवला म्हणून धन्यवाद दिला. व राजा म्हणाले की, तेनालीराम हे तूला कसे काय समजले.

राम ने राजाला खरे सांगितले की, महाराज दरबारात जेव्हा नीलकेतु आला होता तेव्हाच मला संशय आला व मी समजून गेलो व नीलकेतूच्या मागावर सैन्य पाठवले. जेव्हा नीलकेतू तुम्हाला मारण्याची योजना बनवत होता. तेनालीरामच्या हुशारीमुळे राजाने तेनालीरामला धन्यवाद दिले.

## मनोरंजक शब्दकोडे



**आडवे शब्द :**

१) प्रसिद्ध असे एक कव्वाली गायक ३) पार्श्वगायक - ए.आर. xxxx ७) पंख ८) शिल्कीतील पैसे खर्च करणे ११) मनाची निश्चिती १२) तलवारीचा एक प्रकार १४) दरबाराशी संबंधित १६) सौंदर्य २०) इरादा, उद्देश २१) हत्याराची तीक्ष्ण कड २२) युक्ती २३) नशीब (इंग्रजी) २४) एक फूल २५) कविता करणारा २७) थंड २९) विल्हेवाट, व्यवस्था ३१) दर्पण ३३) मार्ग ३४) एक बैठा खेळ ३५) उग्र ३६) पुरुषांसाठीची एक पदवी

**उभे शब्द :**

१) ज्याला कुणीही शत्रू नाही असा २) नांगराचे लोखंडी पाते ४) मापून निश्चित केलेले परिमाण ५) एक संत ६) अर्क ८) विनोद खन्नाचा एक सिनेमा ९) गणपतीचे आवडते खाद्य १०) भीती १३) एक उंची वस्त्र १५) अस्सल १७) लोभी व्यक्ती १८) सर्वात शूरवीर १९) गोंधळ २०) घाण २१) दरारा २६) करंगळी आणि अंगठ्याने मोजलेले अंतर २८) तळवा ३०) प्रश्न ३१) वर्तमानाला दर्शविणारा दिवस ३२) साहित्य, साधने ३४) सावकार

## चैत्रातील 5 फरक ओळखा



## चित्र रंगवा




## बाल चित्ररंग



ओजल पांडे
सेंट मेरी हायस्कूल
मुलुंड (प)



## चला चित्र शिकूया




## स्टाईल मारो



वेदिका घाडीगांवकर